नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५५ * अंक ६६ * * नागपूर * बुधवार, दिनांक ४ जून २०२५ पुरवणीसह पाने ८ किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## वाल्मीक कराडवरील 'मकोका' हटणार?

■ वृत्तसंस्था, बीड, दि. ३ :
मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणी केज न्यायालयात आज सुनावणी पार पडली. त्यानंतर सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी माध्यमांशी संवाद साधत माहिती दिली. वाल्मीक कराडने त्याच्या वकिलांच्या मार्फत न्यायालयात उत्तरे दिली आहेत, त्या अर्जाची चौकशी येत्या १७ तारखेला होणार असल्याची माहिती निकम यांनी दिली आहे.
निकम म्हणाले, वाल्मीक कराडने न्यायालयात वकिलांच्या मार्फत उत्तर दिलेले आहेत. या खटल्यात मला मकोका मधून दोषमुक्त करावे. त्यावर आम्ही कोर्टाला असे प्रस्तावित केले की याला दोषमुक्त करावे की याच्यावर आरोप निश्चित करावे यावरचा निर्णय एकत्रित सुनावणीत घेण्यात यावा.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

## लाडक्या बहिणींचे लाडके भाऊ

आपले अर्थमंत्री वेळेप्रमाणे चांगल्या गोष्टीतून चांगला अर्थ काढतात. त्यात त्यांचा कधीही स्वार्थ नसतो. असतो तो फक्त परमार्थ. अशा आपल्या अजित दादांनी शिवराज सिंग चौहान यांनी ज्या जादूच्या शब्द बाणांमुळे मध्यप्रदेश विधानसभेची निवडणूक लीलया जिंकून आणि फक्त जिंकूनच नव्हे तर विक्रमी मताधिक्याने दणदणीत जिंकून दाखवली. त्याबद्दल दादांनी शिवराज सिंग चौहान यांना धन्यवाद दिले. तुमची लाडली बहेना स्कीम आम्ही महाराष्ट्राच्या भावांनी सुद्धा आपला भाव वाढवण्याकरता लाडक्या बहिणींच्या नावे वापरली. त्यामुळे तुमच्या सारखा पराक्रम आम्हालाही गाजवता आला. असे नुकतेच प्रतिपादन केले. शिवराज सिंग चौहान यांनी लाडली बहनाचे काम अतिशय कुशलतेने आणि योजनाबद्ध रीतीने केले होते. लोकसभेमध्ये भारतीय जनता पक्ष, शिंदेसेना आणि दहा वाजून दहा मिनिट वाला आमचा पक्ष अगदीच पायचीत झाल्यामुळे हमखास जिंकण्यासाठीचा मार्ग म्हणून लाडक्या बहिणींच्या चंचीमध्ये दरमहा पंधराशे रुपये ओतण्याचे काम तिजोरी खडखडीत आणि आम्ही हडबडीत असतानाही, आम्हीच अत्यंत गडबडीत ठरवले. त्याच जादुई दिवसात तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेबांनी घोषणांवर घोषणा केल्या. त्यात लाडकी बहीण योजना सर्वात महत्त्वाची होती. त्या योजनेपोटी आचारसंहिता लागू होण्यापूर्वीच आम्ही आगाऊ पैसे देऊन टाकले. आपला भाऊराया आता उदार झाला आहे. तेव्हा बहिणींनी भाऊरायाच्या ओवाळणीला आशीर्वाद म्हणून आपली मते महायुतीला भरभरून दिली. त्यामुळेच आम्ही आता जिंकलेलो आहोत. अशा अविभार्वात असणाऱ्या महाविकास आघाडीतील किंवा विशेषतः काँग्रेस सारख्या पक्षात तर मुख्यमंत्री पदाचे दोन-तीन उमेदवार तयार झाले होते. मात्र लाडकी बहीणचा प्रभाव इतका जबरदस्त होता की, त्यामुळे महाविकास आघाडी महाभकास झाली आणि महायुतीच्या घराघरात दिवाळी आली. या सर्व लाडक्या बहिणीचे भाऊ आणि बहिण-पुत्रांचे मामा शिवराज सिंग चौहान जेव्हा महाराष्ट्रात आले. तेव्हा त्यांच्या हुशारीचे कौतुक करण्यासाठी अजितदादा पुढे सरसावले नसते, तरच नवल. त्यावेळी ज्या ज्या लाडक्या बहिणींनी अर्ज दिला. त्यांच्या बँक खात्यात धडाधड धडाधड पैसे घेऊ लागले. अनेक बहिणी सरकारी नोकरीत असताना आणि त्या नोकरीच्या कृपेने हजारो रुपये कमावित असतानाही त्यांनी सुद्धा आपल्या लाडक्या भाऊरायांचा अपमान नको. म्हणून अत्यंत प्रेमाने आपल्या भावाने दिलेली भेट अर्ज करून स्वीकारली. आता भाऊ तीच भेट परत मागत आहेत. तेव्हा या गेमचेंजर योजनेचे आता पुढे काय होईल. याचे मार्गदर्शन घेण्यासाठी अजित दादांनी शिवराज सिंग चौहान यांची शिकवणी लावली पाहिजे. शिवराज सिंग प्रचंड बहुमत घेऊन मध्य प्रदेशच्या विधानसभेचे विजेतेवीर ठरले होतेच. पण नियती त्यांच्यावर मेहरबान झाली नाही, ती नाहीच. मुख्यमंत्रीपदावर चौहान यांच्या ऐवजी यादव बसले. बिचाऱ्या मामाला अखेर गप्प बसावे लागले. पण त्यानंतर मामाला केंद्रात कृषिमंत्री पद देऊन त्यांचा राग थोडा तरी शांत करता आला. कृषिमंत्री पद म्हणजे ओसाड गावची पाटीलकी आहे असे महाराष्ट्राचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे म्हणतात. मग आता शिवराज सिंग चौहान यांनाही असेच वाटते काय, हे कोकाटे साहेबांनी बहुतेक त्यांना विचारले असावे. कृषिमंत्री राज्याचा असो की, केंद्राचा त्याला त्याच्या खात्याचा कारभार चालवण्याकरिता इतर अनेक विभागांचा आसरा घ्यावा लागतो. यश मिळाले तर त्या विभागाचा मंत्री त्याचे भांडवल करतो. मिळाले नाही तर ओसाड गावचा पाटील आहेच. आता महाराष्ट्रात नुकतीच मे महिन्याच्या पावसाने दाणादाण उडवली आहे. केंद्रीय कृषिमंत्र्यांकडून महाराष्ट्राने फारशी अपेक्षा करणे बरोबर नाही. राज्याचे कृषिमंत्री बरेच काही करावे असे ठरवतात. पण हे बरेच काही त्यांच्याच पक्षाचे उपमुख्यमंत्री रक्कम देतील तेव्हा शक्य होत असते ना. रक्कम द्यायला अजितदादांची सुद्धा ना नाही. पण त्यांच्या खात्याचे अधिकारी पैसे द्या म्हटले रे म्हटले की, नन्नाचा पाढा वाचतात. अशा सर्व लाडक्या भावांना आमची लाडकी विनंती आहे की, त्यांनी शेतकऱ्यांचे वैरी न होता कैवारी व्हावे आणि त्याच लाडक्या बहिणींच्या नवऱ्यांचे अश्रू पुसावे, इतकीच आमची अगदी साश्रू नयनांनी अपेक्षा आहे. जय जवान! जय किसान!!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती
# आयोग स्थापन

राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय : पदनिर्मिती, जागा, खर्चासही मान्यता

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३ :
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील राज्य मंत्रिमंडळाने मंगळवारी झालेल्या बैठकीत महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोगाची स्थापना करण्याच्या प्रस्तावर शिक्कामोर्तब केले.

मंत्रिमंडळाने या आयोगासाठी पदनिर्मिती, जागा व अनुषंगिक खर्चासही मान्यता दिली आहे. त्यामुळे आदिवासी विकास विभागाच्या या निर्णयाचा राज्यातील लाखो नागरिकांना लाभ होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, मंत्रिमंडळाने कुल्यार्तील मदर डेअरीची जागा धारावी प्रकल्पाला देण्याच्या निर्णयावरही शिक्कामोर्तब केले आहे. सरकारच्या या निर्णयावरून विरोधक आक्रमक होण्याची शक्यता आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात आज राज्य मंत्रिमंडळाची बैठक झाली. या बैठकीत आदिवासी विकास



विभाग, महसूल विभाग व सार्वजनिक बांधकाम खात्याशी संबंधित काही महत्वाचे निर्णय हातावेगळे करण्यात आले.

यात आदिवासी विकास विभागाशी संबंधित महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोगाची स्थापना हा एक महत्वाचा निर्णय मानला जात आहे. या निर्णयाचा राज्यातील लाखो नागरिकांना फायदा होणार असल्याचा दावा केला जात आहे.

### मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आलेले निर्णय

- महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोगाची स्थापना. आयोगासाठी पदनिर्मिती, जागा व अनुषंगिक खर्चास मान्यता. महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग सुद्धा स्वतंत्रपणे कार्यरत राहणार
- धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी दुग्ध व्यवसाय विकास विभागाची कुर्ला येथील ८.५ हेक्टर जमीन हस्तांतरित करण्यासाठी करारनाम्यातील अटी, शर्तीमध्ये सुधारणांना मान्यता
- राज्य कामगार विमा महामंडळाच्या दोनशे खाटांच्या विमा कामगार रुग्णालय उभारणीसाठी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील मौजे करोडी येथील सहा हेक्टर गायरान जमीन. याशिवाय बिबवेवाडी- पुणे, अहिल्यानगर, सांगली अमरावती, बल्लारपूर- चंद्रपूर, सिन्नर- नाशिक, बारामती, सातारा आणि पनवेल येथील रुग्णालयांना जमीन देण्यास तत्वतः मान्यता.
- महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास पथकराच्या सवलतीसाठी भरपाई मिळणार. मुंबई प्रवेशद्वाराच्या पाच पथकर स्थानकावर सवलत दिल्यामुळे महामंडळास द्यावी लागणारी भरपाई.

## किंग एलेव्हन पंजाबला १९१ धावांचे लक्ष्य

### आरसीबीचा डाव १९० धावांवर संपुष्टात

■ वृत्तसंस्था, अहमदाबाद, दि. ३ :
आयपीएलच्या १८ व्या हंगामाचा अंतिम सामना अहमदाबादमध्ये पंजाब किंग्ज (पीबीकेएस) आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) यांच्यात खेळला जात आहे. नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळल्या जाणाऱ्या सामन्यात पंजाबने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. दोन्ही संघांनी त्यांच्या प्लेइंग-११ मध्ये कोणताही बदल केला नाही.
दरम्यान, प्रथम फलंदाजी करताना आरसीबीने ९ गडी गमावून २० षटकात १९० धावा करीत पंजाब किंग समोर १९१ धावांचे लक्ष्य ठेवले.
आरसीबीकडून फिल सॉल्ट आणि विराट कोहली यांनी डावाची सुरूवात केली. परंतु, पॉवरप्लेमध्ये फिल सॉल्ट १६ धावा काढून बाद झाला. मयंक अग्रवालला (२४ धावा) युजवेंद्र चहलने आपल्या पहिल्याच षटकात झेलबाद केले. आरसीबीचा कर्णधार रजत पाटीदार २६ धावा करून बाद झाला. विराट कोहलीकडून मोठ्या अपेक्षा असताना, ३५ चेंडून ४३ धावा करून तो बाद झाला. त्यानंतर लिव्हिंगस्टोन आणि जितेश शर्मा यांनी धुंवाधार फलंदाजी करीत आरसीबीच्या धावसंख्येला आकार दिला.
तथापि, नंतर आरसीबीचे फलंदाज एकापाठोपाठ बाद होत गेले. अखेरच्या षटकात आरसीबीचा डाव १९० धावांवर आटोपला. पंजाबकडून अर्शदीप आणि जेमिसन यांनी प्रत्येकी ३ विकेट घेतल्या उमरजई, वैशाख आणि चहल यांनी प्रत्येकी १ विकेट घेतली. आरसीबीच्या फलंदाजांनी काही सुंदर आणि आकर्षक फटके लगावल्याचे दिसून आले.




आयपीएल फायनल

## ट्रम्पचा फोन आला की मोदी लगेच सरेंडर..

राहुल गांधींची सडकून टीका



■ वृत्तसंस्था, भोपाळ, दि. ३ :
ट्रम्प यांनी फोन केला आणि मोदींनी लगेच शरणागती पत्करली. इतिहास साक्षी आहे, भाजप-आरएसएसचे हेच चरित्र आहे. ते नेहमीच झुकतात. अमेरिकेच्या धमकीला न जुमानता भारताने १९७१ मध्ये पाकिस्तान तोडला. काँग्रेसचे बब्बर शेर आणि सिंहीणी महासत्तेविरुद्ध लढतात, ते कधीही झुकत नाहीत, असे विधान राहुल गांधी यांनी मंगळवारी भोपाळमध्ये केले.
याआधी राहुल गांधींनी मध्य प्रदेशात संघटना निर्मिती मोहीम सुरू केली. ही मोहीम १० जूनपासून सुरू होईल आणि राज्यात ३० जूनपर्यंत सुरू राहील. यासाठी काँग्रेसने प्रत्येक निरीक्षकाला एका जिल्ह्याची जबाबदारी सोपवली आहे. राहुल यांनी ६ तासांत चार वेगवेगळ्या बैठका घेतल्या. रवींद्र भवनमध्ये ब्लॉक, जिल्हा अध्यक्षांना संबोधित करताना त्यांनी संघटना मजबूत करण्याबद्दल बोलले. काँग्रेस विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत राहुल गांधी यांनी आमदारांशी संवाद साधला.
राहुल म्हणाले, आपल्याला शर्यतीचा घोडा बनायचे आहे. आपल्याला धावायचे आहे आणि पुढे जायचे आहे. राहुल गांधी यांनी ब्लॉक आणि जिल्हा पातळीवर काँग्रेस समित्या मजबूत करण्याबद्दल सांगताना नवीन पिढीलाही संधी दिली जाईल, असे स्पष्ट केले.

## कापणी झालेल्या पिकांना नुकसानभरपाई

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :
राज्यातील विविध भागात नुकत्याच झालेल्या पावसामुळे कापणी केलेल्या पिकांचे नुकसान झाले आहे. अशा प्रकारे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना भरपाई देण्याबाबत विचार केला जाईल, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बैठकीत दिले.
सह्याद्री अतिथीगृह येथे आज राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत राज्यात पावसामुळे झालेल्या नुकसानीचा आढावा घेण्यात आला. त्यावेळी विविध मंत्र्यांनी नुकसानीचा मुद्दा उपस्थित केला.
वन मंत्री गणेश नाईक आणि बंदरे विकास मंत्री नीलेश राणे यांनी मच्छिमारांना नुकसानभरपाई देण्याची मागणी केली. यावर मुख्यमंत्र्यांनी मदत आणि पुनर्वसन विभागाला यावर प्रस्ताव सादर करण्याची सूचना केली. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी पावसामुळे रस्ते आणि छोट्या पुलांचे नुकसान झाले आहे. त्यांची दुरुस्ती केली जावी, अशी मागणी केली. ग्रामविकास विभागाकडून ग्रामीण भागातील रस्ते दुरुस्ती करण्यासाठी सूचना द्याव्यात, अशी मागणी पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी केली. यावर गेल्या १५ दिवसांत ज्या भागात रेड अलर्ट घोषित केला होता तेथील रस्ते आणि पूल दुरुस्ती बाबत विचार केला जावा, असे निर्देश फडणवीस यांनी दिले.
या बैठकीत मदत आणि पुनर्वसन विभागाच्या प्रधान सचिव सोनिया सेठी यांनी सादरीकरणाद्वारे राज्यातील अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा आणि मदतीची माहिती दिली. राज्य मंत्रिमंडळाच्या २७ मे रोजी झालेल्या बैठकीत घरांच्या पडझडींच्या दुरुस्ती आणि पुनर्बांधणीसाठी तातडीने मदतीकरीता निधी द्यावा, अशा सूचना केल्या होत्या. त्यानुसार ४९ कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आला आहे, अशी माहिती सेठी यांनी दिली.
खरीप २०२५ आणि यापुढील कालावधीसाठी केंद्र सरकार अथवा राज्य सरकारने अधिसूचित केलेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेती पिकांच्या नुकसानीपोटी द्यावयाची भरपाई दर आणि निकष २७ मार्च २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार देय राहतील. यामुळे १ जानेवारी २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार दिलेल्या सूचना रद्द करण्यात आल्या आहेत, असे सोनिया सेठी यांनी सांगितले.

## शिंदेंचे सर्व मंत्री दादांवर नाराज

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :
सह्याद्री अतिथीगृहात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या मंत्र्यांची स्वतंत्र आणि महत्त्वपूर्ण बैठक घेतली. या बैठकीत शिंदे यांनी प्रत्येक मंत्र्याशी वन टू वन चर्चा करत त्यांच्या खात्यांचा आढावा घेतला.
या संवादादरम्यान अनेक मंत्र्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याविषयी नाराजी व्यक्त केली आहे. शिंदे गटातील सर्वच मंत्र्यांमध्ये अजित पवारांबाबत नाराजीचा सूर दिसून आला.
शिंदे यांनी प्रत्येक खात्याची सविस्तर माहिती घेतली. खात्याचे काम किती झाले आहे, किती बाकी आहे, निधीची अडचण आहे का, भविष्यात कोणती महत्त्वाची कामे हाती घेणार आहात, या सर्व मुद्द्यांवर चर्चा झाली.



बैठकीत अजित पवार यांच्याबाबत तीव्र नाराजीचा सूर उमटला. शिवसेनेच्या मंत्र्यांनी शिंदेंच्या समोर तक्रार करताना स्पष्टपणे म्हटले की, अजित पवार आमच्या विकास कामांवर अडथळे आणत आहेत. अजित पवार अर्थमंत्री आहेत, जर आम्हाला पैसे देणार नसतील तर आम्ही काम कसे करणार? असा प्रश्न यावेळी शिवसेनेच्या मंत्र्यांनी उपस्थित केला.

## राज्यात आरोग्य सेवेला बळ!

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :
राज्यातील कामगारवर्गासाठी एक दिलासादायक पाऊल उचलताना, राज्य मंत्रिमंडळाने छत्रपती संभाजीनगरात कर्मचारी राज्य विमा निगमचे २०० खाटांचे रुग्णालय उभारण्यासाठी १५ एकर गायरान जमीन देण्यास मंजुरी दिली आहे. तसेच, महाराष्ट्रातील इतर नऊ महत्त्वाच्या ठिकाणी प्रस्तावित एरक्ठ रुग्णालयांसाठीही शासकीय जमिनी देण्यास तत्वतः मान्यता देण्यात आली.
उद्योगवाढीचा वेग पाहता छत्रपती संभाजीनगरात वैद्यकीय सुविधा वाढवणे गरजेचे झाले होते. शहरातील मौजे करोडी येथे हे आधुनिक रुग्णालय उभारले जाणार आहेत.
कामगार कल्याणाच्या दृष्टीने महाराष्ट्र सरकारने बिबवेवाडी (पुणे), अहिल्यानगर, सांगली, अमरावती, बल्लारपूर (चंद्रपूर), सिन्नर (नाशिक), बारामती (पुणे), सातारा आणि पनवेल (रायगड) या ठिकाणी प्रस्तावित रुग्णालयांसाठीही शासकीय जमीन उपलब्ध करून देण्यास मंत्रिमंडळाने तत्वतः मंजुरी दिली आहे.
ही सर्व केंद्रे राज्यातील महत्त्वाच्या औद्योगिक आणि नागरी भागांत असून, या भागांतील मोठ्या संख्येने कार्यरत असलेल्या कामगारवर्गाच्या आरोग्य गरजांची पूर्तता करण्यासाठी ही रुग्णालये आवश्यक आहेत.

## इंडिया ब्लॉकच्या बैठकीला शरद पवारांच्या एनसीपीची दांडी

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ३ :
'ऑपरेशन सिंदूर' वर संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्यासाठी इंडिया ब्लॉकने मंगळवारी नवी दिल्लीत बैठक घेतली. त्यात १६ विरोधी पक्षांनी भाग घेतला. परंतु, शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने दांडी मारली.
तृणमूल काँग्रेसचे खासदार डेरेक ओ'ब्रायन यांनी माहिती दिली की सर्व पक्षांनी पंतप्रधानांना पत्र लिहून संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याची मागणी केली आहे.
ऑपरेशन सिंदूर आणि दहशतवादाविरुद्ध भारताची भूमिका जगासमोर मांडण्यासाठी केंद्र सरकारने ७ सर्वपक्षीय शिष्टमंडळे जगाच्या दौऱ्यावर पाठवली आहेत. या आठवड्याच्या अखेरीस सर्व शिष्टमंडळे भारतात परततील. त्यांच्या परतीनंतर पुढील आठवड्यात विशेष अधिवेशनात या मुद्द्यावर चर्चेची मागणी विरोधक करत आहेत.
राजदचे मनोज झा म्हणाले की पहलगाम हल्ल्यानंतर ऑपरेशन सिंदूर घडले. 'आपण' या भावनेने विचार करूनही, चिंतेची काही चिन्हे दिसून आली. जगातील एका देशाचे राष्ट्रपती दररोज 'सरपंच'गिरी करत आहेत.
काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनीही पंतप्रधान मोदींना अनेक प्रश्न विचारले. त्यांनी एक्स वरील पोस्टमध्ये लिहिले की, 'अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या दाव्यांचे स्पष्टीकरण देण्याऐवजी, पंतप्रधान नरेंद्र मोदी सशस्त्र दलांच्या शौर्याचे वैयक्तिक श्रेय घेत आहेत.'

## मविआच्या महिला नेत्यांचे राज्यपालांकडे गाऱ्हाणे

### वैष्णवी प्रकरण, लाडकी बहीण योजना आणि महिला सुरक्षेवर केली चर्चा



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :
महाविकास आघाडीच्या महिला नेत्यांच्या शिष्टमंडळाने आज राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची राजभवन येथे भेट घेतली. तब्बल ५५ मिनिटे चाललेल्या या बैठकीमध्ये राज्यातील विविध महत्त्वाच्या सामाजिक आणि प्रशासनिक प्रश्नांवर गंभीर चर्चा करण्यात आली. यावेळी मविआच्या महिला नेत्यांनी राज्यपालांसमोर आपली मते मांडली.
या शिष्टमंडळात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नेत्या सुषमा अंधारे, माजी महापौर किशोरी पेडणेकर, जयश्री शेळके, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या रोहिणी खडसे, विद्या चव्हाण तसेच काँग्रेसच्या आमदार ज्योती गायकवाड आदी मान्यवरांचा समावेश होता. राज्यातील सामाजिक अन्याय, पोलिस यंत्रणेतील हस्तक्षेप, महिला सुरक्षेचा अभाव आणि शासकीय योजनांची अंमलबजावणी या प्रमुख मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली.
वैष्णवी हगवणे प्रकरणांमध्ये पोलिस आणि राजकीय वरदहस्त याचा विचार करता हे प्रकरण सीआयडी कडे वर्ग करण्यात यावे, पोलिस अधिकारी जालिंदर सुपेकर तथा त्यांचे सख्खे मेहुणे व खडक पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक शशिकांत चव्हाण यांचा या प्रकरणातील अतिरिक्त हस्तक्षेप टाळावा, शशिकांत चव्हाण व जालिंदर सुपेकर यांच्या मालमत्तेची चौकशी व्हावी, लाडकी बहीण योजनेसाठी शासनाने आर्थिक तरतूद निश्चित करावी, यासाठी सामाजिक न्याय विभाग किंवा आदिवासी कल्याण विभागाचा निधी वळता करू नये, बार्टी, महाज्योती, सारथी या विभागातील संशोधक विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती या विद्यार्थ्यांना मिळायला हवी, ड्रग्स विरोधी मोहीम अधिक तीव्र व्हावी, राज्यातील बेपत्ता महिला आणि मुलींची वाढती संख्या लक्षात घेता महिला आणि मुलींच्या शोध मोहिमेसाठी विशेष कक्ष कार्यान्वित व्हावा, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदी कायद्याचा परिघ अज्ञात असणारी व्यक्ती असावी, आयोगाची रिक्त असणारी सदस्य पदे तात्काळ भरली जावीत, विभागीय कार्यालय सुरू व्हावीत, आयोगावर बिगर राजकीय व्यक्तीची नेमणूक व्हावी, अशा अनेक मागण्या या महिला नेत्यांनी केल्या.

## एसटी कर्मचाऱ्यांना वाढीव महागाई भत्ता आणि १ कोटींचा अपघाती विमा

सेवानिवृत्तांना वर्षभर मोफत प्रवास

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :
राज्यातील एसटी महामंडळातील लाखो कर्मचाऱ्यांसाठी दिलासादायक घोषणा करत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज महत्त्वपूर्ण निर्णयांची माहिती दिली. जून २०२५ पासून कर्मचाऱ्यांना मूळ वेतनावर ५३ टक्के महागाई भत्ता देण्यात येणार आहे, यासोबतच १ कोटी रुपयांचे अपघाती विमा कवच, तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना संपूर्ण वर्षासाठी मोफत प्रवास पास देण्याचेही आश्वासन त्यांनी दिले.
सह्याद्री अतिथीगृहात आयोजित एसटी महामंडळाच्या विविध संघटनांच्या प्रतिनिधींशी झालेल्या बैठकीत



उपमुख्यमंत्र्यांनी ही घोषणा केली. बैठकीस परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, आमदार सदाभाऊ खोत, माजी खासदार आनंदराव अडसूळ, तसेच वरिष्ठ अधिकारी व संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.
उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, एसटीची सेवा दर्जेदार, स्वच्छ आणि सुलभ असली पाहिजे. बसस्थानकांनाही बस पोर्टच्या दर्जापर्यंत नेण्यासाठी प्रयत्न करावेत. एसटीला तोट्यातून बाहेर येण्यासाठी सर्वतोपरी उपाय योजण्याचे निर्देश दिले.
कर्मचाऱ्यांसाठी महात्मा फुले जनआरोग्य योजना किंवा धर्मवीर आनंद दिघे वैद्यकीय प्रतिपूर्ती योजना यापैकी एक निवडण्याचा पर्याय देण्यात आला आहे. यामध्ये ५ लाखांपर्यंत कॅशलेस वैद्यकीय सुविधा उपलब्ध असेल.
याशिवाय स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेत वेतन खाते असलेल्या कर्मचाऱ्यांना १ कोटी रुपयांपर्यंतचा अपघाती विमा कवच देण्यात येणार आहे.

# राज्यात धरणांतील साठा चार टक्क्यांनी वाढला



■ महासागर प्रतिनिधी,

पुणे, दि. ३ : भारतीय हवामानशास्त्र पुणे कार्यालयातून मिळालेल्या आकडेवारीतून १९६२ नंतर पावसाच्या नोंदीत पहिल्यांदाच उन्हाळ्याच्या मे महिन्यात महाराष्ट्रात पावसाळी हंगामाचे (मान्सूनचे) आगमन झाले आहे. यातून राज्यातील छोट्या-मोठ्या धरण व जलसाठ्यांत ४ टक्क्यांनी वाढ झाली आहे. छत्रपती संभाजीनगर विभागातील जलसाठ्यात सर्वाधिक १९ टक्के तर पुणे विभागात ५ टक्के वाढ झाली आहे. नागपूर व अमरावती विभाग अजून मागेच आहेत. उन्हाळ्यात प्री-मान्सून पाऊस पडतो, पण उन्हाळ्यात पावसाळी हंगामाची सुरुवात होण्याची ही महाराष्ट्रातील पहिलीच वेळ आहे. पुणे हवामानशास्त्र वेधशाळेतून माहिती घेतली असता यापूर्वी २९ मे १९६२ रोजी पावसाळी हंगाम सुरू झाला होता. २०२४ ला ६ जून तर २०२३ मध्ये ११ जूनला पावसाळी हंगाम सुरू झाला होता. जून ते सप्टेंबर हा पावसाळी हंगाम असतो. १९६२ नंतर पहिल्यांदाच २५ मे २०२५ रोजीपासून (उन्हाळ्यात) पावसाळा सुरू झाला आहे. २०१५ साली १०६ मिलिमीटर पाऊस झाला होता, या वेळी तो अधिक आहे.

**मान्सून लवकर सुरू झाल्याने**

नुकसान, आता पंचनाम्याचे आदेश : अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या भागाचे पंचनामे तत्काळ सुरू करावेत, असे आदेश महसूल, कृषी, जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम, महावितरण, पशुसंवर्धन इत्यादी विभागांना पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले आहेत. राज्यातही बहुतेक जिल्ह्यात हीच स्थिती आहे. उपमुख्यमंत्री, जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी नुकसानग्रस्त भागाची पाहणी करून पंचनामे करण्याची सूचना केली होती.

> आयएमडीकडे असलेल्या नोंदीनुसार महाराष्ट्रात २५ ते २९ मे १९६२ दरम्यान उन्हाळ्यात पावसाळी हंगाम सुरू झाला होता. त्यानंतर २५ मे २०२५ रोजी पावसाळी हंगाम सुरू झाला आहे. या पावसाळी हंगामात अधिक पाऊस पडण्याची शक्यता आहे. तो १०६ टक्क्यांच्या पुढे जाईल. १९६२ सालीही पुणे, मुंबईत अधिक पाऊस झाला होता.
>
> **सुदीप कुमार, शास्त्रज्ञ, आयएमडी, पुणे**

## कृषिमंत्र्यांनी आपल्या नेत्याचे अपयश उघडे पाडले:राजू शेट्टी यांचा आरोप



**नाशिक:** कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी कृषी खात्याला 'ओसाडगावची पाटीलकी' म्हणत स्वत:च्या खात्याचाच अवमान केला. पण हे त्यांच्या अपयशाचे नाही, तर त्यांच्या नेत्याचे म्हणजेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं अपयश असल्याचं स्पष्ट आहे, अशी रोखठोक टीका स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी केली आहे. सरकारने शेतकरी, शेती आणि कृषी खात्याची जी हेटाळणी सुरू केली आहे, ती गंभीर असून अशा सरकारला जनता वेळ आल्यावर उत्तर नक्की देईल, असा इशाराही त्यांनी दिला. राजू शेट्टी पुढे बोलताना म्हणाले की, राज्यात नुकत्याच झालेल्या वादळी पावसामुळे द्राक्ष, डाळिंब, कांदा आणि भाजीपाल्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. कांदा शेतात आणि घरात सडत आहे, द्राक्षांच्या बागा उद्ध्वस्त झाल्या, फुलं झडून पडली आहेत. अशा वेळी राज्याचे कृषिमंत्री असलेल्या कोकाटे यांनी किती शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांची व्यथा ऐकली? त्यांच्या जिल्ह्यातच संकट ओसंडून वाहत असताना ते कुठे आहेत? असा सवाल शेट्टींनी उपस्थित केला.

## 'राज्यमंत्र्यांचे केवळ नाव, अधिकार कुठे? महायुती सरकारमध्ये अस्वस्थतेचे सावट'

**मुंबई :** राज्यातील महायुती सरकारला सत्तेवर येऊन अनेक महिने झाले असले तरी, मंत्रिमंडळातील राज्यमंत्र्यांना अद्यापही त्यांच्या पदाच्या अधिकारांचा प्रत्यक्ष लाभ मिळालेला नाही. नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात मंत्रिमंडळाचा विस्तार करून राज्यमंत्र्यांची नेमणूक करण्यात आली होती, मात्र चार महिने उलटल्यानंतरही त्यांच्याकडे ना अधिकार, ना फाईल, ना जबाबदारी केवळ 'राज्यमंत्री' ही पदवीच शिल्लक राहिली आहे. त्यामुळे राज्यमंत्री पद हे नावापुरते उरल्याची चर्चा राजकीय वतुर्ळात रंगू लागली आहे. नागपूर अधिवेशनाच्या अखेरच्या दिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांनी खातेवाटप जाहीर केले. कॅबिनेट मंत्र्यांना त्यांच्या खात्यांचे कार्यभार देण्यात आले, परंतु राज्यमंत्र्यांना 'सहकार्य' म्हणून जरी नमूद केलं असलं तरी, त्यांच्याकडे प्रत्यक्षात कोणतेही प्रशासकीय अधिकार देण्यात आलेले नाहीत. त्यांचा हस्ताक्षराचा ठसा असलेल्या फाईल्स त्यांच्या टेबलवर पोहोचतच नाहीत. गृह खात्याचे काही अधिकार मुख्यमंत्री फडणवीस यांनी त्यांच्या राज्यमंत्रीकडे दिले असले तरी, इतर कॅबिनेट मंत्र्यांनी मात्र कोणतेही अधिकार आपल्या राज्यमंत्र्यांना दिलेले नाहीत. त्यामुळे राज्यमंत्री हे केवळ 'डेकोरेटिव्ह पोस्ट' बनून राहिले आहेत. या प्रकारामुळे सत्तेत असलेल्या महायुतीतील राज्यमंत्री नाराज असून अस्वस्थता दिवसेंदिवस वाढत आहे.

## 'मिठी नदीत गाळ की काळा पैसा?'

**व्यंगचित्रातून आदित्य ठाकरेंवर शिवसेनेची तीव्र टोलेबाजी!**




**मुंबई :** मिठी नदीतील गाळ उपसा घोटाळ्यावरून राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, या प्रकरणाचा धागा पकडून शिवसेनेने थेट व्यंगचित्राच्या माध्यमातून युवानेते आदित्य ठाकरेंवर जोरदार हल्ला चढवला आहे. शिवसेनेच्या अधिकृत सोशल मीडिया पेजेसवरून प्रसिद्ध करण्यात आलेल्या या व्यंगचित्रामुळे उबाठा गट आणि बॉलिवूड संबंध पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. मुंबई महापालिकेच्या मिठी नदी गाळ उपसा कामांमध्ये ६५ कोटी रुपयांहून अधिकचा घोटाळा झाल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेकडून चौकशी सुरू असून, बॉलिवूड अभिनेता दिनो मोरिया आणि त्यांचे बंधू सँतिनो मोरिया यांची नावे या चौकशीत सातत्याने पुढे येत आहेत. विशेष म्हणजे, या कामांचा कालावधी आदित्य ठाकरेंच्या उबाठा गटाच्या महापालिकेवरील सत्ताकाळातील आहे.

शिवसेनेने प्रसिद्ध केलेल्या व्यंगचित्रात मिठी नदी एक तिजोरी दाखवली असून, तिच्यातून एक उंदीर पैसे चोरण्याच्या हालचाली करत आहे. हे पैसे तो 'मातोश्री-२'नावाच्या बॅगेत टाकताना दाखवण्यात आले आहे. विशेष म्हणजे, या उंदराला युवानेते आदित्य ठाकरेंचा चेहरा लावून त्यांच्या कथित सहभागावर थेट बोट ठेवण्यात आले आहे. हे व्यंगचित्र सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहे. या व्यंगचित्रातून केवळ आदित्य ठाकरेच नव्हे, तर त्यांच्या बॉलिवूडशी असलेल्या जवळच्या संबंधांवरही टोला लगावण्यात आला आहे. या प्रकरणावरून ठाकरेंच्या राजकीय प्रतिमेला धक्का पोहोचवण्याचा प्रयत्न शिवसेनेकडून सुरू आहे, अशी चर्चा राजकीय वतुर्ळात सुरू आहे.

## लाडक्या बहिणीची आर्त हाक सरकारच्या कानावर पडेल का?



### पाटील, वडेट्टीवार, पवारांचा सवाल

■ महासागर प्रतिनिधी,

बीर्ड, दि. ३ : काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील व आमदार रोहित पवार यांनी अवकाळी पावसामुळे नुकसानीच्या फेऱ्यात अडकलेल्या शेतकऱ्यांना तत्काळ दिलासा देण्याची मागणी केली आहे. या तिन्ही नेत्यांनी यासंबंधी एक व्हिडिओ पोस्ट केला आहे. त्यात बीड जिल्ह्यातील एक गरीब शेतकरी महिला धायमोकलून रडताना दिसून येत आहे. गत आठवड्यात महाराष्ट्रात भयंकर अवकाळी पाऊस झाला. त्यात शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. नुकसानीचे अनेक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झालेत. या पार्श्वभूमीवर जयंत पाटील, विजय वडेट्टीवार व रोहित पवार यांनी एक व्हिडिओ पोस्ट करत सरकारला निकषांमध्ये न अडकता तत्काळ शेतकऱ्यांना मदत देण्याचे आवाहन केले आहे. या प्रकरणी त्यांनी बेताल विधाने करणाऱ्या कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनाही खडेबोल सुनावलेत.

सदर व्हिडिओत एक महिला शेतकरी टोमॅटोचा चिखल आपल्या तोंडावर हाणून घेताना दिसून येत आहे. ती आर्त टाहो फोडताना म्हणते, अरे देवा, हे काय झालं रं, भाऊ, तळहातावरील फोडासारखं जपलंलं पीक वाया गेलं हो, आता इतका खर्च भरून कसा निघणार, काही सुचत नाही. इतकी मेहनत घेतली, पण सगळं वाया गेलं, आता काय करू काही सुचत नाही. बीड जिल्ह्यातील आष्टी येथील राम गोरख शेळके यांनी मिस्त्रीचे काम करत ८० हजार रुपये गोळा केले. त्यातून त्यांनी सव्वा एकर क्षेत्रात सात हजार टोमॅटोच्या झाडाची लागवड केली. एप्रिल महिन्यात ठिबकने पाणी देऊन शेती फुलवली होती. पण ऐन तोडणीला आलेले टोमॅटो अवकाळी पावसामुळे हिरावले. शेतात सर्वत्र पाणी साचल्याने टोमॅटोची उभी बाग जळून गेली. आज शेतात सर्वत्र फक्त लाल चिखल झाला. टोमॅटो सडून गेले आहेत. हे पीक हाती लागले असते तर शेळके यांना जवळपास ७ लाख रुपयांचा फायदा झाला असता, पण दुर्दैवाने आज त्यांना १ रुपयाचेही उत्पन्न मिळाले नाही.

## हा तर 'ईमेल'वाला महिला आयोग

**रोहिणी खडसेंची चाकणकरांवर पुन्हा टीका; राजीनाम्याची मागणी**



■ महासागर प्रतिनिधी,

मुंबई, दि. ३ : वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर आज विधानभवनात महिला आयोगाच्या कार्यपद्धतीवर विशेष बैठक पार पडत असताना, राष्ट्रवादी (शरद पवार गट) महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष रोहिणी खडसेंनी थेट महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्यावर ताशेरे ओढले. हा आयोग म्हणजे मेलवर आलेल्या तक्रारी फॉरवर्ड करणारा ईमेल सेंटर झाला आहे, अशा शब्दांत रोहिणी खडसेंनी चाकणकरांवर निशाणा साधला.

रोहिणी खडसे म्हणाल्या की, आजची बैठक म्हणजे उशिरा सुचलेले शहाणपण आहे. वैष्णवी हगवणेचा जीव गेल्यावर आता बैठकीचे नाटक केले जात आहे. आधीच बैठक घेतली असती, आयोगाने तत्परतेने भूमिका घेतली असती, तर ही वेळ आली नसती. आयोग सध्या व्यक्तीकेंद्रित झाला आहे. सात सदस्यांची पदे रिक्त आहेत. सगळा कारभार एकट्याच व्यक्तीकडे आहे. आणि त्या महिलाध्यक्षा म्हणे, 'झिरो पेंडन्सी!' ह्व मेलवर आलेल्या तक्रारी पोलिस स्टेशनला पाठवल्या की काम संपते का? रोहिणी खडसे म्हणाल्या की, खेड्यापाड्यांतील सामान्य महिलांना मेल कसा करायचा माहितीही नसते. अशा महिलांची पोस्टाने आलेली तक्रार दुर्लक्षित होते, याचे उत्तर कोण देणार? प्रिया फुके यांनी एक वर्षापूर्वी पोस्टाने तक्रार केली होती. चाकणकर म्हणतात आमच्याकडे आलीच नाही. मग अशा व्यवस्थेवर महिलांनी विश्वास ठेवायचा तरी कसा? रोहिणी खडसे म्हणाल्या की, महिला अध्यक्षा दोन जबाबदाऱ्या सांभाळत आहेत. प्रत्यक्षात आयोगाच्या बैठका घेतल्या जात नाहीत, तक्रारींचे प्रत्यक्ष निराकरण होत नाही. सगळा वेळ पक्षाच्या कामात जातो. अशा परिस्थितीत त्यांनी तात्काळ राजीनामा द्यावा.

## कायदा करा, ईदही 'व्हर्च्युअल' साजरी करू

**राज्य अल्पसंख्याक आयोग अध्यक्ष प्यारे खान यांचे नीतेश राणेंना जोरदार प्रत्युत्तर**



■ महासागर प्रतिनिधी,

मुंबई, दि. ३ : मंत्री नीतेश राणे हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रतिमा मलिन करण्याच्या कट कारस्थानातील एक भाग असल्याचा आरोप राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांनी केला आहे. नीतेश राणे मुद्दाम देवेंद्र फडणवीस यांचे नाव घेऊन वादग्रस्त विधान करतात. यामुळे मुख्यमंत्र्यांची प्रतिमा मलिन होते. त्यांच्याविरोधात आयोगाकडे एक-दोन नव्हे तर तब्बल ४० तक्रारी आल्यात, असे ते म्हणालेत. यावेळी त्यांनी सरकारने व्हर्च्युअल ईद साजरी करण्याचा कायदा केला, तर त्याचे पालन करण्याचा टोलाही राणेंना लगावला. प्यारे खान म्हणाले की, नीतेश राणे वारंवार देवेंद्र फडणवीस यांचे नाव घेऊन बोलतात. ते महाराष्ट्राची बदनामी करण्याचा प्रयत्न करत आहेत. भारतीय मुस्लिम ईमानदार, तर पाकमध्ये गेलेले बेईमान आहेत. महाराष्ट्रात गोवंश हत्या बंदी कायद्याचे पालन व्हावे असे आम्हालाही वाटते.

पण बकऱ्यामुळे अनेकांना रोजगार मिळतो. त्यामुळे त्याच्या बळीवर बंदी घातल्यास हिंदू - मुस्लिम या दोन्ही समाजावर अन्याय होईल. राज्यात ज्या दिवशी व्हर्च्युअल ईद साजरी करण्याचा कायदा अस्तित्वात येईल, त्यादिवशी व्हर्च्युअल ईद साजरी केली जाईल. सध्या जो कायदा अस्तित्वात आहे, त्यानुसार ईद साजरी केली जात आहे. गो हत्या बंदी आहे, तो कायदा आहे. त्याचे पालन व्हायलाच पाहिजे, असे ते म्हणाले.

**नीतेश राणेंवर निश्चितच कारवाई होईल**

प्यारे खान पुढे म्हणाले, देवेंद्र फडणवीस केवळ हिंदू समाजाचे मुख्यमंत्री नाहीत. ते सर्वांचे आहेत. ते सर्वांचे काम करतात. त्यामुळे नीतेश राणे यांनी त्यांच्यावर बोलण्यापूर्वी स्वत:ची प्रतिमा तयार करावी. फडणवीसांना संपूर्ण जग ओळखते. तुम्ही स्वत:चे वैयक्तिक मत मांडा. त्यात इतरांना समाविष्ट करू नका. नीतेश राणेंवर देवेंद्र फडणवीस यांचे संस्कार असते तर ते असे वागले नसते. काही चुकीचे होत असेल तर नीतेश राणेंवर निश्चितच कारवाई केली जाईल. प्यारे खान यांनी यावेळी भाजप सरकारचे गुणगानही गायिले. भाजप सरकार ईमानदार आहे. त्यांच्या सरकारमध्ये चुकीचे काही चालत नाही. भाजपने चुकीचे वागणाऱ्यांवर कारवाई केली आहे. त्यामुळे आता नीतेश राणे यांचा नंबर लागण्याची शक्यता आहे. मी नीतेश यांच्याविरोधात मुख्यमंत्र्यांकडे तक्रार आहे, असे ते म्हणाले.

**काय म्हणाले होते नीतेश राणे?**

नीतेश राणे यांनी सोमवारी मुस्लिम समाजाला बकरी ईद व्हर्च्युअल पद्धतीने साजरे करण्याचा उपरोधिक सल्ला दिला होता. मुस्लिम समाजाच्या धार्मिक नेत्यांनी पर्यावरणपूरक बकरी ईद साजरी करण्याचे आवाहन करावे. असे झाले तर अनावश्यक समस्यांना आळा बसेल. विशेषत: हिंदूंना आपल्या समाजात निर्बंधांचा सामना करावा लागणार नाही, असे ते म्हणाले. विहित नियम आणि कायद्यांचे पालन न करता बकऱ्यांची कुर्बानी दिल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## अजित पवारांच्या राष्ट्रवादीचा १० जून रोजी पुण्यामध्ये राज्यव्यापी कार्यक्रम



■ महासागर प्रतिनिधी,

पुणे, दि. ३ : शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी हे दोन्ही पक्ष एकत्र येतील अशा जोरदार राजकीय चर्चा सुरू असतानाच आता दोन्ही पक्षांचा एकाच दिवशी (१० जून) होणारा वर्धापन दिन चर्चेत आला आहे. अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने पुण्यात बालेवाडी क्रीडा संकुलात वर्धापन दिन मेळावा आयोजित केला आहे, तर शरद पवार गटाकडूनही तयारी सुरू आहे. दरम्यान, मेळाव्याच्या एक दिवस अगोदर ९ तारखेला हे दोन्ही पवार पुन्हा एका बैठकीच्या निमित्ताने एकत्र भेटणार असल्याची माहिती आहे.

अजित पवारांनी शरद पवारांपासून वेगळे होत पक्षावर वर्चस्व मिळवलेच, पण भाजपसोबत जाऊन सत्ताही मिळिवली. अनेक नाट्यमय घडामोडींनंतर आता अजित पवार आणि शरद पवार हे दोन्ही नेते पुन्हा एकत्र येतील अशी अटकळ बांधली जात आहे.

पुण्यातील साखर संकुलात जेव्हा जेव्हा हे दोन्ही बैठकीसाठी येतात तेव्हा तेव्हा दोघांत होणाऱ्या चर्चेकडे दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीकरण म्हणून पाहिले जाते. रविवारची बैठक, सुप्रिया सुळे परदेशातून आल्यानंतर होणाऱ्या घडामोडी, ९ जून रोजी पुन्हा साखर संकुलात होणारी बैठक या घडामोडीत आता लक्ष लागून राहिले आहे. सुप्रिया सुळे यांची भूमिका काय राहते हे या आठवड्यात स्पष्ट होईलच.

## पंकजा मुंडे-धनंजयमुंडे ११ वर्षानंतर गोपीनाथ मुंडेंच्या पुण्यतिथीला एकत्र



**बीड :** भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा माजी केंद्रीय मंत्री स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांची आज पुण्यतिथी आहे. या निमित्ताने गोपीनाथ गडावर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात पंकजा मुंडे-धनंजय मुंडे ११ वर्षानंतर गोपीनाथ मुंडेंच्या पुण्यतिथीला एकत्र येत आहे. यावर पत्रकारांनी विचालेल्या प्रश्नावर पंकजा यांनी प्रतिक्रिया दिली आहे. राष्ट्रवादी आमचा मित्रपक्ष असल्याने त्या पक्षातील नेत्यांना निमंत्रण दिले असल्याचे त्यांनी म्हटले आहे. या संबंधी पंकजा मुंडे म्हणाल्या की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा आमचा आता मित्र पक्ष आहे. त्यामुळे त्या पक्षाच्या सर्व नेत्यांना आम्ही निमंत्रण दिले आहे. तसेच धनंजय मुंडे यांना देखील आमंत्रण देण्यात आले आहे. त्या ठिकाणी कीर्तनाचा कार्यक्रम आहे. धनंजय मुंडे हे तर माझे भाऊच आहेत. त्यामुळे तो नक्कीच या कीर्तनाला उपस्थित राहील, असे देखील पंकजा मुंडे यांनी म्हटले आहे. अकरा वर्षानंतर धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे या कार्यक्रमात एकाच व्यासपीठावर येत आहे. यावर त्यांनी ही प्रतिक्रिया दिली आहे.

## नारायण ॲग्रो इंडस्ट्रीज तसेच श्रीराम राईसमिल यांचेवर मकोका अंतर्गत कारवाई करा

**किशोर कऱ्हाडेंची प्रधान सचिवांकडे तक्रार**

**देसाईगंज:** पणन हंगाम २०२१-२२मध्ये नारायण ॲग्रो इंडस्ट्रीज रामानुजपुर ता.सिरोंचा व श्रीराम राईसमिल कुनघाडा ता.चामोर्शी दोन्ही जिल्हा-गडचिरोलीांचे मानवी खाण्यास अयोग्य तांदूळ नमुने आढळून आले होते.त्यामुळे सदर दोन्ही राईसमिलवर जीवनावश्यक वस्तु अधिनियमांतर्गत कारवाई करण्यासह कायमस्वरूपी काळ्या यादीत टाकुन या गैरव्यवहारात मदत करणाऱ्या संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांसह सर्वांवर मकोका अंतर्गत कारवाई करण्याची मागणी देसाईगंज सिटीझन फोरमचे अध्यक्ष किशोर कऱ्हाडे यांनी राज्याच्या अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे प्रधान सचिव यांचेकडे केलेल्या तक्रारीतुन केली आहे. केलेल्या तक्रारीत किशोर कऱ्हाडे यांनी नमूद केले आहे की पणन हंगाम २०२१-२२मध्ये केंद्र शासनाच्या पथकाने केलेल्या तपासणीत नारायण ॲग्रो इंडस्ट्रीज रामानुजपुर व श्रीराम राईसमिल कुनघाडा यांचे मानवी खाण्यास अयोग्य तांदूळ आढळून आले होते.त्या अनुषंगाने अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे पत्र क्रमांक खरेदी २६२२/प्र.क्र ९९/ना.पु.२९ दि.२० जुलै २०२२ रोजी जिल्हाधिकारी गडचिरोली यांना सदर राईसमिलवर जीवनावश्यक वस्तु कायदा १९८०/१९५५ चे कलम ३(ळ)नुसार कारवाई करून कायमस्वरूपी काळ्या यादीत टाकण्याचे आदेश दिलेले होते.त्यानुसार तत्कालीन गडचिरोली जिल्हाधिकारी संजय मिना यांनी वरील दोनही राईसमिलला त्यांचे पत्र क्र. पुरवठा/कार्यालय ११/सिएमआर/कावि ४५३ /२०२२ तसेच पत्र क्र. पुरवठा/कार्या ११/सिएमआर/काहि ४५६ /२०२२ नुसार दि.१४ डिसेंबर २०२२ रोजी जीवनावश्यक वस्तु कायद्यातील तरतुदी व्यतिरिक्त कमीत कमी ३ वर्षाकरीता काळ्या यादीत का टाकण्यात येऊ नये,असे कारणे दाखवा नोटीस बजावले होते. परंतु त्यानंतर तत्कालीन गडचिरोली जिल्हाधिकारी संजय मिना यांनी वरील दोन्ही राईसमिलवर कोणतीही कारवाई न करता त्यांना अभय दिले होते.त्यामुळे वरील दोन्ही राईसमिलर्सना आजपर्यंत बेकायदेशीरपणे भरडाईचे काम देणे सुरु आहे.त्यामुळे जिल्हाधिकारी गडचिरोली यांना वरील दोन्ही राईसमिलवर तात्काळ जीवनावश्यक वस्तू कायद्यातील तरतुदी व्यतिरिक्त कायमस्वरूपी काळ्या यादीत टाकण्यात यावे तसेच या गैरव्यवहारात मदत करणाऱ्या संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी संघटितपणे गैरव्यवहारात केला असल्याने मकोका अंतर्गत कारवाई करण्याची मागणी केली आहे.

## सर्व पक्षीय खासदारांच्या शिष्टमंडळाने परदेशात काय दिवे लावले?



■ महासागर प्रतिनिधी,

मुंबई, दि. ३ : जगामध्ये भारताला एकही मित्र राहिलेला नाही. जगात भारताची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. खासदारांचे शिष्टमंडळ परदेशात जाऊन गाणी म्हणत असल्याचा आरोप उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे. सर्व पक्षीय खासदारांच्या शिष्टमंडळाने परदेशात काय दिवे लावले? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. भारताच्या बाजूने जगातील एकही देश उभा राहण्यास तयार नाही. याला केवळ नरेंद्र मोदी आणि त्यांच्या सरकारची फसलेली विदेशी निती जबाबदार असल्याचा दावा देखील संजय राऊत यांनी केला आहे. शेजारील देश नेपाळ सुद्धा आपल्या बाजूने उभा राहण्यास तयार नाही. विदेश नीतीचे हे अपयश आणि नरेंद्र मोदी यांची पूर्णपणे बिघडलेली प्रतिमा यासाठी कारणीभूत असल्याचा दावा देखील संजय राऊत यांनी केला आहे. या संदर्भात पत्रकारांशी बोलताना संजय राऊत म्हणाले की, जगामध्ये भारताची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. पहलगाम हल्ल्यानंतर भारताच्या बाजूने कोणीही उभी राहिले नाही. भारतासारख्या एवढ्या मोठ्या देशाला जगात एकही मित्र नाही, असा आरोप संजय राऊत यांनी केला आहे. खासदारांच्या शिष्टमंडळाने परदेशात काय दिवे लावले? ते परदेशात जाऊन गाणी म्हणत आहेत. आणि कोणत्या ते कोणत्या कामासाठी कोणत्या देशात गेले? यावरूनही राऊत यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केला. खासदारांचे शिष्टमंडळ ज्या देशांमध्ये गेले आहेत, त्यावर देखील संजय राऊत यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. या देशांचा आणि भारत -पाकिस्तान संघर्षाचा काहीही संबंध नाही. अशा देशात देखील शिष्टमंडळ पाठवण्यात आले आहे. मात्र, त्यांना विश्व-गुरूंनी पाठवलेले असल्यामुळे त्यांना जावे लागले, असे देखील संजय राऊत यांनी म्हटले आहे.

## राजेंद्र आणि सुशील हगवणेला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी,नीलेश चव्हाणला पोलिस कोठडी

■ महासागर प्रतिनिधी,

पुणे, दि. ३ : वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणात आरोपी सासरा राजेंद्र हगवणे आणि दीर सुशील हगवणे यांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. तर सहआरोपी नीलेश चव्हाण याला ७ जूनपर्यंत पोलिस कोठडी देण्यात आली आहे. आज या प्रकरणातील तिन्ही आरोपींना बावधन पोलिसांनी न्यायालयात हजर केले होते. त्यांची पोलिस कोठडी संपल्याने पुन्हा सुनावणी झाली. पिंपरी-चिंचवडपोलिसांनी तीनही आरोपींची एकत्रित चौकशी आवश्यक असल्याचे सांगत पुन्हा पोलिस कोठडी मागितली होती. मात्र, न्यायालयाने राजेंद्र आणि सुशील हगवणेला न्यायालयीन कोठडीत पाठवत, नीलेश चव्हाणसाठी पोलिस कोठडी कायम ठेवली आहे.

न्यायालयात नेमके काय घडले?

सरकारी वकिलांनी आपली बाजू मांडताना काही महत्त्वाचे मुद्दे उपस्थित केले. यात नीलेश चव्हाणकडून अनेक मोबाईल जप्त करण्यात आले आहेत. तसेच हगवणे कुटुंबीयांचे दोन मोबाईल हे नीलेश चव्हाणकडे होते, असेही न्यायालयात सांगितले. तसेच नीलेश आणि हगवणे कुटुंबीय यांच्यात चॅट झाले असून दोघांमध्ये आर्थिक व्यवहार देखील झाला असल्याचे सरकारी वकिलांनी सांगितले आहे. याचसोबत वैष्णवीचे बाळ सुद्धा नीलेशकडे होते, त्याने त्या बाळाची हेळसांड केली आहे का? याचा तपास



**वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरण**

करायचा असून पाच दिवसांची कोठडी नीलेशला देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली होती. तर दुसरीकडे नीलेश चव्हाणचे वकिलांनी सांगितले की नीलेशची चौकशी पूर्ण झाली आहे. एकही मुद्दा शिल्लक राहिलेला नाही. यामुळे नीलेशला न्यायालयीन कोठडी झाली पाहिजे, अशी बाजू नीलेशच्या वकिलांनी मांडली होती. वैष्णवीने सासरच्या त्रासातून वैफल्यग्रस्त होऊन आत्महत्या केली, असे पहिले चित्र होते. मात्र ही आत्महत्या नसून हत्या असावी, असा गंभीर संशय वैष्णवीच्या माहेरच्यांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे आता पोलिसांकडून या प्रकरणाचा सर्व बाजूंनी सखोल तपास सुरू आहे. वैष्णवीने साडीच्या सहाय्याने घरातील पंख्याला गळफास लावून आत्महत्या केल्याचे सांगण्यात आले आहे. तिचे वजन ७१ किलो असल्याचे पंचनाम्यात नमूद आहे. त्यामुळे घरातील पंखा एवढे वजन पेलू शकतो का, याबाबतही आता तपास सुरू करण्यात आला आहे.

यासाठी साडी आणि पंखा न्यायवैद्यक प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत. याचप्रमाणे, सहआरोपी नीलेश चव्हाणच्या ताब्यातून जप्त केलेले मोबाईल आणि लॅपटॉप देखील तपासासाठी पाठवण्यात आले आहेत. नीलेशच्या लॅपटॉपमध्ये काही संशयास्पद व्हिडिओ क्लिप असल्याचा आरोप करण्यात आला आहे. मात्र, तो लॅपटॉप माझा नाही, असा दावा नीलेशने पोलिसांसमोर केला आहे. या लॅपटॉपचीही तपासणी केली जात आहे, आणि अहवाल आल्यानंतर त्यामधील माहितीचा खुलासा होणार आहे.

# स्वत:साठी आणलेली दारू मुलाने ढोसली मुलावर काठीने वार:वडिलाकडून खून




■ महासागर प्रतिनिधी,

**अमरावती , दि. ३ :** एखादे व्यसन माणसाला कोणत्या थराला घेऊन जाईल याचा काही नेम नाही, हे वरुड तालुक्यात सोमवारी सकाळी एका घटनेतून सिद्ध झाले आहे. बहादा येथील एका ६२ वर्षीय वृद्धाने स्वत:साठी दारू आणून घरात ठेवली. परंतु ही दारू त्या वृद्धाच्या ३२ वर्षीय मुलाने ढोसली. या कारणातून पिता पुत्रांमध्ये वाद झाला. त्यानंतर पित्याने मुलाच्या डोक्यात ?काठी मारली. या काठीच्या प्रहारामुळे मुलाचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

दिलीप हिरामण धुर्वे (३२, रा.बहादा, वरुड) असे मृताचे तर हिरामण झिट्टू धुर्वे (६२, रा. बहादा) असे मारेकरी पित्याचे नाव आहे. या प्रकरणी वरुड पोलिसांनी गुन्हा दाखल करून हिरामण धुर्वेला अटक केली आहे.सोमवारी सकाळी हिरामण धुर्वेने स्वत:साठी दारू घरी आणून ठेवली व तो बाहेर गेला. काही वेळानंतर घरी परत आल्यावर ठेवलेली दारू दिसली नाही. त्याचवेळी मुलगा दिलीप हा दारू पिऊन घरात झोपल्याचे दिसले. त्याच कारणातून त्याने मुलासोबत वाद घातला. काही वेळातच वाद निवळला.

मात्र हिरामणच्या मनातील राग शांत झाला नव्हता.

साडेदहा वाजताच्या सुमारास हिरामण बाहेरून घरी गेला,त्यावेळी दिलीप झोपलेलाच असताना हिरामणने त्याचा डोक्यात काठीने दोन ते तीन जोरदार प्रहार केले. त्यानंतर दिलीप जागेवरून उठलाच नाही. यावेळी दिलीपची आई बाहेर होती तर पत्नी घराजवळच काम करत होती.काही वेळानंतर दिलीपची पत्नी गेल्यानंतर तिला दिलीप निपचित पडलेला दिसला. तिने आरडाओरड केली. त्यामुळे दिलीपची आईसुद्धा बाहेरून घरात गेली.

दिलीपला आवाज देऊनही तो उठत नव्हता, त्यावेळी हिरामणने आपणच त्याला मारल्याचे सांगितले. या घटनेची माहिती मिळताच वरुडचे ठाणेदार अर्जुन ठोसरे पथकासह तातडीने बहादा गावात पोहोचले. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेत उत्तरीय तपासणीसाठी पाठवला. त्यानंतर हिरामण धुर्वेला अटक केली आहे.

# महावितरणच्या एसडीईच्या खुर्चीवर बेशरमचे झाड ठेवून निषेध



■ महासागर प्रतिनिधी,

**दर्यापूर, दि. ३ :** तालुक्यातील थिलोरी येथे गेल्या कित्येक वर्षांपासून विद्युत पुरवठा नियमित व सुरळीत होत नाही. त्यामुळे चिडलेल्या ग्रामस्थांनी सोमवारी येथील उपविभागीय अभियंत्यांच्या (एसडीई) रिकाम्या खुर्चीवर बेशरमचे झाड ठेवून निषेध नोंदवला. दरम्यान आठवडाभरात थिलोरी येथील वीजपुरवठा सुरळीत न झाल्यास तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा आता ग्रामस्थांनी दिला आहे. या अनोख्या आंदोलनामुळे महावितरणच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह लागले आहे. सध्या महावितरणचा सुरक्षा सप्ताह सुरू आहे. परंतु असे असताना या विभागाने जनतेची सुरक्षा मात्र वाऱ्यावर सोडली, असा संदेश या आंदोलनातून देण्यात आला. थिलोरी येथील वीज पुरवठा नियमित व्हावा म्हणून उपविभागीय अभियंता कार्यालयास वारंवार निवेदने दिली. परंतु या निवेदनांची महावितरणाच्या अधिकाऱ्यांनी दखल न घेता त्यास केराची टोपली दाखवली, असा आंदोलनकर्त्यांचा आरोप आहे. उन्हाळ्यात वीज पुरवठा खंडित होत असल्याने याचा नाहक त्रास ग्रामस्थांना सोसावा लागला. संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी थेट महावितरण कार्यालय गाठून कार्यालयाच्या आवारात ठिय्या आंदोलन केले. दरम्यान उपकार्यकारी अभियंता विक्रम काटोले वेळेवर हजर न झाल्याने ग्रामस्थांनी त्यांच्या रिकाम्या खुर्चीवर बेशरमचे झाड ठेवून निषेध केला. ग्रामीण भागात महावितरणच्या वतीने इलेक्ट्रिक पोलवर चिनीमातीचे डिश लावले आहेत. पावसाळ्यात ते लवकर खराब होतात. परिणामी वीज पुरवठा खंडित होत आहे. दर्यापूर येथून थिलोरीला वीज पुरवठा करावा सध्या आमला येथून थिलोरीला वीज पुरवठा होतो. मात्र वीज पुरवठा हा आमला येथून न करता दर्यापूर येथून सुरू करावा अशी मागणीही ग्रामस्थांनी केली आहे.

# अवैधरित्या विक्री होणारे २११ बॅग खत जप्त

## कृषी व पोलिस विभागाची कारवाई?



**पुसद :** अवैधरित्या विक्री करण्यासाठी आणण्यात आलेल्या खताच्या तब्बल २११ बँग जप्त करण्यात आल्या. तब्बल २ लाख ८८ हजार रुपये किमतीचा हा खताचा साठा जप्त करण्याची कारवाई पुसद तालुक्यातील सावंगी या गावी कृषी आणि पोलिस विभागाने संयुक्तरित्या केली. या कारवाईनंतर विनापरवाना खताची विक्री बेभमपणे सुरू असल्याची गंभीर बाब उघड झाली आहे. या प्रकरणी सविस्तर असे की, तालुक्यातील सावंगी येथून पुसदमध्ये मोठ्या प्रमाणात अवैधरित्या खताची विक्री होत असल्याची प्राथमिक माहिती कृषी व पोलिस विभागाला मिळाली होती. त्यानंतर ट्रकमधून २११ बॅग खताची मोठ्या प्रमाणात अवैधरित्या व विनापरवाना गावात खुलेआम विक्री होत असल्याचे उघडकीस आले. सावंगी बान्सी मार्गे मंगरूळ तालुक्यातून पुसद तालुक्यातील सांवगी येथे श्री ओम साई फर्टिलायझरचे गुजरातच्या सुरत येथील कंपनीतून आलेले किसान गोल्ड व कृषिरत्न या नावाचे खत अनधिकृतपणे शेतकऱ्यांना विक्री करीता येत असल्याचे आढळून आले आहे. विक्री करणाऱ्यांची माहिती प्रशासनास द्यावी जिल्हा कृषी अधिकारी डाबरे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका कृषी अधिकारी विजय मुकाडे, मोहीम अधिकारी प्रवीण जाधव, पंचायत समितीचे कृषी अधिकारी शंकर राठोड, तांत्रिक अधिकारी नितीन घाडगे, कृषी पर्यवेक्षक प्रफुल महेंद्र, कृषी सहाय्यक अंभोरे व नरवाडे यांच्या पथकाने सांगवी येथे २ लाख ८८ हजार ८८७ रूपये किंमतीच्या २११ खतांच्या बॅग जप्त केल्या आहेत.

# जिल्हा बालकल्याण समितीद्वारे वर्षभरात ५५० बालकांचे संरक्षण

## १५ विवाहही रोखले



■ महासागर प्रतिनिधी,

**अमरावती , दि. ३ :** जन्मत: सोडून दिलेल्या बेवारस, शोषणग्रस्त किंवा समाजाने दुर्लक्षित केलेल्या बालकांची काळजी घेऊन त्यांना संरक्षण देण्यासाठी सन २०१५ चा बाल न्याय कायदा (बालकांची काळजी व संरक्षण) आहे. या कायद्यान्वये प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी जिल्हा बालकल्याण समिती स्थापन करण्यात आली असून या समितीद्वारे सदर कार्य केले जाते. अमरावतीतही अशी समिती आहे. महिलांच्या नेतृत्वात चालणाऱ्या या समितीमार्फत गेल्या वर्षभरात ५५० बालकांचे जगणे संरक्षित झाले असून सुमारे १५ बालविवाह रोखण्यात आले आहे. या समितीच्या एक सदस्य सुचिता बर्वे यांच्याशी झालेल्या चर्चेअंती समितीच्या एकूणच कामाचा आवाका स्पष्ट झाला.

राज्य शासनाच्या महिला व बालविकास विभागाच्या हातात हात मिसळून ही समिती काम करते. या समितीला अर्धन्यायिक दर्जा (कॉसीज्युडीयस) आहे. त्यामुळे सदर समिती सुनावणी घेऊन दोषीवर योग्य ती कारवाईसुद्धा करु शकते. प्रकरणाची गंभीरता व त्यासंदर्भात हाती आलेले पुरावे या आधारे तसा निर्णय घेतला जातो. ही समिती पाच सदस्यीय असून तिचे अध्यक्षपद महिलेकडे असणे अनिवार्य आहे. शिवाय चार सदस्यांपैकी एक सदस्यही महिला असणे आवश्यक आहे. जमेची बाब अशी की सध्या पाचही पदाधिकारी ह्या महिलाच आहेत. यामध्ये अध्यक्ष किरण पुन्शी (मिश्रा), सदस्य दीपाली महाजन, सारिका तेलखडे व सुचिता बर्वे यांचा समावेश आहे. या सर्वांचा कार्यकाळ तीन वर्षांचा आहे.

**बालविवाहाच्या प्रकरणांची दखल घेणे –**बाल विवाहाची कुठेही शंका आल्यास, बाल कल्याण समिती थेट दखल घेऊन चौकशी करू शकते. एखाद्या बालकाच्या तक्रारीवरून, पोलिसांकडून किंवा समाजातील व्यक्तीकडून तक्रार प्राप्त झाल्यास समिती लगेच कार्यवाही करण्यासाठी पुढाकार घेते. गेल्या वर्षभरात अशा १५ प्रकरणांमध्ये हस्तक्षेप करुन संबंधित बालकांना न्याय मिळवून देण्यात आला. समाजिक उत्तरदायित्वाचा एक भाग म्हणून अशा प्रकरणात संबंधित बालकांची नावे घोषित केली जात नाही. तशी पथ्य पाळली जाते. त्यानंतर संबंधित बालकाला बालकाला तात्पुरत्या निवासगृहात (शेल्टर होम) ठेवले जाते. त्याला वैद्यकीय, मानसिक व कायदेशीर सहाय्य उपलब्ध करून दिले जाते. झालेला बालविवाह रद्दही करता येतो.

बालविवाह प्रतिबंधक कायदा, २००६ (द प्रोहिबिशन ऑफ चाइल्ड मॅरेज अॅक्ट २००६) नुसार बाल विवाह झाल्यास किंवा होण्याच्या प्रक्रियेत असतानाही समिती संबंधित पोलिसांना माहिती देऊन प्रकरण नोंदवू शकते. तसेच बाल विवाह बाल विवाह झाल्याची तक्रार मिळाल्यास समिती स्वतः तपास करून अहवाल तयार करते. त्यानंतर तो रद्द करण्यासाठी कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यास मदत करते.एवढेच नव्हे तर बाल विवाह रोखण्यासाठी समाजातील पालक आणि संबंधित व्यक्तींचे कायदेशीर आणि सामाजिक दृष्टीने समुपदेशन केले जाते.

# विविध मागण्यांसाठी बीएसएनएल सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची निदर्शने

**हक्काचा लाभ देण्यात यावा, या मागणीसाठी बीएसएनएलच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी बीएसएनएल कार्यालयासमोर निदर्शने केली**

■ महासागर प्रतिनिधी,

**बुलडाणा, दि. ३ :** हक्काचा लाभ देण्यात यावा, या मागणीसाठी बीएसएनएलच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी आज २ जून रोजी जिल्ह्यातील खामगाव, बुलडाणा, चिखली येथील बीएसएनएल कार्यालयासमोर निदर्शने केली. यावेळी कर्मचाऱ्यांनी घोषणाबाजी करून परिसर दणाणून सोडला होता. बीएसएनएल मधील जवळपास २०० सेवानिवृत्त एससी, एसटी कर्मचाऱ्यांना जात पडताळणीच्या नावाखाली त्यांच्या हक्काचे पैसे दिले जात नाहीत. एवढेच नव्हे तर त्यांचा मानसिक छळ करण्याचे काम प्रशासनाकडून होत आहे. २०१९ मध्ये व्हीआरएसच्या माध्यमातून व्हिजिलन्स क्लेअरंस देऊन त्यांना टारगेट करण्यात येत आहे. त्यांच्या हक्काचे पैसे त्यांना नाकारण्यात आले आहेत. तसेच जात पडताळणीसाठी त्यांच्यावर दबाव आणून त्यांना हेतुपुरस्सर त्रास देण्याचे काम बीएसएनएल मॅनेजमेंट करत आहे. विशेष म्हणजे डिपार्टमेंट ऑफ टेलिकम्युनिकेशन सेंट्रल गव्हर्मेंट यांच्या ऑर्डर्स कर्मचाऱ्यांच्या बाजूने असताना देखील त्यांना त्रास देण्याचे काम बीएसएनएल व सीलीए डीओटी मॅनेजमेंट करत आहे. या निषेधार्थ आज २ जून रोजी जेवण्याच्या सुट्टीत बीएसएनएलच्या मुख्य कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली.


**MAHAVITARAN** Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**Short e-Tender Notice**

The Executive Engineer, MSEDCL, Civil Lines Division invites e-Tender in Two Bid System from Experienced and Reputed Agencies having experience of similar work in MSEDCL & completing the formalities for **"Annual Contract for Monthly Meter Reading of IP & CT meter Consumers under Lashkaribagh Sub-Division of Civil Lines Division (With CMRI for CT meter & without CMRI for IP Consumers) and Annual Contract for Monthly Meter Reading of IP & CT meter Consumers under Civil Lines Sub-Division of Civil Lines Division (With CMRI for CT meter & without CMRI for IP Consumers" having Tender No. EE/CLDN/T/CT-IP reading/25-26/T-01 for amounting Rs.30/-lakh & EE/CLDN/T/CT-IP reading/25-26/T-02 for amounting Rs.10/-lakh.** The Tender fees & other details are available on website **etender.mahadiscom.in/eatApp//.** The Tender documents can be downloaded from aforesaid website from **dt.04.06.2025.** Submit the tender duly filled in on or before **dt.10.06.2025 before 14:00 Hrs.**

**PRO.No. 65/2025**

**Executive Engineer O&M, MSEDCL**
**Civil Lines Division, Nagpur**



कार्यालय

**ग्रामपंचायत शिरूळ**

**पंचायत समिती हिंगणा, जिल्हा परिषद नागपूर**

**ग्रा.पं.शिरूळ अंतर्गत सामान्य फंड योजणे तुन दिवाबत्ती साहित्य (विद्युत साहित्य ) खरेदी करण्याकरिता व इतर साहित्य खरेदी करिता ई –निविदा ऑनलाईन मांगविण्यात येत आहे .**

**सूचना क्रमांक – ०२-२०२५/२६ (ई –निविदा) (दुसरी वेळ)**

ग्रा .पं. शिरूळ ,दिवाबती, साहित्य खरेदी करण्याकरिता जिल्हा परिषद वेबसाईटवर http://www.mahatenders.gov.inया संकेत स्थळावर ई – निविदा प्रसिद्ध करण्यात येत आहे.

१) दरपत्रकविक्रीचा दिनांक:- ०२/०६/२०२५ ला दुपारी ०३.०० वा प्रसिद्ध करण्यात येईल.

२) दरपत्रक स्वीकृतीचा अंतिम दिनांक :०७/०६/२०२५ ला दुपारी ३.०० वा पर्यंत उपलब्ध राहील .

३) दरपत्रक उघडण्याच्या दिनांक:-०९/०६/२०२५ ला सकाळी १०.०० वाजता किवा सोईनुसार उघडण्यात येईल.

-स्वा-
सरपंच / ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत शिरूळ
पं.स.हिंगणा , जि.पं.नागपूर



**जी. जी. दांडेकर प्रॉपर्टीज लिमिटेड**

(पूर्वीचे नाव जी. जी. दांडेकर मशीन वर्क्स लिमिटेड)
**नोंदणीकृत कार्यालय:** बी 211/ए, एम आय डी सी बुटीबोरी इंडस्ट्रियल एरिया, किन्ही, तालुका हिंगणा, जिल्हा नागपूर 441122
**सीआयएन:** L70100MH1938PLC002869,
**ईमेल:** cs@ggdandekar.com, **वेबसाईट:** www.ggdandekar.com, **दूरध्वनी:** 07103-295109

**वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना**

यादवारे सूचना देण्यात येत आहे की **जी. जी. दांडेकर प्रॉपर्टीज लिमिटेड (पूर्वीचे नाव जी. जी. दांडेकर मशीन वर्क्स लिमिटेड)** ('कंपनी') च्या सदस्यांची ८६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा **शनिवार, दिनांक २८ जून २०२५ रोजी सकाळी ११. ०० वाजता (भारतीय प्रमाण वेळेनुसार)** व्हिडिओ कॉन्फरन्सिंग ('व्ही सी') किंवा इतर ऑडिओ-व्हिज्युअल मीन्स ('ओ ए वी एम') सुविधेद्वारे होणार आहे. ही सभा कंपनी कायदा, २०१३ ('अधिनियम') च्या तरतुदींचे पालन करून आणि त्यासंबंधीचे नियम व त्यासह जी सामान्य परिपत्रके वाचली जावीत क्र. १४/ २०२० दिनांक ८ एप्रिल २०२० चे, क्रमांक १७/२०२० दिनांक १३ एप्रिल २०२० चे, क्रमांक २२/२०२० दिनांक १५ जून २०२० चे, क्रमांक ३३/२०२० दिनांक २८ सप्टेंबर २०२० चे, क्र. ३९/२०२० दिनांक ३१ डिसेंबर २०२० चे, क्रमांक १०/२०२१ दिनांक २३ जून २०२१ चे, क्रमांक २०/२०२१ दिनांक ०८ डिसेंबर २०२१ चे, क्रमांक ३/२०२२ दिनांक ५ मे २०२२ चे, क्रमांक २/२०२22 दिनांक २८ डिसेंबर २०२२ चे, क्रमांक ०९/२०२३ दिनांक २५ सप्टेंबर २०२३ चे, आणि क्रमांक ०९/२०२४ दिनांक १९ सप्टेंबर २०२४ चे कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने जारी केलेले (यापुढे " एम सी ए परिपत्रके" म्हणून संदर्भित) आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट) रेग्युलेशन्स, २०१५, सेबी परिपत्रक क्रमांक SEBI/CCMDHO/1 /CIR/P/2020/79 दिनांक 12 मे २०२० चे, क्रमांक SEBI/HO/CFD/CMD2/CIR/P/2021/11 दिनांक 15 जानेवारी २०२१ चे, क्रमांक SEBI/HO/CFD/CMD2/CIR /P/2022/62, दिनांक 13 मे २०२२ चे क्रमांक SEBI/HO/CFD/PoD-2/P/CIR/2023/167 आणि दिनांक ०७ ऑक्टोबर २०२३ चे क्रमांक SEBI/HO/CFD/PoD-2/P/CIR/2024/133 (यापुढे "सेबी परिपत्रके" म्हणून संदर्भित), या सर्वांच्यानुसार सभेच्या सूचनेमध्ये नमूद केल्यानुसार ठरावांसंबंधी व्यवहार करण्यासाठी घेण्यात येणार आहे.

उपरोक्त एमसीए परिपत्रके आणि सेबी परिपत्रकांचे पालन करून, कंपनी कायदा, २०१३च्या कलम १०२ आणि त्याखालील सुधारणांसह त्याखालील नियमानुसारच्या नोटीसला जोडलेल्या विधानासह वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना केवळ इलेक्ट्रॉनिक पद्धतीने अश्या सदस्यांना पाठवण्यात येईल की ज्या सदस्यांचे ईमेल पत्ते कंपनी / डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स (डीपी) / रजिस्ट्रार अँड शेअर ट्रान्सफर एजन्ट एम यू जी एफ इनटाइम इंडिया प्राईव्हेट लिमिटेड (पूर्वीचे नाव लिंक इनटाइम इंडिया प्राईव्हेट लिमिटेड) (आर अँड टी एजंट) यांच्या कडे नोंदणीकृत आहेत. उपरोक्त सूचना कंपनीच्या वेबसाइटवर www.ggdandekar.com वर तसेच, स्टॉक एक्स्चेंजच्या वेबसाइटवर म्हणजेच बीएसई लिमिटेड www.bseindia.com वर देखील उपलब्ध आहे.

कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १०८ आणि कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ च्या नियम २० च्या तरतुदींनुसार आणि वेळोवेळी सुधारित केल्यानुसार, नियमन ४४ सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट) रेग्यूलेशन्स, २०१५, इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडियाने जारी केलेले सेक्रेटरीयल स्टँडर्ड ऑन जनरल मीटिंग्स (एस एस -२) त्याखालील सुधारणांसह, दिनांक शुक्रवार २० जून २०२५ रोजी कट-ऑफ डेट असल्याने त्या दिवशी समभाग धारण करणाऱ्या सभासदांना कंपनी वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या सर्व ठरावांवर मत देण्यासाठी त्यांचा अधिकार इलेक्ट्रॉनिक पद्धतीने वापरण्याची सुविधा देत आहे. सभासद सभेच्या ठिकाणाव्यतिरिक्त ('रिमोट ई-व्होटिंग') किंवा वार्षिक सर्वसाधारण सभेच्या वेळी ई-व्होटिंगद्वारे इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणाली वापरून त्यांचे मत देऊ शकतात. कंपनीने रिमोट ई-व्होटिंग आणि सभेच्या वेळी ई-व्होटिंग सुविधा प्रदान करण्यासाठी नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (एन एस डी एल) सोबत सहभाग घेतला आहे. रिमोट ई-व्होटिंगचे तपशील खालीलप्रमाणे आहेत:-

1. वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना पाठवण्याची पूर्तता होण्याची तारीख: गुरुवार ५ जून २०२५.
2. रिमोट ई-व्होटिंग कालावधी **बुधवार दिनांक २५ जून २०२५ रोजी सकाळी ९.०० वाजता (भारतीय प्रमाण वेळेनुसार)** सुरू होईल आणि **शुक्रवार, दिनांक २७ जून २०२५ रोजी संध्याकाळी ५. ०० वाजता (भारतीय प्रमाण वेळेनुसार)** समाप्त होईल.
3. रिमोट ई-व्होटिंगद्वारे मतदानाला **शुक्रवार, दिनांक २७ जून २०२५ रोजी संध्याकाळी ५.००** च्यापुढे परवानगी दिली जाणार नाही.
4. कोणतीही व्यक्ती, जी कंपनीचे शेअर्स घेते आणि नोटीस पाठवल्यानंतर कंपनीचा सदस्य बनते आणि कट-ऑफ तारखेला म्हणजेच शुक्रवार, २० जून २०२५ रोजी शेअर्स /समभाग धारण करते, ती इ -मेल पाठवून evoting@nsdl.com किंवा pune@linkintime.co.in किंवा cs@ggdandekar.com या वर संपर्क साधून युजर आयडी आणि पासवर्ड मिळवू शकते. जर एखाद्या व्यक्तीने रिमोट ई-व्होटिंगसाठी आधीच NSDL मध्ये नोंदणी केली असेल, तर विद्यमान युजर आयडी आणि पासवर्ड मतदानासाठी वापरला जाऊ शकतो. तुम्ही तुमचा पासवर्ड विसरल्यास, तुम्ही www.evoting.nsdl.com वर उपलब्ध असलेल्या 'वापरकर्ता तपशील/पासवर्ड विसरलात' पर्याय वापरून तुमचा पासवर्ड रीसेट करू शकता. नॅशनल सिक्युरिटीज डिपॉसिटोरी लिमिटेड (एन एस डी एल) च्या ई-मतदान प्रणालीवर मत देण्यासाठी सदस्य OTP (वन टाइम पासवर्ड) आधारित लॉगिन देखील वापरू शकतो.
5. 'व्ही सी /'ओ ए वी एम' सुविधेद्वारे वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी उपस्थित राहणारे सदस्य, ज्यांनी रिमोट ई-व्होटिंगद्वारे आपले मत दिले नाही ते ई-वोटिंगद्वारे वार्षिक सर्वसाधारण सभेच्या वेळी आपला मत देण्याचा हक्क बजावू शकतील.
6. एखादा सदस्य रिमोट ई-व्होटिंगद्वारे मतदानाचा हक्क बजावल्यानंतरही वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सहभागी होऊ शकतो परंतु त्याला वार्षिक सर्वसाधारण सभेच्या वेळी पुन्हा मतदान करण्याची परवानगी दिली जाणार नाही.
7. ज्या व्यक्तींचे नाव डिपॉझिटरीजद्वारे ठेवलेल्या सदस्यांच्या नोंदणीमध्ये किंवा लाभार्थी मालकांच्या नोंदणीमध्ये कट-ऑफ तारखेला म्हणजेच शुक्रवार, २० जून २०२५ रोजी नोंदवले गेले आहे ती रिमोट ई-व्होटिंग किंवा सभेच्या ठिकाणी ई-व्होटिंगची सुविधा घेण्यास पात्र असेल.
8. 'व्ही सी /'ओ ए वी एम' द्वारे इलेक्ट्रॉनिक मतदान आणि वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये उपस्थित राहण्याची प्रक्रिया सभेच्या सूचनेमध्ये उपलब्ध आहे.
9. ज्या सदस्यांचे ईमेल पत्ते कंपनी/रजिस्ट्रार अँड शेअर ट्रान्सफर एजंट/डिपॉसिटोरी पार्टिसिपंट कडे नोंदणीकृत नाहीत त्यांच्या ई-मेल पत्त्यांची नोंदणी करण्याची पद्धत सभेच्या सूचनेमध्ये उपलब्ध आहे. वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना कंपनीच्या www.ggdandekar.com वेबसाइटवर आणि ज्यावर कंपनीचे शेअर्स सूचीबद्ध आहेत त्या स्टॉक एक्सचेंजच्या वेबसाइटवर उपलब्ध आहे.
10. कोणत्याही प्रश्नांच्या बाबतीत, ज्या सदस्यांना वार्षिक सर्वसाधारण सभेच्या आधी किंवा दरम्यान सहाय्याची गरज आहे असे सदस्य तुम्ही वारंवार विचारले जाणारे प्रश्न (FAQs) पाहू शकता आणि www.evoting.nsdl.com या वेबसाइटवर 'डाउनलोड' अंतर्गत उपलब्ध सदस्यांसाठी ई-व्होटिंग वापरकर्ता पुस्तिका पाहू शकता. सदस्यांनी कृपया एन एस डी एल शी क्रमांक ०२२-४८८६७००० वर किंवा सुश्री रिम्पा बाग, असिस्टंट मॅनेजर, एन एस डी एल, ट्रेड वर्ल्ड, ए विंग, ४था मजला, कमला मिल्स कंपाऊंड, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल, मुंबई ४०००१३ या पत्त्यावर किंवा नियुक्त ईमेल आयडींवर: evoting@nsdl.com किंवा RimpaB@nsdl.com वर संपर्क साधावा., जे इलेक्ट्रॉनिक मतदानाशी संबंधित तक्रारींचे निराकरण करतील. सदस्य कंपनी सेक्रेटरी यांना ir@ggdandekar.com वर देखील लिहू शकतात.

संचालक मंडळाच्या आज्ञेनुसार
**जी. जी. दांडेकर प्रॉपर्टीज लिमिटेड** साठी
**(पूर्वीचे नाव जी. जी. दांडेकर मशीन वर्क्स लिमिटेड)**
Sd/-
**प्रणव देशपांडे**
**कार्यकारी संचालक (डीन: ०६४६७५४९)**

**दिनांक:** ०४ जून २०२५
**ठिकाण:** पुणे



कार्यालय

**ग्रामपंचायत किरमीटी (भारकस)**

पंचायत समिती हिंगणा ,जिल्हा परिषद नागपूर

**सूचना क्रमांक – ०१-२०२५/२६ (ई –निविदा)/(पहिली वेळ)**

**ग्रा.पं. किरमीटी (भारकस) अंतर्गत सामान्य फंड स्व निधी योजणे तून ग्रा.पं कार्यालय अंतर्गत सर्व प्रकारच्या मालमत्ता धारकाचे कंपनी /घर/खाली जागा /नवीन व जुने पक्के व कच्चे बांधकामे झालेल्या सर्व प्रकारच्या मालमत्ता मोजणीनुसार नवीन स्वरुपात नमुना -८ ,नमुना -९,मागणी बिल ,मागणी लेख ,तयार /छपाई करणे इतर कामे , ग्रा .पं.किरमीटी भारकस कार्यालयाचा सरकारी रिकॉर्ड तयार करण्यासाठी अधिकृत नवीन एजेन्सी नेमणूक करण्याकरिता ई –निविदा ऑनलाईन स्वरुपात ई –निविदा द्वारे सन २०२५/२६करिता मांगविण्यात येत आहे**

जिल्हा परिषद वेबसाईटवर http://www.mahatenders.gov.inया संकत स्थळावर ई –निविदा प्रसिद्ध करण्यात येत आहे.

१) दरपत्रकविक्रीचा दिनांक:- ०२/०६/२०२५ ला सकाळी ११.०० वा प्रसिद्ध करण्यात येईल.

२) दरपत्रक स्वीकृतीचा अंतिम दिनांक :-०९/०६/२०२५ ला सायं ६.०० वा पर्यंत उपलब्ध राहील .

३) दरपत्रक उघडण्याच्या दिनांक:-१०/०६/२०२५ ला सायं ६.०० वाजता किवा सोईनुसार उघडण्यात येईल.

-स्वा-
सरपंच / ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत किरमीटी (भारकस)
पं.स.हिंगणा जि.पं.नागपूर


# अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त दुचाकी रॅली



■ महासागर प्रतिनिधी,

**बुलडाणा , दि. ३ :** राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती दिना निमित्त आज ३१ मे रोजी भाजप जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत तहसील चौक येथील माता अहिल्यादेवी स्मारक येथे अभिवादन करण्यात आली. त्यानंतरस्मारक समितीचे अध्यक्ष भाजपचे युवा नेते नंदू लवंगे यांच्या संकल्पनेतून दुचाकी रॅली काढण्यात आली. अहिल्याबाई यांच्या अश्वारूढ पुतळ्याचे विजयराज शिंदे यांच्या हस्तेपूजन करून उपस्थित मान्यवरांनी अभिवादन केले. त्यानंतर शहराच्या मुख्य मार्गाने निघालेल्या दुचाकी रॅलीत माता अहिल्यादेवी यांच्या नावाचा जयघोष व 'येळकोट येळकोट जय मल्हार'च्या घोषणा देण्यात आल्या. शंखनादाच्या गजरात महिला–भगिनींच्या हस्ते यावेळी भव्य महाआरती घेण्यात आली.

माता अहिल्यादेवी यांनी मंदिराचा जिर्णोद्धार केला यावेळी भाजप जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे यांनी पुरोगामी इतिहासातील पहिल्या महिला शासक म्हणून अहिल्याबाई होळकर यांची ओळख आहे. सोबतच हिंदू धर्माच्या अनेक मंदिरांचा जीर्णोद्धार व संरक्षणाचे महत्वाचे कार्य त्यांनी केले त्यांचे समाजातील योगदान आणि त्यांचे पुरोगामी शासन आजही राज्यकर्त्यांना व खास करून महिला–भगिनींना प्रेरणा देत आहे, असे प्रतिपादन केले.


**कार्यालय नगर पंचायत, भिवापूर**

**जिल्हा नागपूर**

**ई–मेल : bhiwapurnagarpanchayat@gmail.com** | **फोन : ०७१७६–२३२३०८**

क्र.कावि/नपभी/कर वि. /२०२५–२६/४३१ | दिनांक:– ०२/०६/२०२५

**जाहीर सूचना**

**नगर पंचायत, भिवापूर अंतर्गत सन २०२५–२६ या आर्थिक वर्षा करीता दैनिक गुजरी बाजार महसुल वसुलीचा ठेका देण्या करीता जाहीर लिलाव नगर पंचायत कार्यालय भिवापूर येथे आयोजित करण्यात आला आहे. सदर लिलावाची सविस्तर माहीती नगर पंचायत, कार्यालयात सूचना फलकावर बोर्ड वर वर्तमान पत्रात प्रसिद्धी करण्यात आले आहे. सदर लिलाव दि. ०६/०६/२०२५ रोजी दु. ०३:०० वाजता नगर पंचायत कार्यालय येते आयोजित करण्यात आलेला आहे. सदर लिलावाची विवरण खालील प्रमाणे.**

| अ.क्र. | लिलावाचे नाव | रक्कम | बोली अनामत रक्कम | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | दैनिक गुजरी बाजार फी वसुली | १,८०,९००/– | १०,०००/– | आदेशा पासून १ वर्ष |

**टीप :– अटी व शर्ती नगर पंचायत च्या नोटीस बोर्ड वर व कर विभाग येथे पहावयास मिळेल.**

– स्वा–
(मिलिंद साठोने)
मुख्याधिकारी
नगर पंचायत भिवापूर

# ठाकरे बंधूंमधील वाढत्या प्रेमाची भाजपला चिंता

**महाराष्ट्राच्या राजकारणात लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा फड रंगणार आहे. तत्पूर्वी, राज्याच्या राजकारणात राज व उद्धव ठाकरे यांच्या संभाव्य मनोमिलनामुळे मोठ्या घडामोडी घडण्याची शक्यता आहे. ठाकरे बंधूंच्या संभाव्य आघाडीमुळे भाजपच्या गोटात तीव्र अस्वस्थता पसरली आहे. त्यामुळेच भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी लवकरच राज ठाकरे यांच्या घरी चहापाण्याला जाण्याची भाषा करत आहेत.**

-----------------





गतवर्षीच्या विधानसभा निवडणुकीत भाजपला सर्वाधिक फायदा झाला होता. तर एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेना व अजित पवारांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसलाही उल्लेखनीय यश मिळाले होते. पण आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तोंडावर प्रादेशिक पक्षांनी मराठी अस्मितेच्या मुद्याला हवा दिली आहे.

यामुळे केंद्र व राज्यात सत्तेत असलेली भाजपा काळजीत पडली आहे. महायुती सरकारचे मंत्री छगन भुजबळ यांनीही ठाकरे व पवार कुटुंबाने लवकरात लवकर एकत्र येण्याची अपेक्षा व्यक्त करत त्यांची चिंता वाढवली आहे हे विशेष.

**राज व उद्धव एकत्र येतील का?**

राज व उद्धव ठाकरे यांना मराठी मतांचे विभाजन नको आहे. त्यामुळे हे दोघे बंधू एकत्र येण्याची शक्यता बळावली आहे. राज ठाकरे यांनी नुकत्याच एका मुलाखतीत महाराष्ट्रातील पवार व ठाकरे ब्रँड संपवता येणार नसल्याचा दावा केला होता. त्यांच्या या विधानाचे सर्वच अंगाने विश्लेषण झाले होते. विशेषतः शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी त्याच्या या विधानाचे स्वागत केले होते.

सूत्रांच्या माहितीनुसार, उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वातील शिवेसना आता कोणत्याही स्थितीत मराठी मतांचे विभाजन थांबवण्याच्या निर्णयापर्यंत आली आहे. कारण, याच मराठी मतांच्या विभाजनामुळे विधानसभा निवडणुकीत ठाकरे गट व मनसेला जबर झटका बसला होता.

या निवडणुकीत उद्धव यांना अवघ्या २० जागांवर समाधान मानावे लागले होते, तर राज ठाकरे यांना भोपळाही फोडता आला नव्हता. विशेषतः त्यांना त्यांचे सुपुत्र अमित ठाकरे यांनाही निवडून आणता आले नव्हते.

**भाजपचे गणित बिघडण्याची शक्यता**

महाराष्ट्रातील घडामोडींवर बारकाईने लक्ष ठेवणाऱ्या विश्लेषकांच्या मते, राज व उद्धव ठाकरे यांच्यातील वाढत्या प्रेमामुळे भाजपच्या गोटातील अस्वस्था वाढणे स्वाभाविकच आहे. भाजपने शिवसेनेची दोन शकले केली. उद्धव ठाकरे यांच्या पक्षाचे नाव व निवडणूक चिन्ह हिसकावून घेतले. पण त्यानंतरही भाजपला उद्धव ठाकरे यांना पूर्णपणे संपवता आले नाही.

पक्षाचे नाव व चिन्ह गेल्यानंतरही उद्धव ठाकरेंनी लोकसभा निवडणुकीत आपल्या हिंमतीवर ९ खासदार निवडून आणून दाखवले. त्यानंतरच्या विधानसभा निवडणुकीत त्यांना अपयश आले. पण त्यानंतरच्या राजकीय घटनाक्रमात वेळोवेळी त्यांनी आपली ताकद दाखवून दिली.

परिणामी, महाराष्ट्राच्या राजकारणात अजूनही उद्धव ठाकरे यांची चलती असल्याचे सिद्ध झाले. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मनसेसोबत आघाडी केली तर आपल्या जागांमध्ये निश्चितच भर पडेल असे त्यांना वाटणे साहजिकच आहे.

विश्लेषकांच्या मते, मनसे व ठाकरे गटाने मिळून मुंबई महापालिकेची निवडणूक लढवली तर भाजपचे विजयाचे अंदाज हुकू शकतात. त्यामुळे ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत, आमदार आदित्य ठाकरे व अनिल परब यांनी राज ठाकरे यांना आघाडीसाठी बोलणी करण्यास सुरूवात करण्याचे आवाहन केले आहे.

या घटनाक्रमाच्या तोंडावर भाजपने महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदासाठी रवींद्र चव्हाण यांचे नाव पुढे केले आहे. ते सध्या पक्षाचे प्रदेश कार्यकारी अध्यक्ष आहेत.

**बीएमसीचे राजकीय गणित**

मुंबई महापालिका ही देशातील सर्वात श्रीमंत व मोठ्या बजेटची महापालिका आहे. बीएमसीची सदस्य संख्या २२७ आहे. ११४ हा बहुमताचा जादुई आकडा आहे. २०१७ च्या निवडणुकीत अविभाजित शिवसेनेला सर्वाधिक ७४ जागा मिळाल्या होत्या. तर भाजपला ८२, काँग्रेसला ३१, राष्ट्रवादीला ९, तर मनसेला ७ जागा मिळाल्या होत्या. याशिवाय समाजवादी पक्षाला ६, एमआयएमला १, अखिल भारतीय सेनेला १ व ५ जागांवर अपक्ष निवडून आले होते. उल्लेखनीय बाब म्हणजे तत्पूर्वीच्या निवडणुकीत राज ठाकरे यांच्या मनसेला तब्बल २८ जागा मिळाल्या होत्या.

या निवडणुकीपूर्वी उद्धव आणि राज यांचे मनोमिलन झाले तर त्याचा फटका भाजपाला मिळणाऱ्या जागांवर पडू शकतो. हीच बाब हेरून भाजपाकडून आता सातत्याने राज ठाकरे यांना पुचकारले जात असून, राज-उद्धव एकत्र येण्याच्या शक्यतेने भाजपाची चिंता वाढली आहे.

■ ■ ■

# भारतीय संस्कृतीला छेद देणारे 'घटस्फोट'!

भारताला लाभलेली प्राचीन हिंदू संस्कृती हे भारताचे एक आगळे वैशिष्ट्य आहे. या संस्कृतीचा भाग असलेली विवाहसंस्था जगाच्या पाठीवर अन्यत्र कुठेही पाहायला मिळत नाही. विवाह पृथ्वीतलावर होत असले, तरी जोडीदाराच्या गाठी या स्वर्गातच बांधल्या जातात अशी समजूत भारतीयांत पूर्वापार चालत आली आहे. त्यामुळे घटस्फोट हा शब्द भारतीय शब्दकोशात कुठेही सापडत नाही.

विवाह संस्काराच्या माध्यमातून सात जन्माची गाठ बांधली जाते, या संस्कारात देवाब्राह्मणांच्या साक्षीने जन्मभर एकमेकांशी प्रामाणिक राहण्याचे, एकमेकांची काळजी घेण्याचे वचन दिले आणि घेतले जाते. या पवित्र संस्काराने बद्ध झालेले उभयता आयुष्यात येणाऱ्या सुखदुःखाच्या प्रसंगांना नेटाने सामोरे जातात. जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर एकमेकांना साथ देत संसाराचे गाडे हाकतात.

गेल्या काही वर्षांत भारतीय तरुणांवर पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव मोठ्या प्रमाणात दिसून येतो. भारतात वाढत जाणारे घटस्फोटांचे प्रमाणही याचीच फलश्रुती आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही, २०२१ साली देशाच्या कौटुंबिक न्यायालयांत घटस्फोटांचे ५ लाख खटले प्रलंबित होते. २०२३ साली हीच संख्या ८ लाखांपर्यंत पोहोचल्याचे एका अहवालातून समोर आले आहे.

घटस्फोटाच्या खटल्यांत वर्षागणिक होत जाणारी वाढ भविष्यांत पश्चिमी देशांना मागे टाकू शकते अशी भीती निर्माण झाली आहे. दरवर्षी घटस्फोटांची जेव्हढी प्रकरणे न्यायालयात निकाली काढली जातात, तेव्हढीच किंबहुना त्याहून अधिक नवीन प्रकरणे न्यायालयांत नव्याने प्रविष्ट केली जातात. त्यामुळे येणाऱ्या काळात देशाची कुटुंबव्यवस्था संकटात येण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

तरुण पत्नी पत्नी विभक्त झाल्याने सर्वाधिक परिणाम त्यांच्या अपत्यांवर होतात. अशा अपत्यांमध्ये एकलकोंडेपणा, द्वेष, चिडचिड करणे, सूडभावनेने वागणे यांसारखे दोष प्रकर्षाने दिसून येतात. घटस्फोटित पालकांची मुले नकळतपणे गुन्हेगारीकडे वळत असल्याचे निरीक्षणही अहवालात नोंदवण्यात आले आहे.

पश्चिमी देशांच्या तुलनेने भारतात होणाऱ्या घटस्फोटांची टक्केवारी कमी असली, तरी आज या प्रकारांवर नियंत्रण आणले नाही, तर भविष्यात ती भीषण स्वरूप धारण करू शकते,ज्याचा परिणाम सामाजिक व्यवस्थेवर होऊ शकतो. विवाह करताना प्रत्येक मुलामुलीने आपल्या भावी आयुष्याबद्दल अनेक स्वप्ने रंगवलेली असतात या स्वप्नांचा चुराडा करणारा घटस्फोट कुणालाही नको असतो; मात्र तो आयुष्यात येण्यामागे कारणेही तितकी गंभीर असू शकतात.

शहरासारख्या ठिकाणी राहणाऱ्या जोडप्यांमध्ये ग्रामीण भागाच्या तुलनेत घटस्फोटांचे प्रमाण अधिक आहे. शहरी भागात राहणारे बहुतांश तरुण पती पत्नी दोघेही नोकरी किंवा व्यवसाय करणारे आणि बऱ्यापैकी धन कमावणारे असतात. कार्यालयात उच्च पदावर असताना इतरांकडून मिळणारा मानसन्मान, सुधारित राहणीमान यामुळे राहणीमानाचा आणि पदाचा काही प्रमाणात अहंकार निर्माण होऊ लागतो.

घरी जोडीदाराकडूनही अशाच सन्मानाची अपेक्षा केली जाते. तो तितक्या प्रमाणात न मिळाल्यास लहान सहान प्रसंगांतून खटके उडू लागतात. खटक्यांचे रूपांतर वादात होते. कधी कधी हे वाद विकोपाला पोहोचतात. सातत्याने असे प्रसंग घडू लागल्यास जोडीदारासोबत राहणे नकोसे वाटू लागते.

माघार घेण्याची सवय नसल्याने वितुष्ट वाढत जाऊन प्रकरण घटस्फोटापर्यंत पोहोचते.

नोकरीच्या निमित्ताने कार्यालयातील सहकारी तसेच कार्यालयाशी संबंधित व्यक्ती यांच्याशी सातत्याने संपर्क येत असल्याने काही वेळा पती किंवा पत्नीचे विवाहबाह्य संबंध निर्माण होतात ज्यामुळे जोडीदारांत वाद होऊन नात्यात भेग निर्माण होते. काहीवेळा विवाहाआधी घडलेले प्रसंग, आजार किंवा जीवनातील एखादी गंभीर घटना याविषयी समोरच्यांशी मोकळेपणाने बोलले जात नाही.

या गोष्टी विवाहानंतर लक्षात आल्यावर विश्वासघाताची भावना मनात निर्माण होऊन नात्यातील जवळीकता लोप पावू लागते. ज्याचे पर्यावसान पुढे वादांत आणि भांडणांत होऊन प्रकरण न्यायालयापर्यंत जाते.

आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय विवाहांना सरकाकडून प्रोत्साहन आणि संरक्षण दिले जात असले, तरी विवाहानंतर अचानक बदललेले राहणीमान, तेथील चालीरीती, खाण्या पिण्याच्या सवयी यांचा स्वीकार करताना संघर्ष होतो. आंतरधर्मीय विवाह करताना काहीवेळा जोडीदारावर धर्मपरिवर्तन करण्यास सक्ती केली जाते. असे विवाहही फार काळ टिकत नाहीत.

याखेरीज पती पत्नींची मानसिक स्थिती, त्यांच्या सवयी, वागण्या बोलण्याच्या पद्धती, परस्परांच्या नातेवाईकांशी असलेली वर्तणूक यास-द्धा काही प्रमाणात घटस्फोटास कारणीभूत ठरू लागल्या आहेत. जोडीदाराला असलेली व्यसने त्याचा मित्रवर्ग यागोष्टीही लग्नाआधी ज्ञात नसल्यास गंभीर वादास कारणीभूत ठरतात.

पतिपत्नीचे नाते बहरण्यासाठी एकमेकांना समजून घेणे, एकमेकांना गुणदोषांसह स्वीकारणे, परस्परांशी मनमोकळेपणाने बोलणे, एकमेकांना प्रोत्साहन देणे, आवश्यक तिथे तडजोड करणे, माघार घेणे, परस्परांमध्ये विश्वासाचे नाते निर्माण करणे या गोष्टी प्राथमिक टप्प्यावर अत्यंत आवश्यक असतात.

आपला अहंकार जपत राहिल्यास लहान सहान प्रकरणात विनाकारण मनात क्लेश निर्माण होऊन नात्यातील प्रेम लोप पावू लागते. आताच्या पिढीवर अनैतिकता पसरवणारे चित्रपट, कुटुंबव्यवस्थेला छेद देणाऱ्या मालिका, वासनांधतेने भरलेल्या वेब सिरीज यांचा प्रभाव अधिक आहे.

विवाहसंस्था आणि कुटुंबव्यवस्था यांना तुच्छ लेखणाऱ्या या चित्रपट-मालिकांमध्ये विवाहबाह्य संबंध, गृहकलह, घटस्फोट यांसारखे विषय चवीने चघळले जातात. लिव्ह इन रिलेशिनशिपसारख्या पाश्चिमात्य विकृतीला देशात कायद्याचे संरक्षण असल्याने घटस्फोट घेणे किंवा एक जोडीदार असताना दुसऱ्यासोबत राहणे आजच्या आधुनिक म्हणवणाऱ्या पिढीला तितकेसे चुकीचेही वाटत नाही.

भारतीय कुटुंब व्यवस्था टिकवायची असेल, तर या व्यवस्थेचे लाभ महाविद्यालयीन शिक्षणातून शिकवले जायला हवेत त्यासोबतच चित्रपट, मालिका, वेब सीरिज यांतुन भारतीय संस्कृतीला छेद देणारे प्रसंग, कथानक, संवाद यांवर निर्बंध आणणे आज आवश्यक बनू लागले आहे. ■ ■



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई.
९६६४५५९७८०

# न्यायमूर्ती वर्मा कॅश प्रकरण : कुटुंबानेच वापरली स्टोअररूम

दिल्ली उच्च न्यायालयाचे तत्कालीन न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या सरकारी बंगल्यात सापडलेल्या अर्ध्या जळालेल्या नोटांच्या प्रकरणात नवीन खुलासे झाले आहेत. पीटीआयने सूत्रांच्या हवाल्याने सांगितले की, आगीनंतर ज्या स्टोअर रूममध्ये जळालेली रोकड आढळली ती रूम न्यायमूर्ती वर्मा आणि त्यांच्या कुटुंबीयांनी वापरली होती.

इलेक्ट्रॉनिक पुरावे, साक्षीदार आणि बंगल्यातील तपासाच्या आधारे तपास समिती या निष्कर्षावर पोहोचली आहे. समितीने ५० हून अधिक लोकांचे जबाब नोंदवले. यामध्ये दिल्ली पोलिस आयुक्त संजय अरोरा आणि अग्निशमन सेवेचे प्रमुख यांचा समावेश होता. आग लागल्यानंतर दोन्ही अधिकारी घटनास्थळी पोहोचणाऱ्यांपैकी सर्वात आधी होते.

१४ मार्च २०२५ रोजी रात्री ११:३५ वाजता आग लागल्यानंतर स्टोअर रूममधून रोख रक्कमही काढून टाकण्यात आल्याचे अहवालात म्हटले आहे.सरन्यायाधीशांनी न्यायमूर्ती वर्मा यांच्याविरुद्ध चौकशीची शिफारस केली होती

अर्धवट जळालेल्या नोटा सापडल्याची बातमी समोर आल्यानंतर, तत्कालीन सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी २२ मार्च रोजी या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी एक पॅनेल स्थापन केली होती. या पॅनेलने ४ मे रोजी आपला अहवाल सरन्यायाधीशांना सादर केला. यामध्ये न्यायमूर्ती वर्मा यांना दोषी ठरवण्यात आले.

या अहवालाच्या आधारे, सरन्यायाधीशांनी 'इन-हाऊस प्रोसिजर' अंतर्गत न्यायमूर्ती वर्मा यांच्याविरुद्ध महाभियोग चालवण्याची शिफारस केली होती. चौकशी समितीमध्ये पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश शील नागू, हिमाचल उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश जीएस संधावालिया आणि कर्नाटक उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती अनु शिवरामन यांचा समावेश होता.





**महाभियोगाचा विचार**

केंद्र सरकार रोख घोटाळा प्रकरणात न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्याविरुद्ध संसदेत महाभियोग प्रस्ताव आणण्याचा विचार करत आहे. वृत्तसंस्था पीटीआयने सूत्रांच्या हवाल्याने सांगितले की, हा प्रस्ताव पावसाळी अधिवेशनात आणला जाऊ शकतो.

एका अधिकृत सूत्राने सांगितले की, न्यायमूर्ती वर्मा यांच्याविरुद्ध कारवाईची औपचारिक प्रक्रिया अद्याप सुरू झालेली नाही. सरकार कारवाई करण्यापूर्वी विरोधी पक्षांना विश्वासात घेईल. अशा घोटाळ्याकडे दुर्लक्ष करणे कठीण आहे. तथापि, सरकार न्यायमूर्ती वर्मा स्वतः राजीनामा देतील याची वाट पाहत आहे. ते सध्या अलाहाबाद उच्च न्यायालयात आहेत. घटनेच्या वेळी न्यायमूर्ती वर्मा दिल्ली उच्च न्यायालयात होते. नंतर त्यांची बदली करण्यात आली, परंतु त्यांना कोणतेही न्यायालयीन काम सोपवण्यास मनाई आहे.

**९७.८५ कोटी रुपयांच्या घोटाळ्यात नाव**

२०१८ मध्ये, गाझियाबादमधील सिम्भवोली साखर कारखान्यातील अनियमिततेप्रकरणी सीबीआयने न्यायमूर्ती वर्मा यांच्याविरुद्ध एफआयआर नोंदवला होता. वृत्तानुसार, ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्सने मिलमधील अनियमिततेबद्दल तक्रार केली होती.

शेतकऱ्यांसाठी जारी केलेल्या ९७.८५ कोटी रुपयांच्या कर्जाचा साखर कारखान्याने गैरवापर केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. त्यावेळी न्यायमूर्ती वर्मा हे कंपनीचे गैर-कार्यकारी संचालक होते. या प्रकरणाची चौकशी सीबीआयने सुरू केली होती.

तथापि, तपास संथ गतीने सुरू होता. फेब्रुवारी २०२४ मध्ये, एका न्यायालयाने सीबीआयला रखडलेला तपास पुन्हा सुरू करण्याचे आदेश दिले, परंतु सर्वोच्च न्यायालयाने तो आदेश रद्द केला आणि सीबीआयने तपास बंद केला.

## राष्ट्राप्रति निष्ठा बाळगावीच लागेल!

पहलगाम हल्ल्यानंतर एक गोष्ट स्पष्ट झाली ती म्हणजे दहशतवाद्यांच्या रडारवर केवळ देशातील बहुसंख्य समाज आहे आणि देशात सत्तापरिवर्तन झाल्यानंतर जनतेमधील स्वराष्ट्राप्रतीचे प्रेम वाढते आहे. या हल्ल्यानंतर सोशल मीडियावर एक जुना व्हिडीओ प्रसारित झाला होता ज्यामध्ये आजच्या तरुण पिढीच्या गळ्यातील ताईत असणारे बॉलिवूडमधील काही आघाडीचे कलाकार पाकिस्तानचे मुक्त कंठाने कौतुक करताना दिसत होते. मध्यंतरीच्या काळात प्रत्येक रिॲलिटी शोमध्ये किमान एक तरी पाकिस्तानी कलाकार असावा आणि तो अंतिम फेरीपर्यंत टिकावा हा जणू नियमच करण्यात आला होता.

कलेला सीमांचे बंधन नसते हे वाक्य तर समस्त दर्शक वर्गाच्याही पाठ झाले होते. पाकिस्तानमध्ये संकट कोसळल्यावर भारतात सुतक पाळणाऱ्या राजकीय मंडळींची सुद्धा भारतात कमतरता नाही. अंतःकरणात पाकप्रेम बाळगणारी ही मंडळी पहलगाम हल्ल्यानंतर व्यक्त होतील आणि 'दहशतवादाला धर्म नसतो' 'आलेले दहशतवादी पाकिस्तानी नव्हते'' अशी नेहमीची वाक्ये बरळतील असे वाटले होते, मात्र प्रत्यक्षात तसे काहीच झाले नाही. ज्या भारताकडून त्यांना प्रेम, पैसा, प्रसिद्धी, प्रतिष्ठा मिळाली त्याच्या शत्रुराष्ट्राच्या बाजूने काही विधान केले तर, आपल्याला जे मिळाले आहे ते सर्व हिरावून घेतले जाईल ही भीती त्यांना होती त्यामुळे त्यांनी प्रतिक्रिया देणे टाळले. ज्या व्यक्तींचे अनुकरण अनेक जण करतात मग त्या व्यक्ती राजकारणी असो, चित्रपट सृष्टीतील असो किंवा अन्य क्षेत्रातील, त्यांनी त्या देशाशी एकनिष्ठ राहणे आवश्यक आहे. केवळ एकनिष्ठ राहून चालणार नाही तर प्रत्येक वेळी त्यांना आपली निष्ठा दाखवावी लागेल तर आणि तरच त्यांचे अनुयायी त्यांचा सन्मान राखतील.

■ **श्रीमती लीना गाडगीळ, पनवेल**

## वाचक लिहितात

**आळंदीचे पावित्र्य राखा**

आळंदी सारख्या पवित्र तीर्थक्षेत्राजवळ कत्तलखाना उभारण्याचा प्रस्ताव हा सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक दृष्टिकोनातून अत्यंत संवेदनशील मुद्दा आहे. आधुनिक कत्तलखान्यामुळे आर्थिक फायदे आणि रोजगाराच्या संधी मिळू शकतात, परंतु अशा ठिकाणी उभारलेल्या सुविधेमुळे भाविकांच्या धार्मिक भावना दुखावू शकतात. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधीस्थळावर दरवर्षी हजारो भाविक दर्शनासाठी येतात. अशा ठिकाणी प्राणीहिंसा आणि दुर्गंधी निर्माण करणारी सुविधा असणे हे अत्यंत असंवेदनशील आणि श्रद्धास्थानाला अपमान करणारे आहे. कत्तलखान्यामुळे परिसरात प्रदूषण, दुर्गंधी, रोगप्रसार यासारखे अनेक तोटे निर्माण होतात. इंद्रायणी नदीच्या पवित्रतेवर त्याचा नकारात्मक परिणाम होण्याची शक्यता आहे.

त्यामुळे प्रशासनाने तीर्थक्षेत्रापासून दूर पर्यायी जागेचा विचार करणे आवश्यक आहे. विकासाची गरज मान्य असली तरी ती धार्मिक भावना आणि आळंदीच्या आध्यात्मिक पवित्रतेच्या स्तरावर होऊ नये. आळंदीचे पावित्र्य जपणे हे आपले सामूहिक कर्तव्य आहे.

■ **आल्हाद माळगावकर पनवेल.**

# बोकडांचा बाजार आणि शेतकरी मालामाल



फुलंब्री तालुक्याच्या वडोद बाजार येथे दरवर्षी भरणारा बोकड बाजार शेतकरी विशेषतः पशुपालकांसाठी पर्वणी असतो. बकरी ईदच्या कुर्बानीसाठी राज्यातील आणि बाहेर राज्यातील व्यापारी बोकड खरेदी-विक्रीसाठी येथे येतात. १० हजारांपासून ते ८० हजार रुपयांपर्यंत बोकड विक्रीस असतात.

छ. संभाजीनगर जिल्ह्याच्या फुलंब्री तालुक्यातील वडोद बाजार येथे दर सोमवारी जनावरांचा आठवडी बाजार भरतो. उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, गुजरात आणि इतर राज्यांतून व्यापारी जनावरे खरेदी-विक्रीसाठी आणतात. जनावरांच्या खरेदी-विक्रीसाठी हा बाजार महाराष्ट्रात पहिल्या क्रमांकावर आहे.

शनिवारी होणाऱ्या बकरी ईदनिमित्त कुर्बानीसाठी बोकडे खरेदी करण्यासाठी मोठी गर्दी झाली होती. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यासह बाहेरराज्यातील शेतकऱ्यांनी बोकडे विक्रीसाठी आणले होते. १० हजारांपासून ते ८० हजार रुपयांपर्यंत बोकडे विक्री झाले. शेकडो वाहनांतून हे खरेदी केलेले बोकडे कुर्बानीसाठी मुस्लिम बांधवांनी खरेदी करून नेले. शेतकऱ्यांना बोकडांना चांगला भाव मिळाल्याने समाधान व्यक्त करत होते. कुर्बानीसाठी लागणारे बोकड हे बारा महिन्यांपेक्षा जास्त वयाचे लागतात.

शेतकरी बकरी ईदसाठी बोकडे पाळून ठेवतात. सुदृढ तसेच एका रंगाचे म्हणजे काळापांढरा असा सारखा असणारा बोकड न विकता वर्ष-दोन वर्षे सांभाळून ठेवतात. सारखा रंग व चांगला दिसणाऱ्या बोकडाला सर्वात जास्त भाव मिळतो. शेतकरी बकरी ईदची वाट पाहत असतात.

ईदचा हा शेवटचा बाजार असल्याने राज्यातील आणि बाहेरराज्यातील व्यापारी व मुस्लिम समाजबांधवांनी बोकड खरेदी करण्यासाठी मोठी गर्दी केली होती. शेतकऱ्यांच्या बोकडांना दहा हजार ते साठ हजारांपर्यंत भाव मिळाला आहे.

■ ■ ■



# शेवग्याची पाने केसांसाठीही वरदान

चुकीच्या जीवनशैली आणि अस्वस्थ खाण्याच्या सवयींमुळे अनेक आरोग्याच्या समस्या उद्भवू लागल्या आहेत. यापैकी एक म्हणजे केस गळतीची समस्या, ज्यापासून मुक्त होण्यासाठी आपण बाजारात उपलब्ध असलेल्या अनेक प्रकारच्या केमिकल आधारित प्रोडक्टचा वापर करतो. मात्र, केसांना फायदा होण्याऐवजी नुकसान होते. अशातच घरी उपलब्ध असलेल्या काही नैसर्गिक गोष्टींनी तुम्ही केसांच्या समस्यांपासून मुक्त होऊ शकता. यापैकी एक म्हणजे शेवग्याची पाने जे तुम्ही तुमच्या केसांची काळजी घेण्याच्या दिनचर्येचा एक भाग बनवू शकता. त्यात अनेक औषधी गुणधर्म आहेत जे केसांना निरोगी बनवण्यास मदत करतात.

शेवग्याच्या पानांचा वापर केल्याने तुमचे केस मजबूत करण्यासोबतच ते रेशमी, चमकदार आणि गुळगुळीत देखील होते. तुम्ही शेवग्याच्या पानांची पावडर काही गोष्टींमध्ये मिसळून हेअर मास्क म्हणून वापरू शकता. यामुळे तुमचे केस मुळापासून मजबूत होतील आणि केस गळतीसारख्या समस्यांपासूनही आराम मिळू शकेल.

शेवग्याच्या पानांमध्ये व्हिटॅमिन ए, सी, अँटीऑक्सिडंट्स, व्हिटॅमिन ई, लोह असे अनेक पोषक घटक असतात जे केसांसाठी फायदेशीर असतात.

शेवग्याची पाने वाळवून पावडर तयार करू शकता, जी थोड्या पाण्यात मिक्स करून अर्धा तास केसांवर लावू शकता आणि नंतर केस धुवू शकता. यामुळे तुमच्या केसांची गुणवत्ता सुधारते.

**शेवग्याच्या पानांचे तेल देखील उपयुक्त**

तुम्ही घरी शेवग्याच्या पानांपासुन तेल तयार करू शकता. यासाठी, नारळाच्या तेलात व बदाम तेलात शेवग्याच्या पानांची पावडर मिक्स करा आणि काचेच्या बाटलीत ठेवा. नंतर २-३ दिवस उन्हात ठेवा. आता त्यात रोझमेरी तेलाचे काही थेंब टाका. तर अशापद्धतीने शेवग्याच्या पानांचा तेल तयार आहे. तुम्ही हा तेल आठवड्यातून दोनदा वापरू शकता.तसेच या तेलाने मालिश केल्याने तुमच्या केसांची वाढ सुधारते.

**शेवग्याच्या पानांचे केसांसाठी फायदे**

केसांच्या आरोग्यासाठी शेवग्याची पाने खूप फायदेशीर आहे. यामध्ये व्हिटॅमिन सी, ए, ई, लोह आणि झिंक सारखे पोषक घटक असतात जे केसांना पोषण देण्यास आणि केस गळतीपासून मुक्त होण्यास निश्चितपणे मदत करतात.

यामध्ये असलेले अमिनो ॲसिड केसांना जाड आणि लांब बनवण्यास मदत करतात. शेवग्याच्या पानांमध्ये अँटी-ऑक्सिडंट्स आणि अँटीबॅक्टेरियल गुणधर्म असतात जे स्कॅल्प स्वच्छ करण्यास मदत करतात. कोंड्याच्या समस्येपासून मुक्त होण्यास मदत होते.

■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### हर हर महादेव ..!

हलाहल प्राशन करूनी
केले प्राणीमात्रांचे संरक्षण
महेश नवमी प्रसंगी
भगवान शंकरांना
मनोभावे वंदन ..

देवाचा देव महादेव अशी
त्रैलोक्यात ज्यांची किर्ती
सर्व सिद्धींचा दाता असुनही
जीवनी स्विकारली विरक्ती .

सेवा त्याग सहकार वृत्तीचा
आपणही अंगीकार करू
आव्हानांना न डगमगता
जय महेश म्हणून स्विकार करू!

# शासकीय व कॉर्पोरेट क्षेत्रासाठी प्रिव्हेंटिव्ह हेल्थ चेकअपचे प्रीमियर हब म्हणून उदयास आले एसएमएचआरसी

## उद्याच्या आरोग्यासाठी प्रिव्हेंटिव्ह पावरहाऊस



**नागपूर, ३ जून :** वानाडोंगरी १०२० खाटांचे शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर (एसएमएचआरसी) शासकीय व खाजगी (कॉर्पोरेट) क्षेत्रात प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणीसाठी (प्रिव्हेंटिव्ह हेल्थ चेकअप) एक सर्वोत्तम पर्याय म्हणून फारच कमी वेळात महत्वाचे स्थान मिळवले आहे. लवकर निदान व आरोग्य देखरेख यामध्ये नवीन मापदंड प्रस्थापित करत हे केंद्र आता अग्रगण्य ठरत आहे.

राज्याचा विश्वास पोलीस व नागरी सेवांसाठी एसएमएचआरसीची निवड

एसएमएचआरसीच्या प्रिव्हेंटिव्ह हेल्थ चेकअप प्रोग्रॅम (पीएचसीपी) ला महाराष्ट्र शासनाकडून एक मोठा प्रकल्प मिळाला होता, ज्यामध्ये नागपूर शहर पोलीस दलातील ७,५०० हून अधिक कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. यानंतर राज्यभरातील आयएएस, आयपीएस आणि आयएफएस अधिकारी देखील त्यांच्या वार्षिक आरोग्य तपासणीसाठी एसएमएचआरसीची निवड करू लागले.

हॉस्पिटलसह शिक्षण संस्था (टिचिंग हॉस्पिटल्स) असल्याने सुरुवातीला काही शंका व्यक्त करण्यात आल्या असल्या तरी, वैयक्तिक काळजी, जलद सेवा व कार्यक्षम प्रणालीमुळे एसएमएचआरसी वरिष्ठ अधिकाऱ्यांचा विश्वास संपादन करण्यात यशस्वी ठरले. या अधिकाऱ्यांच्या सकारात्मक अनुभवामुळे इतर शासकीय विभाग तसेच खासगी कंपन्यांनी देखील या केंद्राची निवड करायला सुरुवात केली.

नवीन शिखरे गाठताना संस्थेसोबत कॉर्पोरेट व शासकीय संस्था जोडल्या जात आहेत

एसएमएचआरसीच्या व्यापक सुविधा व कार्यक्षम व्यवस्थापनामुळे अनेक नामांकित संस्था आता यांच्यासोबत जोडल्या जात आहेत. बहुतांश कॉर्पोरेट रुग्णालये मर्यादित संख्येमध्ये तपासणी प्रकरणे हाताळू शकतात, परंतु एसएमएचआरसी मध्ये मल्टी स्पेशालिटी डिपार्टमेंट, २४७ डॉक्टरांची उपलब्धता आणि मजबूत प्रशासकीय यंत्रणा असल्यामुळे एकाच दिवशी मोठ्या प्रमाणात तपासण्या शक्य होतात. आज एसएमएचआरसीच्या सेवा घेणाऱ्या प्रमुख संस्थांमध्ये महाराष्ट्र शासन, एमएसईटीसीएल (महाराष्ट्रराज्य वीज पारेषण कंपनी), एमएसआरडीसी, एचडीएफसी, अदानी पावर, टाटा ग्रुप, मेडीबडी, अशोक लेलँड, एल्स्टोम, टेक महिंद्रा यांसारख्या खाजगी कंपन्यांचा समावेश आहे.

**प्रशंसेच्या प्रतिक्रिया व भविष्यासाठी दूरदृष्टी**

शासकीय व खासगी क्षेत्रातील अधिकाऱ्यांनी एसएमएचआरसीच्या सुटसुटीत तपासणी प्रक्रिया, वेळेवर अपॉइंटमेंट, वैयक्तिक सल्ला व उत्कृष्ट सेवा यांची विशेष स्तुती केली आहे. फॉलोअप व अहवाल देणे यामध्ये अचूकता आणि वेळेचे काटेकोर पालन दिसून आल्याचे नमूद केले आहे.

डॉ. अनुप मरार, संचालक डीएमआयएचईआर(डीयू) ऑफ कॅम्पस यांनी सांगितले, वैयक्तिक काळजी, वेळेवर तपासणी आणि सखोल समुपदेशन देण्याची हॉस्पिटलची क्षमता याची अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी प्रशंसा केली आहे.

श्री अमित दास, संचालक मार्केटिंग आणि ब्रँडिंग, एसएमएचआरसी यांनी सांगितले, आमची वैद्यकीय व प्रशासकीय टीम विविध उद्योगांमध्ये ऑन-साईट आरोग्य तपासणी सेवा देत आहे. वाढती मागणी ही संस्थेच्या क्षमतेवरील वाढत्या विश्वासाची साक्ष आहे.

बळकट पाया, समर्पित कर्मचारी व नामांकित संस्थांचा पाठिंबा यामुळे एसएमएचआरसी देशपातळीवर प्रतिबंधात्मक आरोग्य सेवेसाठी एक नवा मानक ठरत आहे. लवकर निदान, आरोग्य संवर्धन व मोठ्या प्रमाणावर सेवा देण्याची क्षमता यामुळे हे केंद्र सर्व क्षेत्रातील व्यावसायिकांसाठी विश्वासार्ह भागीदार बनत आहे.

## एईएसएलला महाराष्ट्रात मिळाला १,६६० कोटींचा ट्रान्समिशन प्रकल्प

**अहमदाबाद, ३ जून :** भारतातील सर्वात मोठी खाजगी ट्रान्समिशन आणि वितरण करणारी कंपनी आणि जागतिक स्तरावर कार्यरत असलेल्या अदानी समूहाचा भाग असलेली अदानी एनर्जी सोल्युशन्स लिमिटेड (एईएसएलला), हिने महाराष्ट्रात १,६६० कोटींचा आंतरराज्यीय ट्रान्समिशन प्रकल्प मिळविला असल्याची माहिती आज दिली.

या प्रकल्पामध्ये ३,००० मेगा व्होल्ट-अँपिअर्स (एमव्हीए) क्षमतेचे सबस्टेशन्स आणि इतर संबंधित ट्रान्समिशन इंफ्रास्ट्रक्चर उभारण्याचा समावेश आहे. या प्रकल्पामुळे एईएसएलचं एकूण ट्रान्समिशन नेटवर्क २६,६९६ सर्किट किलोमीटर (सीकेएम) आणि ट्रान्सफॉर्मेशन क्षमतेसह ९३,२३६ एमव्हीएवर पोहोचेल. एईएसएल हा प्रकल्प जानेवारी २०२८ पर्यंत पूर्ण करणार आहे.

हा प्रकल्प विशेष उद्देशासाठी स्थापन करण्यात आलेल्या कंपनी (स्पेशल पर्पज वेहिकल - एसपीव्ही) डब्ल्यूआरएनईएस तळेगाव पावर ट्रान्समिशन लिमिटेड च्या अंतर्गत येतो. या प्रकल्पामुळे रायगड भागातील हायड्रो पंप्ड स्टोरेज प्रकल्पांमधून निर्माण होणारी १.५ गीगावॅट ग्रीन ऊर्जा मुंबई आणि आसपासच्या भागांमध्ये पोहोचवता येणार आहे. आज एईएसएलला या प्रकल्पाचे औपचारिक हस्तांतरण करण्यात आले.

हा आंतरराज्यीय ट्रान्समिशन प्रणाली (इंटर स्टेट ट्रान्समिशन सिस्टीम - आयएसटीएस) प्रकल्प टॅरिफ बेस्ड कॉम्पेटिटिव्ह बिडिंग (टीबीसीबी) यंत्रणेद्वारे जिंकण्यात आला असून, आरईसीपीडीसीएल(आरईसी पॉवर डेवलपमेंट अँड कंसल्टंसी लिमिटेड) या संस्थेने या निविदा प्रक्रियेचे समन्वयक म्हणून काम पाहिले.

या नवीन ऑर्डरमुळे एईएसएलच्या ट्रान्समिशन ऑर्डरबुकची एकूण किंमत आता सुमारे ६१,६०० कोटी झाली आहे. वेबसाइट सीएमएस कंटेंट अपडेटसाठी कृपया अदानी सर्विसनाउ पोर्टल (https://adani.service-now.com) वर तिकीट उघडा.

## अमेरिकन ऑन्कोलॉजी इन्स्टिट्यूट (एओआय) नागपूरने केली गॅलियम जनरेटर सुविधा उपलब्ध



**नागपूर, ३ जून :** नागपूर स्थित अमेरिकन ऑन्कोलॉजी इन्स्टिट्यूट(एओआय) नागिया स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये आता ऍडव्हान्स गॅलियम जनरेटरवर आधारित पेट-सिटी(-)स्कॅन इमेजिंग सेवा उपलब्ध झाली आहे. या नव्या तंत्रज्ञानामुळे संस्थेच्या न्यूक्लिअर मेडिसिन आणि मॉलिक्युलर इमेजिंग क्षमतांमध्ये मोठी भर पडली आहे. ही नव्याने उपलब्ध सुविधा आता एओआय, नागपूरला विविध प्रकारचे कॅन्सर व संसर्गजन्य आजारांचे अधिक वेगवान व अचूक निदान करण्यास सक्षम बनवते आणि प्रिसिजन ऑन्कोलॉजी क्षेत्रात नागपूरमधील आघाडीचे केंद्र बनवते.

एओआय नागपूरमध्ये आता उपलब्ध असलेला गॅलियम जनरेटर काही विशिष्ट प्रकारचे कॅन्सर व इंफेक्शन्सचे निदान अधिक जलद व अचूकपणे करू शकतो. या प्रगत तंत्रज्ञानामुळे गॅलियम-६८ हे रेडिओआइसोटोप संस्थेमध्येच तयार करता येते, जे पेट-सिटी स्कॅनमध्ये वापरले जाते. यामुळे न्यूरोएन्डोक्राइन ट्युमर, प्रोस्टेट कॅन्सर, तसेच दुर्मिळ ट्युमर जसे परॅगॅन्लिओमा आणि फिओक्रोमोसायटोमा यांचे निदान शक्य होते. शिवाय, हे निदान न लागलेला ताप व इन्फ्लेमेटरी कंडिशन्स (दाहजन्य आजार) च्या निदानासाठीही उपयुक्त आहे. या सुविधेमुळे रुग्णांना उच्च प्रतीच्या निदान सेवेसाठी कुठेही प्रवास करण्याची गरज न पडता स्थानिक पातळीवरच उशीर न होता उपचार मिळू शकतात.

एओआय नागपूरचे न्यूक्लिअर मेडिसिन कन्सल्टंट डॉ. रोहित काकडे यांनी याचे क्लिनिकल महत्त्व स्पष्ट करताना सांगितले, गॅलियम जनरेटर नागपूरमध्ये कॅन्सर इमेजिंगच्या दृष्टिकोनात क्रांती घडवत आहे. हे हाय-स्पेशालिटी इमेजिंग प्रदान करते, जे लवकर निदान, अचूक स्टेजिंग व उपचार प्रतिसादाच्या निरीक्षणासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे; विशेषतः प्रोस्टेट कॅन्सर आणि न्यूरोएन्डोक्राइन ट्युमरसारख्या क्लिष्ट प्रकरणांमध्ये. तसेच, हे संसर्गजन्य व दाहजन्य आजारांचे निदान करण्यातही उपयोगी ठरते, ज्यामुळे ऑन्कोलॉजीच्या पलीकडेही रुग्णसेवेचा मार्ग मोकळा होतो.

एओआय नागपूरचे सेंट्रल ईस्ट रिजनचे झोनल डायरेक्टर डॉ. हृषिकेश फाटे यांनी पुढे सांगितले, गॅलियम जनरेटरची सुरूवात हा एओआय नागपूरला एक अत्याधुनिक सुविधा असलेल्या सर्वसमावेशक कॅन्सर सेंटर म्हणून मजबूत करण्याचा एक रणनीतिक टप्पा आहे. आमचे ध्येय म्हणजे नागपूर व मध्य भारतातील रुग्णांना त्यांच्या परिसरातच अत्याधुनिक निदान व उपचार उपलब्ध करून देणे, जेणेकरून त्यांना बाहेर कुठेही जावे लागू नये.

अमेरिकन ऑन्कोलॉजी इन्स्टिट्यूट, नागपूर सतत नावीन्यपूर्ण सुविधा आणत आहे आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानात गुंतवणूक करत आहे, जेणेकरून संपूर्ण भागातील रुग्णांना उत्कृष्ट वैद्यकीय गुणवत्ता आणि काळजीवाहू सेवा मिळू शकेल.



## सहा गावातील विद्यार्थ्यांना मिळाली चार लाख रुपयांची शिष्यवृत्ती

**नागपूर, ३ जून :** शिक्षण विकास कार्यक्रमांतर्गत सुराबर्डी ग्रामपंचायतीजवळील कम्युनिटी हॉलमध्ये एकलव्य शिष्यवृत्ती पुरस्कार सोहळा अदानी फाउंडेशनच्या सीएसआर उपक्रमाअंतर्गत आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात ग्रामीण भागातील व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले, ज्यामुळे शिक्षणाप्रती जागरूकता निर्माण होण्यास एक नवीन दिशा मिळाली. या कार्यक्रमात, आलेसुर, साहुली, गोंडखैरी, कळंबी, सुराबर्डी आणि वडधामना या एकूण ६ गावांमधील २२ गुणवंत विद्यार्थ्यांना (१३ मुली आणि ९ मुले) ४,४२,८९९ रुपयांच्या शिष्यवृत्ती देण्यात आली. या कार्यक्रमात पालक आणि विद्यार्थ्यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यामध्ये साहुली आणि आलेसुर येथील २ विद्यार्थ्यांना ४०,००० रुपये, गोंडखैरी येथील ३ विद्यार्थ्यांना ७१,८५१ रुपये, कळंबी येथील ४ विद्यार्थ्यांना ७८,४९८ रुपये, सुराबर्डी येथील ८ विद्यार्थ्यांना १,६०,००० रुपये आणि वडधामना येथील ५ विद्यार्थ्यांना ९२,५५० रुपये देण्यात आले. या शिष्यवृत्ती विशेषतः अशा शिक्षणासाठी दिल्या जातात ज्यामुळे विद्यार्थ्यांना नोकरी मिळण्यास मदत होते, जेणेकरून गावातील मुले स्वतःवर विश्वास ठेवू शकतील आणि स्वतःच्या तसेच गावाच्या विकासात योगदान देऊ शकतील.

यावेळी सावनेरचे एसडीएम संपत खलाटे, सुराबर्डीचे सरपंच कविता अंबटकर, कळंबीचे सरपंच विनोद भोयर, आलेसूर व साहुलीचे सरपंच माला निकोसे, ग्रामपंचायत सदस्य मारुती खळतकर, अमोल आंबटकर, प्रवीणकुमार शिंदे, अदानी पॉवरचे महाव्यवस्थापक संपत कुमार, प्रेरणा एनजीओचे श्री. पद्माकर, श्री. हिमांशू आणि श्री. अभिषेक या कार्यक्रमाला उपस्थित होते.

## वेदांतूचा विद्यार्थी दक्षने पटकावला कर्नाटकात प्रथम क्रमांक आणि जेईई ॲडव्हान्स २०२५ मध्ये एआयआर १५




**नागपूर, ३ जून :** वेदांतू या जेईई तयारीसाठीच्या भारतातील आघाडीच्या शैक्षणिक व्यासपीठाने अत्यंत अभिमानाने जेईई ॲडव्हान्स २०२५ मधील त्यांच्या विद्यार्थ्यांची अप्रतिम कामगिरी जाहीर केली आहे. दरवर्षी अव्वल क्रमांक आणि सातत्याने चांगल्या निकालांसोबतच यंदाही वेदांतूने उच्च दर्जाचे, वैयक्तिक आणि परिणामांवर भर देणारे शिक्षण देण्याची आपली परंपरा कायम राखली आहे.

लक्षणीय यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये बेंगळुरुच्या दक्ष तयालिया याने गणितात पूर्ण १२० गुण आणि ऑल इंडिया रँक १५ मिळवत कर्नाटक राज्यात १ क्रमांक मिळवला आहे. वेदांतूच्या ३ वर्षांच्या लॉंग टर्म बॅचचा विद्यार्थी असलेल्या दक्षने अखंड शिस्त, चिकाटी आणि या शिक्षण पद्धतीवर दाखवलेला विश्वास खरेच प्रेरणादायी आहे. वेदांतू कुटुंबासाठी आणखी एक अभिमानाची बाब म्हणजे गोरखपूरमधील प्रखर सिंग. लॉंग टर्म बॅचचा विद्यार्थी असलेल्या प्रखरने एआयआर ९२ मिळवला आहे. ध्येयावर पूर्ण लक्ष केंद्रित करत प्रचंड मेहनत, लवचिकता आणि तज्ज्ञांच्या मार्गदर्शनामुळे त्याने हे लक्षणीय यश प्राप्त केले आहे.

हे यश इतक्यापुरतेच मर्यादित नाही. वेदांतूच्या विद्यार्थ्यांनी दमदार, सातत्यपूर्ण कामगिरी केली आहे. यात ८ विद्यार्थ्यांनी टॉप १०० मध्ये, २० टॉप ५०० मध्ये आणि ८३ टॉप ५,००० मध्ये स्थान मिळवले आहे - ही वेदांतूच्या वैयक्तिकृत, परिणाम-केंद्रित शिक्षण पद्धतीच्या यशाची पावती आहे.

आमच्या विद्यार्थ्यांना या स्तरावर यशस्वी होताना पाहणे हे मनाला स्पर्श करणारे आणि उत्साहवर्धक आहे, असे वेदांतूचे सह-संस्थापक आणि शैक्षणिक प्रमुख आनंद प्रकाश म्हणाले. प्रत्येक रँकमागे चिकाटी, विश्वास आणि हुशारी, कठोर परिश्रमाची कहाणी आहे हे जाणून घेणे या यशाला आणखी खास बनवते. या निकालांतून आमच्या शैक्षणिक पद्धतीचे महत्त्व प्रतित होते. आम्ही वैयक्तिकृत समर्थन, व्यापक अभ्यास संसाधने आणि उत्क्ष्ट मार्गदर्शन यांची एकत्रित जोड देऊन प्रभावी पद्धत निर्माण केली आहे. हा क्षण शक्य करणाऱ्या आमच्या सर्व विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांचे अभिनंदन.

## कॅरेटलेनने 'रनवे' लॉंच केले: पहिले फाईन ज्वेलरी कलेक्शन



**मुंबई, ३ जून :** टाटाची उपकंपनी असलेल्या कॅरेटलेनने अलीकडेच एक नवे, क्रांतिकारी ज्वेलरी कलेक्शन लॉन्च केले - 'रनवे'. विमान वाहतूक क्षेत्रातील महिलांचा उत्साह, महत्त्वाकांक्षा आणि सौंदर्याचा सन्मान यामध्ये करण्यात आला आहे. या लॉन्चसह कॅरेटलेन हा पहिला भारतीय दागिने ब्रँड बनला आहे जो आकाशात आपले कौशल्य दाखवणाऱ्या अग्रगण्य महिलांचा सन्मान करत आहे. कॅरेटलेनने मुंबईतील वांद्रे येथील त्यांच्या सिग्नेचर स्टोअरमध्ये ब्रँडने एका भव्य विशेष कलेक्शन प्रिव्ह्यू कार्यक्रमाचे आयोजन केले होते. वास्तविक जीवनातील केबिन क्रूंना यासाठी विशेष आमंत्रित केले होते. अभिनेत्री, राजकारणी आणि साहसप्रेमी गुल पनाग यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शान वाढवली. त्या स्वतः देखील एक परवानाधारक खाजगी पायलट आहेत.

कॅरेटलेनचे एमडी श्री. सौमेन भौमिक म्हणाले, भारतातील विमान वाहतूक हा जगभरातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या उद्योगांपैकी एक आहे आणि आम्हाला अभिमान आहे की आपल्याकडे महिला पायलटची संख्या सर्वाधिक आहे. राष्ट्रीय विमान कंपनी एअर इंडियाच्या काळापासून, विमान वाहतूक कर्मचारी स्टाईलचे आणि उदयोन्मुख, आधुनिक भारताचे प्रतीक मानले जात आहेत. विचारपूर्वक डिझाइन केलेले हे कलेक्शन दररोज आपले आकाश सुरक्षित, अधिकाधिक चांगले आणि स्मार्ट बनवणाऱ्या धाडसी महिलांना सन्मानित करते.

गुल पनाग म्हणाल्या, या कलेक्शनने माझ्या हृदयाला स्पर्श केला आहे. विमान वाहतुकीने मला पंख दिले आणि आता असे दागिने आहेत जे या भावनेला इतक्या स्टायलिश आणि शाश्वत पद्धतीने साजरे करतात. हे कलेक्शन विमान उड्डाण प्रेमींसाठी परिपूर्ण आहे. उड्डाणापेक्षा चांगली गोष्ट म्हणजे स्टाईलमध्ये उड्डाण करणे ही आहे!

विमान वाहतूक, प्रवास आणि अशा अनोख्या डिझाइनमध्ये रस असलेले ग्राहक www.caratlane.com वर ऑनलाइन किंवा भारतातील निवडक स्टोअरमध्ये हे कलेक्शन पाहू शकतात.

## जेव्हा तुम्हाला तुमचं 'खरं प्रेम' सापडेल, तेव्हा प्लॅटिनम लव बँड्स 'द वेडिंग एडिशन'ने साजरा करा



**मुंबई, ३ जून :** २०२५ च्या उन्हाळी लग्नसराईला लक्षात घेऊन प्लॅटिनम लव्ह बँड्ने 'द वेडिंग एडिशन' या खास जोडप्यांसाठीच्या बँड्सच्या संग्रहाची घोषणा केली आहे. ९५% शुद्ध प्लॅटिनमपासून तयार करण्यात आलेले हे बँड्स, प्रेम आणि बांधिलकीचं प्रतीक ठरतात. या नव्या शृंखलेत प्रेमाच्या विविध पैलूंना अधोरेखित करणाऱ्या खास डिझाइन्सचा समावेश आहे. हे बँड्स केवळ सौंदर्यपूर्ण नसून, दोन व्यक्तींच्या भावनिक नात्याची खोली दाखवतात, असा दावा कंपनीने केला आहे.

९५% शुद्ध प्लॅटिनममध्ये तयार केलेले प्लॅटिनम लव्ह बँड्स 'द लाखात एक' प्रेमाच्या भावनेचे दुर्मिळ आणि कालातीत प्रतिध्वनी आहेत. ताऱ्याखाली किंवा लग्नाच्या गोंधळात शांत क्षणी देवाणघेवाण असो, हे बँड अशा जोडप्यांसाठी बनवले जातात जे नात्याचा सखोल अर्थ शोधतात - परस्पर आदर, वैयक्तिकता आणि खरोखरच दुर्मिळ असलेल्या प्रेमावर बांधलेल्या भागीदारीचे प्रतीक. तुम्ही एखाद्या भव्य उत्सवाची योजना आखत असाल किंवा एखाद्या छोट्याशा प्रसंगाची योजना आखत असाल, तर प्लॅटिनम लव्ह बँड्स 'द वेडिंग एडिशन' हे तुमच्या प्रवासाला एका दुर्मिळ मौल्यवान धातूने सजवण्यासाठी आमंत्रण आहे जे खरोखरच अद्वितीय आहे.


देशभरातील आघाडीच्या ज्वेलर्समध्ये प्लॅटिनम लव्ह बँड्स - द वेडिंग एडिशन एक्सप्लोर करा. प्लॅटिनम सीझन ऑफ लव्ह आता दुकानांमध्ये उपलब्ध आहे, तुमच्या कथेसारख्या दुर्मिळ धातूने तुमचे वचन पूर्ण करण्याची हीच योग्य वेळ आहे. आणि ६०,००० प्रति जोडी पासून सुरू होणाऱ्या किमतींसह, सर्वात मौल्यवान वस्तू तुमच्या विचारापेक्षा जवळची असू शकते.

## कलाकारांनी दूधासंदर्भातील जुन्या आठवणींना उजाळा दिला



**मुंबई, ३ जून :** वर्ल्ड मिल्क डे पोषणाचा पॉवरहाऊस आणि घराघरामध्ये असणाऱ्या दूधाच्या पौष्टिकतेला साजरे करतो. बालपणीच्या आठवणींपासून दैनंदिन आरोग्य नित्यक्रमांपर्यंत दूध नेहमी आपल्या आहारातील लोकप्रिय भाग राहिले आहे. या दिनानिमित्त एण्ड टीव्ही कलाकारांनी दूधाप्रती त्यांच्या आवडीबाबत, तसेच या पौष्टिक पेयाला देणाऱ्या अद्वितीय ट्विस्ट्सबाबत सांगितले. हे कलाकार आहेत गीतांजली मिश्रा (राजेश, 'हप्पू की उलटन पलटन') आणि रोहिताश्व गौड (मनमोहन तिवारी, 'भाबीजी घर पर है'). मालिका 'हप्पू की उलटन पलटन'मधील गीतांजली मिश्रा ऊर्फ राजेश म्हणाल्या, ''मी आरोग्यदायी फायद्यांसहकम्फर्टसाठी दररोज दूध पिते. मी दूधाला स्पेशल ट्विस्ट देत केशर बदाम मसाला दूध बनवते. मी रात्रभर बदाम पाण्यामध्ये भिजवून ठेवते, त्यानंतर त्यांची पेस्ट तयार करते आणि त्यासोबत केशर, वेलची व पिस्ताचे तुकडे घालत दूध गरम करते. हे स्वादिष्ट असण्यासोबत पौष्टिक आहे, ज्यामुळे दिवसभर शूटिंगनंतर या दूधाचा आस्वाद घेतल्यानंतर छान वाटते. मी लहानपणापासून हे दूध पित आहे आणि आजही या दूधाचा आस्वाद घेत आहे. या दूधाचे अनेक आरोग्यदायी फायदे आहेत. ते त्वचेसाठी उत्तम आहे, त्यामधून ऊर्जा मिळते आणि एकूण आरोग्य उत्तम राहते. या ट्विस्टसह दूधाचा आस्वाद घेणे माझे सिक्रेट ब्युटी रूटिन आहे.'' मालिका 'भाबीजी घर पर है'मधील रोहिताश्व गौड ऊर्फ मनमोहन तिवारी म्हणाले, ''शिमलामधील डोंगराळ भागामधून असल्यामुळे गरमागरम दूध नेहमी माझ्या नित्यक्रमाचे भाग राहिले आहे, विशेषत: हिवाळ्यामध्ये रात्रीच्या वेळी गरमागरम दूध प्यायचो. माझे अद्वितीय ट्विस्ट म्हणजे दूधामध्ये थोडी हळद, चिमूटभर दालचिनी आणि एक चमचा गूळ टाकतो. हे 'हळदीचे दूध' आरोग्यदायी व रोगप्रतिकारशक्ती वाढणारे आहे, तसेच माझ्या बालपणीच्या जुन्या आठवणींना उजाळा देखील देते. मला आाठवते, मी माझ्या भावंडांसोबत रजाईमध्ये बसायचो आणि आईने बनवलेल्या या दूधाचा आस्वाद घ्यायचो. आजही हे पेय मला जुन्याआठवणींचेस्मरण करून देते आणि मला उत्साहित होण्यास मदत करते. माझ्यासाठी दूध पोषणापेक्षा अधिक आहे. ते परंपरागत, कम्फर्ट असण्यासोबत नेहमी मला घराची आठवण करून देते.''

## शब्दकोडे क्रमांक २१२८



**आडवे शब्द :-**


१) शिकस्त करुन कंटाळणे
६) रस्ता
१०) त्रासणे
११) सीतापती
१२) किंचित छोटा
१३) जंगलाला लागलेली आग
१४) अफवा
१६) च्या प्रमाणे
१८) सदोदित
१९) मंत्रीमंडळ
२१) आवश्यकता, नड
२२) धनको, कर्ज देणारा
२४) रोख रक्कम
२५) शिकार
२६) बडबड्या
२८) दरोडेखोरांचा नायक
३०) किंमत, निष्ठा
३१) डोंगर, पर्वत
३२) छोटी वस्ती
३३) वर-वधू
३७) कठिण, त्रासदायक
३९) आकाश
४०) काडीमोड
४१) पाय
४३) दूर करणारा (रोग वगैरे)
४५) मुक्तता
४६) चंद्र
४८) महिना
४९) पर्वताचा उंच तुटलेला कडा
५१) च्या शिवाय
५२) फळाची फोड
५४) ग्रहण करणे, जाणणे
५५) पत्रातील ता क
५७) वसुंधरा
५८) किंचित कडू चव
६०) देह
६२) बगळा
६३) पुरुष
६५) चकाकणारा पांढरा दगड
६८) नष्ट होणारे, नाशिवंत
६९) अवास्तव
७०) चालू काळात
७१) खिडकी

**उभे शब्द :-**

२) एक क्षार
३) प्रतिकूल मत, समीक्षा
४) फुरसतीप्रमाणे
५) जाणेच्या विरुद्ध
६) तादात्म्य, एकरूप
७) केसांना लावण्याचा रंग
८) मेंढपाळ
९) मंत्रीमंडळ
११) राणीचा नवरा
१४) छोटा, सान
१५) कल्लोळ, आरडाओरडा
१७) सावधानता
१९) सडपातळ
२०) सरकारी नियम
२१) गजवदन
२३) कणीदार पीठ
२५) पवित्र
२७) पैंजण
२९) रमणारा, आसक्त
३०) पुष्कळ
३२) रिकामपण, उसाचे पीक
३४) अरण्यवास
३५) रंग
३६) अनाथ
३७) धोकादायक
३८) मांडणी
४०) दरवाजा
४२) रथ तयार करणारा, सुतार
४३) अर्धा
४४) किरकिर, त्रास, बडबड
४५) फूल, पुष्प
४७) एक रत्न
५०) मनाचा ओढा
५१) पायजमा
५३) ओंजळभर
५४) आलेले, *** जावक
५५) दिनांक
५६) मसाल्यातील, विड्यातील एक पदार्थ
५९) इमारतीच्या पायात भरण्याचा दगड
६१) उद्याच्या नंतरचा दिवस
६३) नूतन
६४) पराग, मातीचा कण
६५) सांज
६६) नंतर
६७) छाती

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



## आज का अंदाज

बुधवार ४ जून २०२५

पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३ | ४ | ६ | २ | ५ | ७ | ८ |
| १०० | १२० | १६७ | १२३ | ११० | १२२ | १६० | १३४ |
| २९० | २३८ | २६६ | २६८ | २४६ | २६७ | २५० | २३३ |
| ५६० | ३०० | ३५६ | ३६७ | ४८० | ३६६ | ७०० | ३५० |
| १३ | ३२ | ४२ | ६३ | २३ | ५२ | ७३ | ८२ |
| १४ | ३५ | ४५ | ६४ | २६ | ५४ | ७४ | ८४ |
| १५ | ३७ | ४७ | ६९ | २९ | ५८ | ७० | ८९ |

४ जून : सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| २३ | ४१ | ५२ | ८४ |
| २६ | ४२ | ५४ | ८५ |
| २९ | ४६ | ५८ | ८७ |

## राशीभविष्य

**मेष :** मानसिक आरोग्यासाठी पुरेशी झोप आणि निसर्गरम्य ठिकाणी वेळ घालवणे फायद्याचे ठरेल. जीवनसाथीमुळे घरात आनंदी वातावरण राहील. रोजगाराची नवीन संधी मिळण्याची शक्यता आहे.

**वृषभ :** नवीन कल्पनांसह विशेष काम सुरु कराल. आत्मविश्वास वाढेल. विद्यार्थ्यांना नव्या नोकरीची संधी मिळेल. प्रवासाचे योग संभवतात. कुटुंबासोबत रमणीय स्थळी जाण्याची योजना आखाल.

**मिथुन :** आजचा दिवस मिश्र स्वरूपाचा असेल. संगीताकडे ओढा राहील. एखाद्या शोमध्ये गाण्याची अपेक्षित संधी मिळाल्याने खूप आनंदी असाल. घरात संततीरुपी लक्ष्मीचे आगमन होईल.

**कर्क :** सामाजिक आणि राजकीय कार्यात मन लागेल. आर्थिक बाजू सुधारेल. राजकारणातील व्यक्तींचा प्रभाव वाढेल. व्यवसायात दुप्पट लाभाचा योग संभवतो. मालमत्ता खरेदीसाठी आई-वडिलांचा सल्ला घ्या.

**सिंह :** राजकीय विषयावर तुमचे मत मांडल्यास त्याचा स्वीकार केला जाईल. व्यापाजयांसाठी दिवस सामान्य राहील. व्यवसायात मुलांचे सहकार्य मिळेल. जुन्या मालमत्तेच्या व्यवहारातून अचानक धनलाभ संभवतो.

**कन्या :** आज सन्मानात्मक वागणूक मिळेल. आर्थिक समस्या सोडवून कंपनीला दुप्पट लाभ मिळवून द्याल. वरिष्ठांकडून प्रशंसा आणि सन्मान मिळेल. तसेच वरिष्ठ पदावर नेमणूक होण्याची शक्यताही आहे.

**तुळ :** आजचा दिवस उत्साहपूर्ण असेल. संध्याकाळपर्यंत घरात आनंदाचे वातावरण मिळेल. ऑफिसचे काम वेळेत पूर्ण होईल. कुटुंबियांसोबत वेळ घालवाल. अनावश्यक सल्ला देणे टाळा.

**वृश्चिक :** आजचा दिवस आनंददायी आणि ऊजार्वान असेल. त्यामुळे तुमची कामे वेळेवर पूर्ण होतील. आत्मविश्वास बाळगावा. चुकीच्या लोकांपासून सावध रहा. काळजीपूर्वक निर्णय घ्या, घाई टाळा.

**धनु :** प्रगतीची नवीन साधने मिळतील. चांगल्या लोकांच्या भेटीने दिवस सुधारेल. मन प्रसन्न होईल. व्यवसायात प्रगती होईल. वैवाहिक संबंधात नवचैतन्य निर्माण होईल.

**मकर :** लोकांची ये-जा आणि छोटी पार्टी संभवते. मित्रांसोबत बाहेर जाण्याचा योग आखाल. विद्यार्थ्यांसाठी दिवस चांगला असेल.व्यवसायात नवीन योजना सुरु करण्यापूर्वी इतरांचा सल्ला घ्या.

**कुंभ :** आज तुम्हाला पैसे मिळतील. वडिलांच्या आर्थिक मदतीने कामातील कोणताही महत्त्वाचा अडथळा दूर होईल. व्यवसायात कोणताही नवीन प्रकल्प फायदेशीर ठरेल.

**मीन :** आज प्रेम प्रकरणात अचानक नवीन वळण येऊ शकते. बोलण्यावर नियंत्रण ठेवा. वैवाहिक जीवनात, तुमच्या जोडीदाराकडून सकारात्मक पाठिंबा वाढेल. वाहन चालविताना काळजी घ्या.

# मागणी ५४६ कोटींची, मंजूर झाले केवळ ३०० कोटी

■ महासागर प्रतिनिधी,

यवतमाळ , दि. ३ : दरवर्षी खरीप हंगामात पीककर्ज वाटप करण्याचे काम जिल्हा मध्यवर्ती बँक करते. त्यासाठी जिल्हा बँकेने राज्य बँकेकडे ५४६ कोटी रुपयांची मागणी केली होती. मात्र त्यापैकी केवळ ३०० कोटी रुपये मंजूर करण्यात आले असुन ठेवी वगळता बँकेच्या हाती केवळ १२० कोटी रुपयेच येणार आहेत. अशा स्थितीत बँकेला देण्यात आलेले उद्दीष्ट शंभर टक्के पूर्ण करण्यात अडचणी येणार असल्याचे दिसत आहे. यंदा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना खरीप हंगामासाठी तब्बल २२०० कोटी रुपयांचे पीककर्ज उपलब्ध करुन देण्याचे उद्दीष्ट प्रशासनाने सर्व बँकांना दिले आहे. त्यात शेतकऱ्यांची बँक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला ६७० कोटी रुपये पीककर्ज वाटपाचे उद्दीष्ट देण्यात आले आहे. त्यापैकी आतापर्यंत बँकेने तब्बल ४५० कोटी रुपयांचे पीककर्ज वितरीतही केले आहे. मात्र आता पिककर्जाचे उद्दीष्ट शंभर टक्के पूर्ण करण्यासाठी बँकेला पैशांची आवश्यकता भासणार आहे. या पीककर्ज वाटपासाठी जिल्हा बँकेने राज्य बँकेकडे ५४६ कोटी रुपयांची मागणी पत्राद्वारे केली होती. त्यापैकी ३०० कोटी रुपये राज्य बँकेने मंजूर केले आहे. त्यासंदर्भातील पत्र जिल्हा बँकेला प्राप्त झाले असून त्याची प्रक्रीया पूर्ण करुन काही पैशांची उचलही जिल्हा मध्यवर्ती बँकेने केली आहे. त्या पैशांच्या माध्यमातुन शेतकऱ्यांना पीककर्ज वितरीत करण्यात येत आहे. बँकेकडे वसुल होणारा निधी आणि राज्य बँकेकडून मिळालेला निधी ही रक्कम मिळून जवळपास उद्दिष्टाच्या ८० टक्के पीककर्ज वितरीत करण्याची तयारी बँकेने केली आहे. मात्र बँकेला प्रत्यक्षात ६७० कोटी रुपयांचे पीककर्ज खरीप हंगामासाठी वितरीत करण्याचे उद्दीष्ट असल्याने ते पुर्णत्वास जाण्याची शक्यता सध्या दिसत नसल्याचे बँक प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे. जिल्हा मध्यवर्ती बँक ही सर्वाधीक पीककर्ज वितरीत करणारी बँक आहे. त्यामुळे या बँकेचे नियमीत कर्ज भरणा करणारे सभासद शेतकरी आपल्याला पीककर्ज मिळेलच या आशेवर असतात. मात्र यंदा परिस्थिती पाहता जिल्हा बँकेचे उद्दीष्ट ८० टक्क्यांपर्यंत पुर्ण होणार असल्याचे दिसत आहे. त्यामुळे पुढील २० टक्के कर्ज वाटपाच्या उद्दीष्टामध्ये समावेश असलेल्या सभासद शेतकऱ्यांना पीककर्ज मिळण्यामध्ये अडचणी आहेत. गेल्या वर्षी होती उद्दीष्ट कमी करण्याची केली मागणी २०२३ च्या खरीप हंगामात बँकेने उद्दीष्टापेक्षा अधिक प्रमाणात पीककर्ज शेतकऱ्यांना वाटप केले होते. त्यामुळे बँक आर्थीक अडचणीत आली आहे. ही परिस्थिती पाहता जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वतीने २०१४ च्या खरीप हंगामादरम्यान पीककर्ज वाटपाचे उद्दीष्ट कीमान २० टक्के कमी करावे अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली होती. मात्र ती मागणी करुनही उद्दीष्ट वाढवून देण्यात आले होते. यंदा तशी मागणी करण्यात आली नाही मात्र निधीअभावी उद्दीष्ट पुर्तीमध्ये यंदाही मोठ्या अडचणी येणार असल्याचे बँकेच्या वतुर्ळात बोलण्यात येत आहे. स्थानिक पुढाऱ्यांचा हवा मदतीसाठी पुढाकार जिल्हा बँकेमध्ये जवळपास सर्वच राजकीय पक्षाचे संचालक आहेत.जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी आशेचा कीरण असलेल्या जिल्हा बँकेची आर्थीक परिस्थिती भक्कम होण्यासाठी जिल्ह्यातील राजकीय पुढाऱ्यांकडून कुठल्याही प्रकारचा विशेष पुढाकार घेण्यात येत नसल्याचे दिसते.

### जिल्हा बँकेपुढे शंभर टक्के कर्ज वाटपासाठी आव्हान




## इर्विनमधील २० खाटांचा 'आयसीयू' कार्यान्वित

अमरावती : जिल्हा सामान्य रुग्णालयातील वॉर्ड क्र. ८ मध्ये २० खाटांचे आयसीयू विभागाचे काम मागील दीड वर्षापासून सुरू होते. या विभागाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पूर्ण झाल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे येत्या आठवडाभरात रुग्णांच्या सेवेत येथील आयसीयू कार्यान्वित करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने हालचालींना वेग आला आहे. जिल्हा सामान्य रुग्णालयात रोज शेकडो रुग्ण उपचारासाठी दाखल होतात. ग्रामीण भागातील रुग्णालयांतून अनेक गंभीर रुग्ण या ठिकाणी उपचारासाठी रेफर केले जातात. परंतु, जिल्हा सामान्य रुग्णालयात केवळ ६ आयसीयू बेड असल्याने अनेक गंभीर रुग्णांना आयसीयूची गरज असताना वेळेत आयसीयू बेड मिळत नसल्याने त्यांना नागपूर येथे रेफर केले जाते. तसेच खाटा कमी पडल्यास रुग्णांना त्रासदायक ठरते. तसेच रुग्णांच्या नातेवाइकांची धावपळ होते. अशातच जिल्हा रुग्णालय हे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या ताब्यात गेल्याने, येथे वॉर्ड क्र. ८ मध्ये २० खाटांचे आयसीयू विभाग सुरू करण्याचे काम सुरू आहे.

## स्वच्छ, सुंदर बस स्थानक अभियान मेहकर आगाराचे पहिले सर्वेक्षण



■ महासागर प्रतिनिधी,

मेहकर , दि. ३ : हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बस स्थानक अभियानांतर्गत आज, दि. ३१ मे रोजी सर्वेक्षण समितीने मेहकर आगाराचे पहिले सर्वेक्षण केले. राज्य परिवहन महामंडळाच्या पुणे प्रदेशच्या प्रादेशिक व्यवस्थापक अमृता ताम्हणकर व पुणे प्रदेशचे वरिष्ठ सांख्यिकी अधिकारी दादासाहेब गावडे यांच्यासह स्थानिक सर्वेक्षण समिती सदस्य म्हणून प्रदीप जोशी आणि रफिक कुरेशी यांनी हे सर्वेक्षण केले. सर्वप्रथम प्रादेशिक व्यवस्थापक अमृता ताम्हणकर व दादासाहेब गावडे यांनी मेहकर बस स्थानकाची पाहणी केली. मेहकर आगार व्यवस्थापक हर्षल साबळे यांच्याशी चर्चा करून मेहकर बस स्थानक व आगाराबाबत माहिती घेतली. यावेळी बांधकाम अभियंता अजय नाईक, स्थानक प्रमुख समाधान जुमडे, सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक राहुल देशमाने, वाहतूक नियंत्रक समाधान सोनुने यांच्यासहित उपस्थित होते.

## स्व. डॉ. श्रीकांत जिचकार पुण्यतिथी कार्यक्रम संपन्न



अमरावती , दि. ३ : स्व.डॉ. श्रीकांत जिचकार यांच्या पुण्यतिथीनिमित्त संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. श्रीकांत जिचकार स्मृति संशोधन केंद्रात अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी स्व.डॉ. श्रीकांत जिचकार यांच्या प्रतिमेचे पूजन, हारार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. पुण्यतिथी कार्यक्रमाला आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, आय.क्यु.ए.सी. संचालक डॉ. संदीप वाघुळे, केंद्राचे संचालक डॉ. संदीप जोशी, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, उपअभियंता (विद्युत) श्री राजेश एडले, आय.आय.एम.सी. चे संचालक डॉ. राजेश कुशवाह, डॉ. विनय सोनुले तसेच विद्यापीठाचे अधिकारी, कर्मचारी व महिला कर्मचारी उपस्थित होते.

## महावितरणतर्फे मॅरेथॉन रॅलीने विद्युत सुरक्षा सप्ताह सुरू



■ महासागर प्रतिनिधी,

बुलडाणा , दि. ३ : महावितरणच्या वर्धापनदिन निमित्ताने 'शून्य अपघात महावितरण, शून्य अपघात महाराष्ट्र' ही संकल्पना मांडत राज्यात विद्युत सुरक्षा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहाची सुरुवात १ मे रोजी मॅरेथॉन रॅलीने करण्यात आली. या सप्ताहाचा समारोप ६ जून रोजी केला जाणार आहे. सुरक्षा सप्ताहादरम्यान विविध स्पर्धेचे आयोजन महावितरणच्या वतीने केले जाणार आहे. यात मॅरेथॉन, रॅली, निबंध व चित्रकला स्पर्धेचा समावेश आहे. तसेच ग्राहकांना सुरक्षाविषयक ई-मेलव एसएमएस पाठविणे, भित्तीपत्रके, चित्रफिती अशा विविध माध्यमांद्वारे विद्युत सुरक्षेविषयी मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात येणार आहे. मागील काही वर्षांमध्ये वीज अपघाताचे प्रमाण कमी करण्यात महावितरणला यश आले आहे. मात्र तरीही विविध कारणास्तव अपघात होतात. विद्युत अपघाताचे प्रमाण अजून कमी करण्यासाठी महावितरणने विद्युत सुरक्षा सप्ताह आयोजित करून व्यापक जनजागृती कार्यक्रम हाती घेतला आहे. 'आम्ही सुरक्षेचे शिल्पकार शुन्य अपघाताने करू महावितरणचे ध्येय साकार' हे ब्रीद घेऊन महावितरणच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयात १ ते ६ जूनदरम्यान विद्युत सुरक्षा सप्ताहात विविध कार्यक्रम राबवण्यात येत आहे. ग्राहकांना विद्युत सुरक्षा विषयी ई-मेल पाठविणे. बाजार व इतर सार्वजनिक ठिकाणी विद्युत सुरक्षा विषयी जनजागृती, ३ व ४ जून रोजी कर्मचाऱ्यांच्या पाल्यांसाठी आणि कुटुंबीयांसाठी तसेच शालेय विद्यार्थ्यांकरिता विद्युत सुरक्षाविषयक निबंध, चित्रकला स्पर्धा, महावितरण अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी विद्युत सुरक्षा विषयी निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. ५ जून वसुंधरा दिनी १५० विभागीय स्तरावर विद्युत सुरक्षा व वीज बचत विषयी रॅली काढण्यात येणार आहे.

६ जून रोजी सकाळी १० वाजता राज्यातील सर्व शाखा कार्यालयातील जन मित्रांसाठी विद्युत सुरक्षा प्रतिज्ञा कार्यक्रम घेत सदर सप्ताहाचा समारोप केला जाणार आहे.बुलडाणा सह सर्व परिमंडळ कार्यालयाच्या मुख्यालयाच्या शहरात मॅरेथॉन 'रन फॉर सेफ्टी' ने सप्ताहाची सुरुवात करण्यात आली. या रॅलीला मुख्य अभियंता अजय शिंदे यांनी हिरवी झेंडी दाखवली. दरम्यान, यावेळी रॅलीत मोठया प्रमाणात महिला, पुरुष कर्मचारी सहभागी झाले.

# १२ तास वीज देणारा सौरपंप,१२ फुटांचा रस्ता पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली घोषणा

■ महासागर प्रतिनिधी,

अमरावती , दि. ३ : १२ तास वीज पुरेल असा सौरपंप, १२ फुटाचा पाणंद रस्ता आणि अपंग व ज्येष्ठ नागरिकांना आवश्यकतेनुसार सहायक उपकरणांचा पुरवठा करण्यास सरकार कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन महसूलमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त वडाळी स्थित नरेंद्र भिवापूरकर अंध विद्यालयात 'अलिम्को'तर्फे सहायक उपकरणे वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला. या वेळी कार्यक्रमाध्यक्ष म्हणून ते बोलत होते. आ. प्रताप अडसड, केवलराम काळे, चंदू यावलकर व



प्रवीण तायडे, माजी पालकमंत्री प्रवीण पोटे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, जिल्हा परिषदेच्या सीईओ संजिता महापात्र आदी उपस्थित होते. पालकमंत्री बावनकुळे म्हणाले, गरजू व्यक्तींच्या कल्याणासाठी सरकारतर्फे योजना राबवण्यात येत आहे. राष्ट्रीय वयोश्री योजनेअंतर्गत लाभ देण्यासाठी अपंगांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. सर्वेक्षणाच्या या पहिल्या टप्प्यात तीन हजार अपंग आढळून आलेले आहेत. या सर्वांना त्यांच्या गरजेनुसार उपकरणे देण्यात येणार आहे. वयोश्री योजनेची व्याप्ती वाढवण्यासाठी आपल्या परिसरातील अपंगांना याबाबत माहिती देण्यात यावी. त्यामुळे दुसऱ्या टप्प्यातील सर्वेक्षणात त्यांना लाभ होऊ शकेल. त्यासोबतच महाराजस्व अभियानामध्ये शिबिरे घेऊन याबाबतची माहिती देण्यात यावी, असेही त्यांनी स्पष्ट केले. येत्या काळात जलसंधारणाचेही कामे प्राधान्याने हाती घेऊन भूजलस्तर वाढवण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे सांगून शेतकऱ्यांना शेतामध्ये जाण्यासाठी पाणंद रस्ता आणि पाणी उपलब्ध करून दिले जाणार आहे. पाणंद रस्त्यासाठी मॉडेल तयार करण्यात आले आहे. यामध्ये सर्व रॉयल्टी माफ करण्यात आली आहे. त्यामुळे येत्या काळात किमान १२ फुटांचा पाणंद रस्ता राहणार आहे. यासोबतच सर्व शाळा आदर्श करण्यावर भर देण्यात येणार आहे. अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्ताने समाजातील सर्व घटकांना मदत करण्यासाठीचा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. त्यानुसार कृत्रिम अवयव वाटप करण्यात येत आहेत. अपंग आणि निराधारांना देण्यात येणारे सहायक अनुदान वाढवण्यात आले आहे.

### अपहरण झालेल्या चिमुकलीसह आरोपीस चार तासांत शोधून काढले



शेगाव : आई-वडिलांजवळ खेळत असलेल्या तीन वर्षीय चिमुकलीचे आज ३१ मे रोजी अपहरण करण्यात आले होते. यावेळी शहर पोलिसांनी शोध मोहिम राबवून अवघ्या चार तासांत चिमुकलीसह आरोपीस पकडण्यात यश मिळवले आहे. आज ३१ मेरोजीशहरात तीन वर्षीय चिमुकलीचे अपहरण झाल्याने शेगाव शहर पोलिसांनी तक्रारीवरुन अज्ञात आरोपी विरुध्द अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. ठाणेदार नितीन पाटील यांनी चिमुकलीच्या अपहरणाच्या घटनेची गांभीर्य लक्षात घेऊन शेगाव शहर पोलिसांचे चार पथक निर्माण केले. पथकाने शेगाव शहरामधील अनेक ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज व गोपनीय माहिती घेऊन युद्ध पातळीवर सर्च ऑपरेशन राबवले.आरोपी योगेश लक्ष्मण डाबेराव (वय २१) रा. बहादूर जिल्हा अकोला यास याने अपहरण केलेल्या तीन वर्षीय चिमुकलीसह शोधून काढले.

## वीजपुरवठ्याच्या समस्येमुळे ताडशिवणी ग्रामस्थ त्रस्त महावितरणच्या उपअभियंत्यांना निवेदन

### बेमुदत उपोषणाचा इशारा?

■ महासागर प्रतिनिधी,

दुसरबीड , दि. ३ : दुसरबीड ताडशिवणी येथील गावठाण फिडरवरील वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याने ग्रामस्थ त्रस्त झाले आहेत. ही समस्या सोडवण्याच्या मागणीसाठी ग्रामपंचायत सदस्य वामनराव देशमुख यांच्या नेतृत्वात ग्रामस्थांनी सिंदखेडराजा येथील महावितरणच्या उपअभियंत्यांना निवेदन दिले. ताडशिवणी येथील वीजपुरवठा दि. १० मेपासून वारंवार खंडित होत असून, सुरू असलेल्या वीजपुरवठ्यात ही कमी -अधिक दाबामुळे पाणीपंप, पंखे, टीव्ही यासारखी उपकरणे जळून जात आहेत. त्यामुळे ग्रामस्थांना आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. शेतकऱ्यांचा वीजपुरवठा दीड महिन्यापासून बंद असल्याने गुरांना पाणी देण्यासही अडचण निर्माण झाली आहे. या संदर्भात गावातील कंत्राटी वायरमन शिवाजी मुंढे यांच्याशी संपर्क साधल्यास 'बिघाड दुरुस्तीचे काम माझ्याकडे नाही'' असे उत्तर देत आहे, अशी तक्रारही या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. पावसाळ्याचे दिवस जवळ आले असताना अवकाळी पावसाचा जोर कायम आहे.

वीजपुरवठा सुरळीत न झाल्यास शेती व दैनंदिन जीवन विस्कळीत होण्याची शक्यता आहे. त्यामुळे तातडीने वीजपुरवठा सुरळीत करावा, अन्यथा बेमुदत उपोषणात करण्यात येईल, असा इशारा या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. महावितरणच्या



उपकेंद्रासमोर ठिय्या आंदोलन करताना ग्रामस्थ.

वीजपुरव याच्या समस्येबाबत ताडशिवणी येथील ग्रामस्थांनी दि. २६ मे रोजी रात्री किनगावराजा येथील महावितरणच्या उपकेंद्रात ठिय्या आंदोलनही केले होते. यानंतर आमदार मनोज कायंदे यांच्याशी संपर्क केला असता, त्यांनी लवकरच वीजपुरवठा सुरू करण्यात येईल, असे आश्वासन दिले होते. यावेळी सरपंच कैलास भुमकर, उपसरपंच रामकृष्ण देशमुख, सिद्धेश्वर शिंदे, ग्रामपंचायत सदस्य वामनराव देशमुख, संतोष देशमुख, सुशील शिंदे, मुकेश काळे, रघुनाथ शितोळे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

**Change Of Name**

MY OLD NAME WAS **NAWAZISH F KHAN FARHAN K KHAN.** NOW MY NEW NAME IS **NAWAZISH ALI KHAN FARHAN ALI KHAN.**
**ADD** : HOUSE NO 64 MOHAMMAD ALI ROAD BHALDARPURA NAGPUR -440018

I WANT TO CHANGE MY NAME IN MY PASSPORT NO. **N5676641**. MY OLD NAME WAS **DILIPKUMAR GANGADHARPANT PATIL.** NOW MY NEW NAME IS **DILIP GANGADHARPANT PATIL.**
**ADD** : 03-C, AJINKYA COLONY, V.M.V ROAD , AMRAVATI 444604

I WANT TO CHANGE MY NAME IN MY PASSPORT NO. **N6049596.** MY OLD NAME WAS **SYED TANVEER AHMED.** NOW MY NEW NAME IS **TANVIR AHMAD MUMTAJ AHMAD.**
**ADD** : SAIFI NAGAR MOMINPURA NAGPUR, 440018

MY OLD NAME WAS **RITU MAKHIJA.** NOW MY NEW NAME IS **MAHAK ARJUN SHIVDASANI.**
**ADD** : SANT KAWARRAM WARD SINDHI COLONY GONDIYA 441601

MY SELF **NIYAZ AHMAD** WANTED TO CORRECT MY NAME FROM **NEYAZ AHMAD HAFIZ SHIEKH FAREED** TO **NIYAZ AHMAD.**
**ADD-** ADI MASJID KE PAS, NAYA BAZAR, KAMPTEE, NAGPUR -441002.
MY OLD PASSPORT NO IS **M237469**

MY OLD NAME WAS **ABRAR KHALID.** NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD ABRAR KHALID .**
**ADD** : FLAT NO. 202, WING G-2, AMAN HERITAGE APARTMENTS, NEAR SURI LAWN, SURANA LAYOUT, JAFAR NAGAR, NAGPUR-13

MY OLD NAME WAS **KHANDE MAMATA ARUN.** NOW MY NEW NAME IS **SONALI UMESH NAKAT.**
**ADD** : SAKHARI, POST CHINCHOLI SHINGANE, ANJANGAON SURJI, DISTT. AMRAVATI MS - 444705

## दक्षिण आफ्रिकेमध्ये होणाऱ्या कॉम्रेड मॅरेथॉनमध्ये अमरावतीचे १२ धावक



■ महासागर प्रतिनिधी,

अमरावती , दि. ३:

जगातील सर्वात खडतर मॅरेथॉनपैकी एक असलेली ९० किमी.ची कॉम्रेड मॅरेथॉन ही दरवर्षी आयोजित करण्यात येते. जगभरातील १२९ देशांमधील धावपटू या स्पर्धेत भाग घेतात. यंदा भारतातील ४१५ धावक कॉम्रेड मॅरेथॉनकरिता पात्र ठरले आहेत.

या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी अमरावती जिल्ह्यातील १२ धावक सज्ज असून ते दक्षिण आफ्रिकेकरिता २ जूनला रवाना होत आहे. यात दिलीप पाटील हे २०११ पासून सहभाग घेत आहेत. दहा वेळा कॉम्रेड मॅरेथॉनमध्ये भाग घेणारे ते पहिलेच व्यक्ती आहेत. या १२ धावकांमध्ये तीन महिला धावपटूंचाही समावेश आहे. ९० किमी.च्या कॉम्रेड मॅरेथॉनला अल्टिमेट ह्युमन रेस म्हणून ओळखले जाते. कॉम्रेड मॅरेथॉन असोसिएशन दक्षिण आफ्रिकेच्या वतीने रविवार, ८ जून रोजी होणार असून, ही ९८ वी मॅरेथॉन साऊथ आफ्रिकेतील पीटर्सबर्ग शहरापासून सकाळी ५.४५ वाजता सुरू होऊन ती डर्बन या शहरात सायंकाळी ५.४५ वाजता पोहोचणार आहे. या स्पर्धेत अमरावती शहरातील एकुण १२ धावक सहभागी होत आहे. त्यामध्ये सेवानिवृत्त विक्रीकर उपायुक्त तसेच अमरावती हाफ मॅरेथॉनचे संचालक व प्रशिक्षक दिलीप पाटील, पोलिस निरीक्षक सतीश उमरे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता मंगेश पाटील, पोलिस कर्मचारी राजेश कोचे, लेखाधिकारी संजय अंबाडेकर, डॉ. सागर धनोडकर, प्रमोद राठोड, संजय पाटील, तालुका कृषी अधिकारी अनिल कांबळे, सहायक लेखापाल प्रणिता निस्ताने, सहायक शिक्षिका रितू तलमले, शिक्षणशास्त्र आचार्य डॉ. ऋजुता फुके यांचा समावेश आहे.

## नटराज गार्डनमध्ये झाडांची कत्तल पर्यावरण प्रेमींनी वाहिली श्रद्धांजली

■ महासागर प्रतिनिधी,

खामगाव , दि. ३ : सध्या विकासाच्या नावावर वृक्षांची कत्तल करण्याचा वृक्षद्रोहींची संख्या वाढत आहे. बुलडाणा येथे पर्यावरण प्रेमी कष्टाने वृक्ष जोपासत असतांना ते तोडण्याचे काम होत आहे. खामगावातही असाच प्रकार घडला असून नटराज गार्डनमध्ये खामगाव नगरपालिकेतर्फे गार्डनचे नूतनीकरणाचे काम सुरू करण्यात आले आहे. काम करत असताना या गार्डनचे काम करणाऱ्या कंत्राटदाराने झाडाची कत्तल केल्याचा प्रकार घडला. मात्र खामगावच्या पर्यावरण प्रेमींनी त्याचा तात्काळ निषेध नोंदवत झाडांना सामुहिक श्रध्दांजली वाहली. खामगाव येथे नगर पालिकेची कुठलीही पूर्व परवानगी न घेता निर्दयीपणे गार्डनमध्ये उभे असलेल्या जुन्या झाडांची वृक्षतोड केल्याचा प्रकार समोर आला आहे. याचा निषेध व्यक्त करण्यासाठी तसेच कत्तल झालेल्या सर्व झाडांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी ३१ मे रोजी खामगाव येथील सर्व पर्यावरण प्रेमींनी कत्तल करण्यात आलेल्या झाडांना श्रद्धांजली अर्पण केली. शहराच्या मध्यवर्ती भागातील नटराज गार्डनमध्ये २९ मे रोजी पहाटे ५



वाजता शहरवासीयांना हादरवणारी घटना घडली होती. या गार्डनमध्ये मोठ्या प्रमाणावर झाडांची निर्दयीपणे कत्तल करण्यात आली. कटरच्या साहाय्याने पाच ते सहा प्रौढ, भरगच्च आणि वर्षानुवर्षे उभ्या असलेल्या वृक्षांचा बीमोड करण्यात आला. ही कारवाई इतक्या गुपचूप पद्धतीने पार पडली की, सकाळी फिरायला आलेल्या नागरिकांना धक्काच बसला आणि निसर्गाचा श्वास एका रात्रीत कापला गेला होता. या साठी ३१ मे रोजी खामगाव येथील नटराज गार्डनमध्ये खामगाव शहरातील पर्यावरण प्रेमी यांनी कत्तल करण्यात आलेल्या झाडांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी कार्यक्रम आयोजित केला होता. सामाजिक संस्था तसेच पर्यावरण प्रेमी संस्थांच्यावतीने या प्रकाराचा तीव्र निषेध करण्यात आला. संबंधितांवर कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशाराही दिला आहे.

# राज्यस्तरीय व्यक्तिमत्व विकास शिबिराचा उत्साहात समारोप

■ महासागर प्रतिनिधी,

बुलडाणा , दि. ३: मध्यस्थ दर्शन, अस्तित्ववाद आधारीत सेवा, श्रम व व्यवहार या सूत्रावर आधारीत राज्यस्तरीय संस्कार शिबिराचा समारोप करण्यात आला. या शिबिरात राज्यभरातील सुमारे ३० किशोरवयीन मुलामुलींनी सहभाग नोंदवला होता. सदर शिबिर हे मोताळा तालुक्यातील ग्राम परडा येथे पार पडले. तालुक्यातील सौरभ शैक्षणिक, सामाजिक व बहुउद्देशीय संस्था बुलडाणा द्वारा संचालित श्री ए नागराज मानवीय शिक्षा शोध केंद्र, या संस्थेच्या माध्यमातून किशोरवयीन व्यक्तिमत्व विकास शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबिराचा प्रारंभ १५ मे रोजी करण्यात आला होता. दरम्यान या शिबिरात नियमित सकाळी पाच वाजता व्यायाम, खो खो, लेझीम यासारख्या देशी खेळांनी या शिबिराची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर प्रार्थना, आणि चेतना विकास मूल्य शिक्षणाचे धडे मुलांना देण्यात आले. या शिबिराचे सर्वात महत्वाचे वैशिष्ट्य असे की संपूर्ण पंधरा दिवस सहभागी विद्यार्थ्यांनी



स्वतः आपले दोन्ही वेळचे जेवण तयार केले. पाक कले मध्ये विद्यार्थ्यांनी निपुण व्हावे, यासोबतच आपल्या आईच्या श्रमाचे मोल काय आहे याची जाणीव विद्यार्थ्यांना व्हावी या हेतूने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

जेवणानंतर दुपारच्या सत्रामध्ये कौशल्य विकासासाठी सुतार काम व विणकामाचे विशेष सत्र घेण्यात आले. सायंकाळच्या सत्रामध्ये शेती, माती आणि कृती याची ओळख करून घेण्यासाठी प्रत्यक्ष शेत व गो शाळेतील श्रमाचा अनुभव विद्यार्थ्यांना दिला गेला. संध्याकाळच्या जेवणानंतर दिवसभर केलेल्या कामाचे मूल्यांकन करून सिंहावलोकन करण्याचे सवय विद्यार्थांना लावण्यात आली. यावेळी डॉ संदीप पऱ्हाड, डॉ. विजय पाटील, डॉ. गजेंद्र निकम, डॉ निरखे, प्रसिद्ध समीक्षक प्रा. डॉ. एस. एम कानडजे, बाल साहित्यिक सुभाष किन्होळकर, छायाचित्रकार रविकिरण टाकळकर, शाहीना पठाण, प्रज्ञा लांजेवार, अंजली परांजपे, उदय देशपांडे, ॲड. अमोल बल्लाळ, प्रा. संजय देवल, नितीन जाधव, गजानन जोगळेकर, अभय देवल आदी उपस्थित होते. अमरकंटक येथून रविकांत मणी यांना आमंत्रित केले होते.

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९१२२९७००२३/७४४७७३५८५३

# निरामय

## महत्त्व सुवर्ण प्रहराचं

प्रत्येक आई प्रसूतीनंतर आपल्या बाळाची काळजी घेते. त्याच्या जडणघडणीबाबत ती दक्ष असते. बाळाला कोणताही त्रास होऊ नये, त्याचं शरीर सक्षम व्हावं, रोगप्रतिकारक शक्ती वाढावी यासाठी विविध उपाय केले जातात. प्रत्येक आईचं विश्व आपल्या बाळाभोवती फिरत रहातं. बाळाच्या जन्मानंतरचा पहिला तास खूप महत्त्वाचा असतो. या काळात होणारी प्रत्येक कृती बाळाच्या जडणघडणीत खूप महत्त्वाची भूमिका बजावते. या तासाला 'गोल्डन अवर' म्हणजे 'सुवर्ण प्रहर' असं म्हटलं जातं. या तासाभराच्या काळात बाळाला स्तनपान करवल्याने बरेच लाभ होऊ शकतात. या सुवर्ण प्रहराबाबत बरीच चर्चा होताना दिसते. सुवर्ण प्रहर म्हणजे नेमकं काय, या काळात नेमकं काय करायला हवं, या काळात स्तनपान करवल्याने बाळ आणि मातेला कोणते लाभ होतात, याबाबतचं हे मार्गदर्शन...



**वेगळं काही**

बाळाच्या जन्मानंतर तासाभरात स्तनपान करवल्याने बाळाची रोगप्रतिकारक शक्ती वाढते. आईवरचा ताण कमी होतो. शिवाय बाळ आणि आई यांच्यातलं नातं अधिक घट्ट व्हायला मदत होते.

आईचं दूध बाळासाठी अमृत असतं. बाळाच्या जन्मानंतरच्या पहिल्या दुधाला शास्त्रीय भाषेत कॉलोस्ट्रम असं म्हटलं जातं. या कॉलोस्ट्रममध्ये भरपूर फॅट्स, प्रथिनं, अँटिबॉडिज असतात. हे घटक प्रत्येक बाळासाठी खूप आवश्यक असतात. या दुधामुळे बाळाला जन्मभराचं संरक्षण मिळतं. विविध प्रकारच्या ॲलर्जी तसंच रोगांना प्रतिबंध होऊ शकतो. स्तनपान लवकर सुरू केल्याने या प्रक्रियेला यश मिळण्याची शक्यता अनेकपटींनी वाढते.

स्तनपान करणाऱ्या मुलांमध्ये भविष्यात कानांचा जंतूसंसर्ग, अस्थमा, मधुमेह, लहान मुलांना होणारा ल्युकेमिया यांचं प्रमाण तुलनेने बरंच कमी असतं. आईच्या दुधामुळे कर्करोग, मधुमेह आणि स्थूलतेविरोधात संरक्षण मिळतं. इतकंच नाही, तर स्तनपानामुळे बाळाच्या शरीराचं तापमान संतुलित रहातं, बाळाला असणारा काविळीचा धोका कमी होतो

स्तनपानामुळे मातेलाही बरेच लाभ मिळतात. यामुळे स्तनांच्या कर्करोगाचा धोका कमी होतो. मधुमेह आणि गर्भाशयाच्या कॅन्सरलाही अटकाव होऊ शकतो. त्यातच बाळाला आईचा स्पर्श झाल्यामुळे चांगल्या हार्मोन्सची निर्मिती होते आणि याचे बरेच लाभ मिळतात.

## लाफोरामुळे विचार करण्याची क्षमताच संपुष्टात

काफोरा रोग हा एक अनुवांशिक आहे. तो मेंदूमध्ये ग्लायकोजेन जमा झाल्यामुळे होतो. या साचलेल्या पदार्थांना 'लाफोरा बॉडीज' म्हणतात. हे पदार्थ मेंदूच्या पेशींचं नुकसान करतात आणि हळूहळू मज्जासंस्था कमकुवत करू लागतात. या आजाराला 'लाफोरा बॉडी डिसीज' किंवा 'प्रोग्रेसिव्ह मायोक्लोनस एपिलेप्सी' असेही म्हणतात.



**हा आजार कोणत्या वयात होतो?**

बहुतेक वेळा हा आजार १० ते १७ वर्षे वयाच्या मुलांमध्ये दिसून येतो. सुरुवातीच्या टप्प्यात या आजाराची ओळख पटल्यास डॉक्टरांना त्यावर उपचार करणं सोपं जातं.

**व्याधीविकार**
**डॉ. अजेय गर्जे**

**लक्षणे**

* झटके: अचानक शरीराचा थरकाप किंवा बेशुद्धी.
* मायोक्लोनस: शरीराच्या एखाद्या भागात झटके किंवा कंप.
* मानसिक क्षमतेत हळूहळू घट: अभ्यासात एकाग्रतेचा अभाव, गोष्टी विसरणं किंवा वर्तनात बदल.
* चालण्यात अडचण: संतुलन बिघडणं किंवा स्नायू कमकुवत होणं.
* दृष्टीवर परिणाम: काहीवेळा दृष्टीदेखील कमकुवत होऊ लागते.

**कारणं**

हा आजार अनुवांशिक आहे. ही एक ऑटोसोमल रिसेसिव्ह डिसऑर्डर आहे, म्हणजे दोन्ही पालकांकडून दोषपूर्ण जनुकं मिळाल्यावर नक्कीच हा विकार जडू शकतो.

**निदान कसं केलं जातं?**

* **'ईईजी' (इलेक्ट्रोएन्सेफॅलोग्राम):** मेंदूच्या विद्युत क्रियांचं निरीक्षण करण्यासाठी.
* **एमआरआय स्कॅन:** मेंदूच्या रचनेतील बदल तपासण्यासाठी.
* **अनुवांशिक चाचणी:** जनुकांमधील दोष ओळखण्यासाठी.
* **त्वचेची बायोप्सी:** त्वचेची तपासणी करून लाफोरा बॉडीजची पुष्टी केली जाते.

**उपचार काय आहे?**

लाफोरावर अद्याप कोणताही खात्रीशीर इलाज नाही; परंतु काही औषधं त्याची लक्षणं कमी करण्यासाठी आणि रुग्णाचं आयुष्य थोडं सोपं करण्यासाठी दिली जातात. त्यामुळे औषध घेतल्यानंतर रुग्णाला बरं वाटतं.

**अपस्माराचे झटके कमी करण्यासाठीचे उपचार**

* फिजिओथेरपी आणि स्पीच थेरपी
* पोषण आणि काळजीकडे विशेष लक्ष

जैवतंत्रज्ञान आणि अनुवांशिक संशोधनातील नवीन प्रयत्नांमुळे भविष्यात यावर प्रभावी उपचार करणं शक्य होईल.

## बाळांच्या मूत्रपिंडावरची सूज धोकादायक

मातेच्या गर्भात असताना दोन्ही मूत्रपिंडांमध्ये मूत्र जमा झाल्यामुळे बाळाच्या मूत्रपिंडांना सूज आली, तर त्याला 'हायड्रोनेफ्रॉसिस' असं म्हणतात. हे आई आणि न जन्मलेल्या बाळासाठी धोकादायक ठरू शकतं. तथापि, तज्ज्ञांच्या मते योग्य काळजी आणि उपचारांनी हा आजार नियंत्रणात आणता येतो. रोगाचं वेळेवर निदान झाल्यास मोठा धोका टाळता येतो. त्यासाठी वैद्यकीय तज्ज्ञ गर्भवती आई आणि बाळाच्या तब्येतीवर लक्ष ठेवण्याचा आणि डॉक्टरांना दाखवण्याचा सल्ला देतात.

आजकाल १ ते २ टक्के गर्भधारणांमध्ये ही प्रकरणं दिसून येतात. आता गर्भधारणेदरम्यान अधिक चाचण्या केले जातात. त्यामुळे याबद्दल अधिक माहिती मिळते. जन्मानंतर पहिल्या ५-६ महिन्यांत योग्य उपचार केल्यास बाळाची मूत्रपिंडं पूर्णपणे बरी होऊ शकतात. काहीवेळा समस्या किरकोळ असते आणि प्रसूतीपूर्व हायड्रोनेफ्रोसिस उपचारांशिवायही बरा होऊ शकतो. गंभीर प्रकरणांमध्ये जन्मानंतर ब्लॉकेजची तीव्रता समजून घेण्यासाठी बाळाचा अल्ट्रासाऊंड, व्हॉइडिंग सिस्टोरेथ्रोग्राम किंवा न्यूक्लियर मेडिसिन स्कॅन यासारख्या चाचण्या केल्या जातात. काही गंभीर प्रकरणांमध्ये, शस्त्रक्रिया करावी लागू शकते.



**उपचार सोपे**

**आरोग्यविशेष**
**डॉ. अजिंक्य बोऱ्हाडे**

प्रसूतीपूर्वी बाळाच्या स्थितीवर लक्ष ठेवून आणि जन्मानंतर बाळाला योग्य उपचार देऊन ही समस्या सोडवता येते. चांगलं इमेजिंग आणि बालरोग मूत्रविज्ञानातील प्रगतीमुळे या व्याधीचं निदान आणि उपचारांमध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा झाली आहे.

**अल्ट्रासाऊंडने निदान**

पहिल्या तिमाहीत अल्ट्रासाऊंडद्वारे या विकाराचं निदान केलं जाऊ शकतं. योग्य काळजी घेतल्यास बहुतेक बाळांची मूत्रपिंडं व्यवस्थित कार्य करू लागतात.

## हृदयाच्या बळकटीसाठी

हृदयाचं आरोग्य जपण्यासाठी व्यायामासोबतच पोषक आहारही गरजेचा असतो. आहमारातून मिळणारी विविध जीवनसत्त्वं, खनिजं हृदयाला बळकटी देतात. हृदयाची तंदुरुस्ती वाढवणाऱ्या काही पोषक घटकांविषयी...

बी १२ या जीवनसत्त्वाच्या कमतरतेमुळे हृदयाचं आरोग्य धोक्यात येऊ शकतं. हे जीवनसत्त्व हृदयाला बळकटी देतं. बी १२ लाल रक्तपेशींच्या निर्मिती अधिक वेगाने होते. चिकन, मासे, अंडी हे पदार्थ बी १२ चा उत्तम स्रोत आहेत. प्राणीजन्य पदार्थांमध्ये हे जीवनसत्त्व मुबलक प्रमाणात असतं. दही, दूध, पनीर, चीज अशा पदार्थांमधूनही 'बी १२' मिळतं.



**आहारतंत्र**

'क' जीवनसत्त्वामुळे हृदयविकाराला प्रतिबंध करता येतो. आंबट फळांमध्ये 'क' जीवनसत्त्व असतं. लिंबू, संत्री, पेरु, किवी, स्ट्रॉबेरी, पपई अशी फळं आणि फ्लॉवर, ब्रोकोलीसारख्या भाज्यांमधून शरीराला 'क' जीवनसत्त्व मिळतं. ओमेगा ३ फॅटी ॲसिड्सही हृदयाला बळकटी देतात.

## च्युइंग गम खाताय, सावधान!

बहुतेक सर्वांना च्युइंगम आवडतं. काही लोक ते 'माउथ फ्रेशनर' म्हणून खातात तर काही त्याच्या गोड चवीसाठी खातात. पण च्युइंगम खाणं आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकतं.



**च्युइंगम म्हणजे काय?**

च्युइंगमचा मुख्य घटक म्हणजे 'गम बेस'. पूर्वी 'गम बेस' चिकल (झाडाचे राळ) सारख्या नैसर्गिक पदार्थांपासून बनवलं जाई; पण आजकाल बहुतेक च्युइंगम्सचा 'गम बेस' कृत्रिम पॉलिमरपासून बनलेला असतो. तो प्लास्टिकसारखाच असतो.

**समजून घ्या**
**डॉ. मेघा दळे**

**गम बेसमध्ये काय असते?**

* पॉलीव्हिनाईल ॲसिटेट
* पॉलीइथिलीन
* रबर किंवा रेझिन
* प्लास्टिसायझर्स (सॉफनिंग एजंट्स)

नवीन अभ्यास आणि संशोधन

**हे सर्व प्लास्टिक** बनवण्यासाठी वापरले जाणारे कृत्रिम पदार्थ आहेत. ताज्या संशोधन आणि अभ्यासात धक्कादायक गौप्यस्फोट झाले आहेत. कॅलिफोर्निया विद्यापीठाच्या अभ्यासानुसार, एका ग्रॅम च्युइंगममधून सरासरी १०० मायक्रोप्लास्टिकचे तुकडे बाहेर पडतात. काही पदार्थ ६०० हून अधिक तुकडे बाहेर टाकू शकतात. च्युइंगमचा एक सामान्य तुकडा सुमारे १.५ ग्रॅम वजनाचा असतो. म्हणजे दररोज च्युइंगम चघळणारी व्यक्ती दरवर्षी सुमारे ३०,००० मायक्रोप्लास्टिक कण गिळू शकते. च्युइंगममध्ये वापरले जाणारे पॉलिमर गमला चवदार बनवतात. ते बहुतेकदा पेट्रोलियमपासून बनवलेले कृत्रिम प्लास्टिक असतात. काही झाडाच्या रसापासून बनवलेले नैसर्गिक पॉलिमरदेखील असतात. दोन्ही प्रकारच्या डिंकांमध्ये मायक्रोप्लास्टिक्स आढळले आहेत. हे मायक्रोप्लास्टिक कण इतके लहान आहेत, की ते लाळेसह तोंडात जातात आणि नंतर गिळले जातात. यातील काही कण नॅनोप्लास्टिक्सच्या स्वरूपातदेखील असतात. ते शरीराच्या पेशींपर्यंत पोहोचू शकतात. त्यामुळे आरोग्यावर परिणाम होऊ शकतो.

**प्लास्टिक चावत आहोत का?**

सोप्या भाषेत सांगायचं तर आजच्या च्युइंगममध्ये प्लास्टिकसारखे कृत्रिम पदार्थ असतात. ते फक्त चघळण्यासाठी बनवले जातात. च्युइंगम ही चघळण्याची गोळी आहे. ती गिळू नये. चुकून गिळले तरी ते पचनाशिवाय शरीराबाहेर पडतं. च्युइंग गम जास्त प्रमाणात गिळणं हानिकारक असू शकते.

## पाठीच्या कण्याच्या वेदना

सआजकाल पाठदुखी ही एक सर्वसामान्य समस्या बनत चालली आहे. बदललेली जीवनशैली आणि शारीरिक हालचालींचा अभाव यामुळे ही समस्या आणखी वाढत आहे. पाठीच्या कण्याभोवती आणि आत वेदना होण्याची अनेक कारणं आहेत. अनेकदा ही कारणं गंभीरदेखील असू शकतात.

पाठीच्या कण्याभोवती आणि आत दुखण्यामागील मुख्य कारणं म्हणजे गर्भाशय ग्रीवा, चुकीची बसण्याची किंवा झोपण्याची पद्धत आणि जड वस्तू उचलणं. 'स्लिप्ड डिस्क' हेदेखील याचं एक कारण असू शकतं. मणक्यात वेदना होत असतील तर प्रथम कुठे आणि कोणत्या स्थितीत वेदना होत आहेत ते शोधा. पाठीच्या खालच्या भागात वेदना होत असतील तर ते 'स्लिप्ड डिस्क'शी संबंधित समस्येमुळे असू शकतं आणि वरच्या भागात वेदना होत असतील तर ते गर्भाशय ग्रीवामुळे असू शकतं.

**पाठीचा कणा का दुखतो?**

पाठीच्या कण्यातील वेदनांची अनेक कारणं आहेत. दिवसभर संगणकासमोर बसणं, मोबाईलचा जास्त वापर, बराच वेळ मान वाकवून बसणं किंवा पडून राहणं, जड वस्तू उचलणं ही याची मुख्य कारणं असू शकतात. बरेचदा, चुकीच्या पद्धतीने बसणं, उठणं किंवा व्यायाम करणं यामुळे स्नायू आणि अस्थिबंधांवर ताण येऊ शकतो किंवा त्यांना दुखापत होऊ शकते. वाढत्या वयानुसार, पाठीच्या मणक्यांच्या झीजेमुळे वेदना होऊ शकतात. 'हर्निएटेड डिस्क', 'ऑस्टियोपोरोसिस', संधिवात, 'स्पाइनल स्टेनोसिस' यामुळेदेखील पाठीचा कणा दुखू शकतो. काही संसर्ग मणक्यावरदेखील परिणाम करू शकतात. याशिवाय अन्य कोणत्याही दुखापतीमुळे पाठदुखी मागे लागू शकते.



**जीवनशैली**
**डॉ. अमित नाईकवाडे**

**हे करा**

मणक्यात किंवा आजूबाजूला वेदना होत असतील तर प्रथम वेदना कुठे आहे त्यानुसार उठण्याची आणि बसण्याची पद्धत बदलणं फायदेशीर ठरू शकतं. अनेकदा तेलाने मालिश केल्यानेही वेदना कमी होतात. वेदना तीव्र आणि असह्य असतील तर ताबडतोब डॉक्टरांशी संपर्क साधायला हवा. डॉक्टर तपासणी करून वेदनेचं नेमकं कारण शोधून योग्य उपचार करतील.

## कॅल्शियमच्या कमतरतेचा हृदयाला धोका

कॅल्शियम हे खनिज संपूर्ण शरीरासाठी खूप महत्वाचं आहे. हाडं आणि दात मजबूत करणं, स्नायू आणि नसांचं कार्य सुरळीत ठेवणं यासाठी कॅल्शियमची गरज भासतेच पण ते हृदयासाठीदेखील आवश्यक आहे. शरीरात कॅल्शियमची कमतरता असल्यास अनेक गंभीर आजार होण्याचा धोका असतो.

शरीरात कॅल्शियमचं प्रमाण वाजवीपेक्षा अधिक किंवा कमी झाल्यास अनेक गंभीर आजार होतात. पूरक आहारांद्वारे शरीराला कॅल्शियमचा पुरवठा होतो. म्हणून आहाराची विशेष काळजी घेणं महत्वाचं आहे. शरीरात कॅल्शियमचं प्रमाण योग्य राखणं महत्त्वाचं आहे.

**कॅल्शियमच्या कमतरतेने काय होतं?**

शरीरात कॅल्शियमची कमतरता असते, तेव्हा सर्वप्रथम हाडं आणि स्नायू कमकुवत होतात. याशिवाय दातदुखी सुरू होऊ शकते. कॅल्शियमच्या कमतरतेमुळे मज्जासंस्थेचे गंभीर आजार होऊ शकतात. कॅल्शियमची कमतरता दीर्घकाळ राहिली तर हृदयाशी संबंधित आजारदेखील होऊ शकतात. शरीरात असलेल्या एकूण कॅल्शियमच्या ९९ टक्के कॅल्शियम हाडं आणि दातांमध्ये आढळतं, तर रक्त आणि इतर ऊतींमध्ये फक्त एक टक्का कॅल्शियम असतं.




**आरोग्यचर्चा**
**डॉ. कुंदन गायकवाड**

**कॅल्शियमची कमतरता का होते?**

शरीरात कॅल्शियमची कमतरता असण्याचं मुख्य कारण म्हणजे आहार. याशिवाय, ड जीवनसत्वाच्या अभावामुळेही शरीरात कॅल्शियमची कमतरता निर्माण होते. याशिवाय वाढतं वय, मीठ आणि कॅफिनचं अधिक सेवन, हार्मोनमधील बदल आणि किडनीचे विकार हीदेखील कारणं असू शकतात.

**काय करावं ?**

**शरीरात** कॅल्शियमचं प्रमाण राखण्यासाठी, कॅल्शियमयुक्त आहार घ्यावा. आहारात दूध, दही, चीज, सोया मिल्क, तीळ, हिरव्या पालेभाज्या आणि खजूर यासारख्या कॅल्शियमयुक्त पदार्थांचा समावेश करावा. सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत सूर्यप्रकाश घ्यावा. यामुळे ड जीवनसत्वाची गरज पूर्ण होते.

**नवसंशोधन**

### ई सिगारेट्स ठरताहेत घातक!


तंबाखू आणि धूम्रपानाच्या दुष्परिणामांबद्दल आपण जाणतो. सध्या ई सिगारेट्सचा वापर मोठ्या प्रमाणावर गेला जातो. तरुणाईला या ई सिगारेट्सची भुरळ पडली आहे. मात्र त्या नेहमीच्या सिगारेट्सपेक्षा घातक ठरू शकतात ही बाब एका संशोधनातून समोर आली आहे. ई सिगारेट्स तंबाखूपेक्षाही घातक असल्याचं हा अभ्यास सांगतो. यामुळे हृदयाचं आरोग्य धोक्यात येऊ शकतं. ई सिगारेट्च्या वापराबाबत आजवर बरीच संशोधनं करण्यात आली आहेत. हे नवं संशोधन काही नव्या पैलूंवर प्रकाश टाकतं. २०१८ मध्ये जगभरातले जवळपास ३.६२ दशलक्ष विद्यार्थी ई सिगारेट्सच्या आहारी गेल्याचं आकडेवारी सांगते.



**दंतारोग्य**

### जपा दातांचं आरोग्य


सकाळी उठल्यावर आणि रात्री झोपण्याआधी दात घासणं पुरेसं असतं, हा एक गैरसमज आहे. आपल्या बऱ्याच चुकीच्या सवयी दातांसाठी घातक ठरू शकतात. अनेक कारणांमुळे दात खराब होतात. बरेचजण रात्री झोपण्याआधी दात घासत नाहीत. मात्र ही सवय सकाळी दात घासण्याइतकीच महत्त्वाची ठरते. त्यामुळे आळस न करता रात्री दात घासून झोपा. टूथब्रशमुळेही दातांचं आरोग्य धोक्यात येऊ शकतं. खूप टणक किंवा कठीण टूथब्रश वापरू नये. अशा ब्रशमुळे दातांवरचं एनामेल कमी होतं आणि दातांची झीज होण्याचा धोका वाढतो. फ्लॉसिंग म्हणजे दातांमध्ये अडकलेले अन्नकण काढून टाकणं. दात घासल्यानंतर फ्लॉसिंग करायला विसरू नका.



**डोळ्यांचे आरोग्य**

### प्रदूषणाचा त्रास होतोय...

हवेतल्या घातक प्रदूषित कणांमुळे डोळ्यांना त्रास होतो. हे प्रदूषित कण डोळ्यांमधल्या पोकळ्यांमध्ये अगदी सहज जाऊन बसतात आणि आपल्या दृष्टीवर परिणाम करतात. प्रदूषित कणांमुळे डोळ्यांमधून पाणी येणं, डोळे सुजणं, खाज येणं, डोळे लाल होणं, दाह जाणवणं, डोळे कोरडे पडणं, अंधूक दिसणं असा त्रास होतो. या लक्षणांकडे दुर्लक्ष न करता तातडीने नेत्रतज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. शिवाय प्रदूषित वातावरणात जाणं टाळावं. इतरही काही उपाय करता येतील. प्रदूषणाचा धोका टाळण्यासाठी भरपूर पाणी प्या. यामुळे शरीरातले विषारी घटक मूत्रावाटे बाहेर पडतात. पाण्यामुळे डोळ्यांमध्ये अश्रूंची निर्मिती होऊ लागते. यामुळे डोळे कोरडे पडत नाहीत.



**आजीबाईचा बटवा**

### प्या हळदीचं दूध

बरेचजण हळद घातलेलं दूध पितात. हे दूध खूप लाभदायी ठरतं. सर्दी-खोकल्यावरचा घरगुती उपाय म्हणून हळद घातलेलं दूध प्यायलं जातं. हळद घातलेल्या दुधामुळे हाडं बळकट होतात. रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठीही हळद घातलेलं दूध प्यावं. हळद घातलेल्या दुधामुळे शरीरातली विषारी द्रव्यं बाहेर पडतात तसंच पचनक्रिया सुधारते. अपनच, गॅस अशा समस्या दूर करण्यासाठी हळद घातलेलं दूध नियमितपणे प्यावं. निद्रानाश, ताणतणाव अशा तक्रारींवरही हळदीचं दूध गुणकारी ठरतं. हळद घातलेलं गरम दूध प्यायल्यामुळे दमा, ब्रोंकायटिस, फुफ्फुसात कफ साठणं, सायनस अशा विकारांची तीव्रता कमी होते. या दुधामुळे शरीर अधिक सक्षम होतं.



## मोठ्या निवडणुकीत कट्टर विरोधक, इकडे मात्र हातमिळवणी...

# खरेदी विक्री संघात भाजपा - काँग्रेस एकत्र

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३ :

राज्यात महायुतीचे सरकार आहे. महायुतीत भाजपसोबत एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचा समावेश आहे. परंतु स्थानिक पातळीवर वेगवेगळ्या प्रकारची युती होत असते. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नागपुरात काँग्रेस-भाजप युती झाली. या युतीने अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पॅनलचा पराभव केला.

राज्यात भाजप आणि काँग्रेस कट्टर विरोधक असलेले हे दोन्ही पक्ष एकत्र आले. भाजप आणि काँग्रेसने नागपूर जिल्ह्यातील मौदा खरेदी विक्री संघाची निवडणूक पॅनल तयार करुन लढवली. मौदा खरेदी विक्री संघाच्या निवडणुकीत काँग्रेस-भाजप युतीचे पॅनेल निवडून आले. या पॅनलने एकाकी पडलेल्या अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रसच्या पॅनलचा पराभव केला. राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बाबा गुजर यानी त्यांचे पॅनेल या निवडणुकीत उतरवले होते. परंतु त्यांच्या सर्व उमदेवारांचा पराभव झाला.



**अजितदादांच्या राष्ट्रवादीचा पराभव**

काँग्रेसचे नेते सुनील केदार आणि भाजपचे माजी आमदार टेकचंद सावकर यांच्या पॅनेलचे सर्व १३ उमेदवार निवडून आणले आहेत.

**बाबा गुजर यांची अजीत पवार यांच्याकडे तक्रार**

राष्ट्रवादी दादा गटाचे नागपूर जिल्हा अध्यक्ष बाबा गुजर यांनी यासंदर्भात थेट अजीत पवार यांच्याकडे तक्रार केली आहे. ते म्हणाले की, माजी आमदार टेकचंद सावरकर आणि सुनील केदार यांनी भ्रष्ट युती केली. सुरुवातीला राष्ट्रवादीकडून आम्ही टेकचंद सावरकर यांच्याशी बोलणी केली. आमची युती झाली होती. फार्म भरण्यापर्यंत आम्ही एकत्र होतो. पण त्यांनी अचानक आम्हाला धोका दिला. महायुतीमध्ये मीठाचा खडा टाकण्याचा प्रयत्न केला आहे. आता टेकचंद सावरकर यांच्यावर भारतीय जनता पक्षाने कारवाई करावी, अशी मागणी बाबा गुजर यांनी केली. दरम्यान, या प्रकरणात भाजप नेते आता काय भूमिका घेणार, हे येत्या काळातच स्पष्ट होणार आहे.

## काँग्रेस नेत्याच्या भावाचा खून

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. ३ :



अकोला जिल्ह्यात एक धक्कादायक घटना समोर आली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे निवृत्त अभियंता संजय कौसल यांची अज्ञात कारणातून निर्घृण हत्या करण्यात आली आहे. अकोला शहरातील रणपिसे नगर परिसरात ही धक्कादायक घटना घडली असून, परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

संजय कौसल हे जिल्ह्यातील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय कौसल यांचे लहान बंधू आहेत. याप्रकरणी पोलिसांनी आरोपी महेंद्र पवार याला अटक केली आहे. महेंद्र पवार याची गुन्हेगारीची पार्श्वभूमी आहे. तो याआधी देखील गंभीर गुन्ह्यात सहभागी राहिलेला आहे. त्याने याआधी एका व्यक्तीवर गंभीर हल्ला केला होता. या प्रकरणात त्याला तुरुंगवासही झाला होता. आता तो सध्या जामिनावर बाहेर होता. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पवारने धारदार लोखंडी टिकासने संजय कौसल यांच्या छातीवर आणि डोक्यावर वार करत त्यांचा जागीच खून केला.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि तपास सुरू केला. ही संपूर्ण घटना परिसरातील सीसीटीव्हीमध्ये कैद झाली आहे. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेतले असून पोलिसांचा तपास सुरू आहे. नवे पोलिस अधीक्षक अर्चित चांडक अकोल्यात रुजू झाल्यानंतर पहिल्याच आठवड्यात ही हत्या झाली आहे.

या हत्येमागे काही वर्षांपूर्वीचा वैयक्तिक वाद असल्याची चर्चा आहे. मारेकरी महेंद्र पवार आणि संजय कौसल हे दोघेही रणपिसे नगरमधील मुरलीधर टॉवरमध्ये राहतात.

दरम्यान, या घटनेमुळे अकोल्याचे नवे पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांच्यासमोर शहरासह अकोला जिल्ह्यातील गुन्हेगारीला आळा घालण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे,

## मे महिन्याचा हप्ता लवकरच

**लाडकी बहीण योजना**



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ : महाराष्ट्रातील लाखो महिलांचे लक्ष लागून राहिलेल्या लाडकी बहीण योजनेच्या मे महिन्याच्या हप्त्याबाबत मोठी माहिती समोर आली आहे. महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी माध्यमांशी बोलताना योजनेबाबत महत्त्वाचे अपडेट दिले आहे. लाडकी बहीण योजना सुरूच राहणार असून, मे महिन्याचा हप्ता लवकरच महिलांना मिळणार आहे, असे स्पष्ट करत महिलांना दिलासा दिला आहे.

अदिती तटकरे म्हणाल्या की, या योजनेबाबत अनेक गैरसमज पसरवले जात आहेत. चार महिन्यांपूर्वीच्या तपासणीत आढळले होते की काही सरकारी महिला कर्मचारीही या योजनेचा लाभ घेत आहेत. त्यामुळे अशा लाभार्थींना तात्पुरता लाभ थांबवण्यात आला होता. तरीही, सर्व पात्र महिलांना हप्ता लवकरच दिला जाणार आहे, असे त्यांनी स्पष्ट केल्याने लाखो महिलांना आता दिलासा मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे येत्या वट पौर्णिमेला लाडक्या बहिणींना पैसे मिळतील अशी चर्चा सुरू झाली आहे.

२६५२ महिला कर्मचाऱ्यांनी चुकीच्या पद्धतीने लाडकी बहीण योजनेचा लाभ घेतल्याचे समोर आले आहे. शासन निर्णयात स्पष्ट नमूद असूनही, सरकारी कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ घेता येत नाही, तरीही संबंधित महिला कर्मचाऱ्यांनी अर्ज भरून अनधिकृतपणे पैसे उचलल्याचे उघड झाले आहे. त्यांच्यावर कारवाई करण्यात येणार असल्याचे तटकरे म्हणाल्या.

महिला आयोगाच्या कार्यपद्धतीच्या बैठकीसंदर्भात बोलताना अदिती तटकरे म्हणाल्या, महिला आयोगासंदर्भातील बैठकीला काहींना निमंत्रित करता आले नाही. बैठकीतून काही सूचना येतील त्यावर कार्यवाही करू, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## मॉलच्या तिसऱ्या मजल्यावरून तरूणाने मारली उडी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ : घाटकोपर परिसरातील आर सिटी मॉलमध्ये एका व्यक्तीने तिसऱ्या मजल्यावरून उडी मारत आयुष्य संपवले. मृत व्यक्तीचे नाव दीपक जोशी (३८) असे आहे.

ही घटना घडताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करत दीपक यांचा मृतदेह ताब्यात घेतला. या घटनेच्या वेळी आर सिटी मॉलमध्ये उपस्थित असलेल्या एका प्रत्यक्षदर्शीने सांगितले की, आर सिटी मॉलच्या मुख्य लॉबीमध्ये अचानक स्फोट झाल्यासारखा आवाज आला. थोड्यावेळातच सगळा प्रकार लक्षात आला. आम्हाला लॉबीत एक तरुण जमिनीवर पडलेला दिसला. त्या तरुणाचे डोके फुटले होते आणि त्यामधून रक्तस्राव सुरु होता. त्यानंतर पोलिसांनी येऊन त्याचा मृतदेह ताब्यात घेतला.

दीपक हा आई-वडील, पत्नी आणि मुलासह राहत होता. सध्या त्याचा मुलगा कच्छमध्ये मामाच्या घरी शिक्षण घेत आहे. दीपकचे लहानपणापासूनच मानसिक स्वास्थ्य ठीक नव्हते, असे स्थानिक रहिवाशांनी सांगितले. तो झटपट पैसा कमविण्याच्या नादात अनेक आर्थिक फसवणुकीत अडकला होता. दहा वर्षांपूर्वी बनावट नोटा छापल्याप्रकरणी अटक, तसेच कर्ज घोटाळ्यांतही त्याचा सहभाग होता, असे उघड झाले आहे.

# काँग्रेसची शेतकरी आत्मसन्मान पदयात्रा

■ महासागर प्रतिनिधी, यवतमाळ, दि. ३ : २०१४ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी भाजपाचे पंतप्रधान पदाचे उमेदवार म्हणून नरेंद्र मोदी यांनी आर्णी तालुक्यातील दाभडी गावात चाय पे चर्चा हा इव्हेंट घेतला. यावेळी त्यांनी भाजप सत्तेत आल्यास शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्यासोबतच हमीभावासह अनेक आश्वासने दिली.

प्रत्यक्षात भाजपची सत्ता आल्यानंतर गेल्या ११ वर्षांत यातील एकही आश्वासन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पूर्ण केले नाही. त्यांना या आश्वासनांची पूर्तता करण्याची आठवण करून देण्यासाठीच काँग्रेसने दाभडी येथे शेतकरी आत्मसन्मान पदयात्रेचे आयोजन केले, असे प्रतिपादन काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले.

आर्णी तालुक्यातील दाभडी येथे काँग्रेसच्या वतीने आज मंगळवारी शेतकरी सन्मान पदयात्रेत प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. यावेळी चंद्रपूर-आर्णीच्या खासदार प्रतिभा धानोरकर, माजी प्रदेशाध्यक्ष माणिकराव ठाकरे, माजी मंत्री शिवाजीराव मोघे, प्रा. वसंत पूरके, महिला प्रदेशाध्यक्ष संध्या सव्वालाखे, जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रफुल्ल मानकर, जिल्हा बँकेचे अध्यक्ष मनीष पाटील आदी उपस्थित होते. दाभडी येथील पुरातन ओंकारेश्वर मंदिरातून या पदयात्रेस प्रारंभ झाला. पदयात्रेत असंख्य काँग्रेस




कार्यकर्त्यांसह पदाधिकारी, नेते व सामान्य नागरिक सहभागी झाले होते. दाभडी येथून निघालेली ही पदयात्रा १० किलोमीटरवर असलेल्या आर्णी येथे पोहोचणार आहे. येथे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात या पदयात्रेचा समारोप आणि शेतकरी मेळावा होणार आहे.

दाभडी येथे २०१४ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ह्यचाय पे चर्चाह्ण केली होती. यावेळी शेतक?यांना अनेक आश्वासने दिली. प्रत्यक्षात एकही आश्वासन पूर्ण केले नाही. शेतकऱ्यांना खोटी आश्वासने देऊन सत्ता काबीज केली, असा आरोप हर्षवर्धन सपकाळ यांनी यावेळी केला.

नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात तसेच जाहिरनाम्यात शेतक?यांच्या कर्जमाफीची घोषणा महायुतीने केली होती. मात्र, सत्तेवर आल्यानंतर कर्जमाफी तर दूरच, खत, बियाणे, औषधांचे भाव बेसुमार वाढवले आहे. केंद्र आणि राज्य सरकारकडून शेतकऱ्यावर सातत्याने अन्याय होत आहे.

सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणाने शेतकरी आर्थिक संकटात सापडले असून, राज्यात शेतकरी आत्महत्यांचे सत्र पुन्हा वाढले, याकडे काँग्रेस नेत्यांनी लक्ष वेधले. शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी, शेतमालाला हमीभाव, सकसकट पीकविमा, मोफत वीज, आदी महत्वाच्या मागण्या या पदयात्रेच्या माध्यमातून करण्यात आल्या. पदयात्रेत काँग्रेसचे आजी, माजी आमदार, सर्व तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष, महिला आघाडी यांच्यासह कार्यकर्ते सहभागी झाले होते.

**लोकमानस**

: मुलखावेगळी माणसं :

## कोकणातील ओंकारचा नाणी जमविण्याचा आगळा छंद



अनेकांना अनेक प्रकारचे छंद असतात आणि एखाद्या व्यक्तीला एकदा असा एखादा छंद जडला की ती व्यक्ती छंदासाठी काहीही करू शकते. असाच एक छंद सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कसाल मधील युवक ओंकार कदम याने जोपासला आहे.

ओंकारला नाणी जमा करण्याचा छंद आहे. हा छंद त्याला लहानपणापासून जडला होता. तो छंद त्याने आजपर्यंत जोपासला आहे. त्यासाठी ओंकारने आपल्या घरापाठीमागच्या शेतमांगरातील खोलीत एक छोटेसे संग्रहालय सुरु केले आहे, ज्यामध्ये त्याने तब्बल १८५ देशांच्या चलनी नोटा, शिवकालीन नाणी आणि इसवीसन ३०२ व्या शतकापासून अनेक भारतीय सम्राटांनी आपापल्या काळात चलनात आणलेली नाणी जोपासली आहेत आणि त्याचा इतिहासही सुंदर मांडला आहे.

ओंकार हा पदवीधर झालेला असून त्याचे स्वतःचे किराणा मालाचे दुकान आहे. आपल्या या व्यवसायाचा व्याप सांभाळत असतानाच ओंकारने आठवीपासून नाणी आणि नोटा जमविण्याचा छंद जोपासला आहे. त्याच्या या छंदाचे आज एका संग्रहालयात रुपांतर झालेले आहे. ओंकारला विविध देशांचे चलन जाणून घेऊन त्याला अभ्यास करण्याची खूप आवड आहे. हा अभ्यास करता करता त्याने काही देशांच्या चलनी नोटा आणि नाणी जमवली आहेत.

आपल्यासारखायचं आपल्या वयाच्या युवकांना म्हणा किंवा शालेय विद्यार्थ्यांना आपल्या देशासह विविध देशांच्या चलनाचा अभ्यास व्हावा, या उद्देशाने त्याने मोठ्या प्रमाणावर विविध देशांच्या नोटा आणि नाणी जमविण्यास सुरवात केली. याबरोबरच त्याने इसवीसन पूर्व काळामध्ये चलनी नाण्यांचा वापर करणाऱ्या भारतीय राज्यकर्त्यांचा त्यांच्या साम्राज्यांचा अभ्यास करायला सुरवात केली.

जमा केलेल्या या नोटा, नाणी विद्यार्थ्यांना दाखवता यावीत आणि अभ्यासता यावीत यासाठी त्याने संग्रहालय सुरु केले आहे. या संग्रहालयात शिवकालीन नाणी, मोघलकालीन नाणी एवढेच नव्हे तर ज्याज्या भारतीय सम्राटांनी या देशावर कित्येक वर्ष राज्य केले, त्या प्रत्येक सम्राटाच्या कारकिर्दीतील चळणी नाणी आहेत. शिवछत्रपतींच्या काळातील नाणी देखील ओंकारच्या संग्रहात आवर्जून पाहायला मिळतात.भारत स्वतंत्र झाल्यापासून आतापर्यंत सह्या करणाऱ्या सर्व गव्हर्नरच्या स्वाक्षऱ्या असणाऱ्या नोटा या व्यतिरिक्त जुन्या आणि नावाचे अशा वेगवेगळ्या नोटांची बंडल्स पाच रुपयांपासून ते दोन हजारापर्यंत च्या सर्व नोटा या संग्रहालयात आहेत.

सर्वात महत्वाचं म्हणजे सर्व नाणी आणि नोटांचा लिखित इतिहास त्याने या संग्रहालयात उपलब्ध करून ठेवला आहे. भविष्यात कोकणाची संस्कृती आणि कलेचं दर्शन घडविणार एक माध्यम स्वरूपाचं कला दालन उभारण्याचा ओंकाराचा मानस आहे. या छांदिष्ट ओंकारचा हे स्वपं त्याच्या चिकाटी आणि जिद्दीच्या जोरावर नक्कीच प्रत्यक्षात उतरणार यात शंकाच नाही.

■ ■ ■

### सरकारी तिजोरीवर भार ठरणारी लाडकी बहीण योजना बंद करावी का?

■ **विद्या माळवदे, गृहिणी**

शिवसेना भाजप युती सरकारने महाराष्ट्रातील तमाम गरीब महिलांसाठी एक वर्षांपूर्वी जी लाडकी बहीण योजना सुरु केली आहे ती अत्यंत स्तुत्य आहे. ज्या महिलांना परिस्थिती अभावी स्वतःच्या गरजांसाठी पैसे मिळत नाहीत अशा महिलांना ही योजना म्हणजे आधार आहे. फक्त या योजनेची ज्या घाईगडबडीत परिपूर्तता करण्यात आली ती बंद करून योग्य निकषात बसणाऱ्या महिलांनाच हि मदत मिळावी असं वाटत.

■ **करण जोशी, समाजसेवक**

युती सरकारने लाडकी बहीण सारखी योजना सुरु करून अक्षरशः गोरगरिबांच्या कष्टाच्या कर रुपी पैशांची उधळपट्टी सुरु केली आहे. अगोदरच अनेक योजना आणि विकासाच्या कामामुळे महाराष्ट्रावर अब्जावधींचे कर्ज आहे आणि केवळ महिलांच्या मतांसाठी सरकारने ही योजना सुरु केली.

मात्र आता या योजेसाठी दलित विद्यार्थी, शेतकरी, आदिवासी बांधव यांच्यासाठीचा निधी वळवावा लागतो आहे हा त्यांच्यावर अन्याय आहे. सरकारी तिजोरी खाली करणारी ही योजना म्हणूनच बंद करावी.

■ ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com


### रेंज रोवरची एसव्ही मसारा एडिशन

रेंज रोव्हर भारतापासून प्रेरित असलेल्या त्याच्या नवीनतम निर्मितीसह लक्झरी, आधुनिकता आणि बेस्पोक पर्सनलायझेशनसाठी मार्ग दाखवत आहेः रेंज रोव्हर एसव्ही मसारा एडिशन,विशेषतः भारतासाठी तयार केलेली एक विशेष आणि मर्यादित आवृत्तीची उत्कृष्ट नमुना; रेंज रोव्हर एसव्ही मसारा एडिशन ही भव्य हिमालयीन निळ्या नीलमणींनी प्रेरित आहे.ही असाधारण आवृत्ती जगभरात फक्त १२ उदाहरणांपुरती मर्यादित आहे, ज्यामुळे ती खऱ्या कलेक्टरची कलाकृती बनते. रेंज रोव्हर एसव्ही रणथंबोर एडिशनच्या पदार्पणानंतर, ते भारतीय ग्राहकांना बेस्पोक लक्झरी आणि अनन्यता प्रदान करण्याच्या रेंज रोव्हरच्या वचनबद्धतेला आणखी दृढ करते.

मसारा हे नाव संस्कृतमध्ये उगम पावले आहे, जे भारतीय संस्कृतीशी त्याचे खरे नाते प्रतिबिंबित करते. रेंज रोव्हरच्या एसव्ही बेस्पोक पर्सनलायझेशन टीमने डिझाइन घटकांचे एक अद्वितीय संयोजन काळजीपूर्वक तयार केले आहे, ज्यामध्ये अद्वितीय नीलमणी आणि आलिशान खोल साटन निळा बाह्य रंग समाविष्ट आहे. भव्य निळा बाह्य भाग सिल्व्हर क्रोमच्या बेस्पोक फिनिश पॅक आणि कोरिंथियन ब्रॉन्झच्या उबदार टोनने पूरक आहे. रंगाचा प्रभाव छतावरील आणि मिरर कॅप्सपर्यंत वाढवला आहे आणि कारमध्ये २३ इंच विस्मृत १०७७ डायमंड टर्न केलेले व्हील्स आहेत ज्यात ग्लॉस डार्क ग्रे कॉन्ट्रास्ट आणि ब्लॅक कॅलिपर आहेत. रेंज रोव्हर एसव्ही मसारा एडिशनचा इंटीरियर एसव्ही बेस्पोक लक्झरी आणि कारागिरीचे प्रतीक आहे. ते आलिशान लिबर्टी ब्लू लेदरला फिकट पर्लिनो लेदरसह एकत्रित करून बेस्पोक स्प्लिट तयार करते.

■ ■ ■




## अंतरिम जामीन घेतलेले डॉ. पटवे शिक्षण मंडळाचे अध्यक्ष?

**शालार्थ आयडी घोटाळा**

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ : राज्यभर गाजत असलेल्या नागपूर विभागातील शालार्थ आयडी घोटाळ्यामुळे नवीन अधिकारी नागपूर विभागाचा प्रभाव स्वीकारण्यात तयार नसताना पुरवणी परीक्षेच्या तोंडावर अमरावतीचे शिक्षण उपसंचालक डॉ. शिवलिंग पटवे यांच्याकडे नागपूर विभागीय शिक्षण मंडळाची धुरा सोपविली आहे. विशेष म्हणजे शालार्थ आयडी घोटाळ्यानंतर पटवे यांनी अटकेच्या भीतीने अंतरिम जामीन घेतला असताना त्यांच्याकडे अध्यक्ष पद सोपावण्यात आले आहे.

नागपूर विभागीय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष चिंतामण वंजारी यांना अटक झाल्यानंतर हे पद खाली होते. विशेष म्हणजे राज्य मंडळाच्या दहावी आणि बारावीच्या पुरवणी परीक्षा काही दिवसावर आहेत. अश्या वेळी अध्यक्ष पद रिक्त असल्याने समस्यांना सामोरे जावे लागत होते.

विशेष म्हणचे, शालार्थ आयडी घोटाळ्यामुळे कुणीही अधिकारी नागपूर विभागात येण्यात तयार न्हवते. अश्यात डॉ. पटवे यांनी अध्यक्ष पदाची धुरा हातात घेतली आहे. विशेष म्हणजे वंजारी यांच्या अटकेनंतर बोडार्ची विस्कटलेली घडी बसवणे हे पटवे यांच्या समोर आव्हान राहणार आहे.

अटकेत असलेले, चिंतामण वंजारी हे नागपूर विभागीय मंडळाचे अध्यक्ष आणि शिक्षण उपसंचालक म्हणून कार्यरत होते. या घोटाळ्याची चौकशी करण्यासाठी २०२४ मध्ये वंजारी यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्यीय समिती नियुक्त करण्यात आली होती. ५८० बनावट शालार्थ आयडी तयार करण्यात आली आणि अपात्र शिक्षकांना पगार मंजूर करण्यात आल्याचा आरोप होंता. या घोटाळ्यात, बनावट शालार्थ आयडी तयार करून अपात्र शिक्षकांना पगार मंजूर केल्याचा आरोप आहे. चिंतामण वंजारी प्राथमिक शिक्षण अधिकारी असताना हा घोटाळा केल्याचे तपासात उघड झाले.

## टिप्परने घेतला तरुणाचा बळी





**सहकाऱ्याचे पाय निकामी**

■ महासागर प्रतिनिधी
भंडारा, दि. ३ :

जिल्ह्यातील पवनी तालुक्यातील अड्याळ जवळ मुरुमाची अवैध वाहतूक करणाऱ्या टिप्परने दुचाकीला दिलेल्या धडकेत २३ वर्षीय तरुण जागीच ठार झाला. तर त्याच्या मित्राचे दोन्ही पाय निकामी झाले आहेत. शुभम चंद्रशेखर हटवार असे मृताचे नाव असून गंभीर जखमी झालेल्या तरुणाचे नाव वेदांत राजू करंजेकर असे आहे. दोघेही मंढईपेठ अड्याळ येथील रहिवासी आहेत. राजूवर भंडारा येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. ही घटना सोमनाळा-विरली खंदार मार्गावर घडली.

शुभम आणि वेदांत हे दोघेही लाखांदूर तालुक्यातील मासळ येथे परीक्षेचा पेपर द्यायला गेले होते. परीक्षा आटोपून दुचाकीने अड्याळ परत येत होते. दरम्यान अड्याळहून ४ किमी अंतरावरील सोमनाळा-विरली खंदार मार्गावर मुरूमाची अवैध वाहतूक करणारा टिप्पर येत होता. या टिप्परने शुभमच्या दुचाकीला समोरासमोर धडक दिली. या घटनेत दुचाकीसह शुभम व वेदांत टिप्परमध्ये सापडले. यात शुभमचा जागीच मृत्यू झाला. तर वेदांतचे दोन्ही पाय निकामी झाले.

विरली खंदार परिसरातून मोठ्या प्रमाणात अड्याळ मार्गावर मुरूमची अवैध वाहतूक होत असते. यापुवीर्ही तीन अपघात घडले असून यात तिघांचा मृत्यू झाला. आज घडलेल्या घटनेने ग्रामस्थ अधिकच संतापले. महसूल विभागाच्या दुर्लक्षामुळेच सातत्याने अपघात घडत असून मुरूमच्या अवैध वाहतुकीला केवळ महसूल विभाग दोषी असल्याचे म्हटले.

शुभम हा आई-वडिलांना एकुलता एक मुलगा आहे. अपघातातील दुर्दैवी मृत्यूने हटवार कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. अपघात झाल्यानंतर टिप्पर चालक तिथून पसार झाला. टिप्पर ही रस्त्याच्या खाली उतरला.

## रस्त्यावरची झाडे तोडणाऱ्याला केले दंगलीचा आरोपी

**नागपूर पोलिसांची करामत**

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ : नागपूर शहरात १७ मार्चच्या रात्री हिंसाचार झाला. औरंगजेबाच्या कबरीच्या वादावरून दोन गटांमध्ये तणाव निर्माण झाला, ज्यामुळे दगडफेक, वाहनांची तोडफोड, जाळपोळ आणि पोलिसांवर हल्ले झाले. या हिंसाचारात अनेक पोलीस अधिकारी जखमी झाले आणि सार्वजनिक मालमत्तेचे मोठे नुकसान झाले. नागपूर पोलिसांनी याप्रकरणात दोनशेहून अधिक लोकांवर गुन्हे दाखल केले.

या प्रकरणात फहीम खान, मायनॉरिटी डेमोक्रॅटिक पार्टीचा शहराध्यक्ष हा मुख्य सूत्रधार म्हणून समोर आला. त्याच्यासह हमीद इंजिनिअर आणि युट्यूबर मोहम्मद शेहजाद खान यांना अटक करण्यात आली. या हिंसाचारात इरफान अन्सारी या व्यक्तीचा मृत्यू झाला, ज्यामुळे हा हिंसाचार अधिक गंभीर ठरला.

या प्रकरणात १०५ आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यात दहा अल्पवयीन मुलांचाही समावेश आहे. मात्र हिंसाचारातील एका आरोपीला पोलिसांनी चक्क रस्त्यावर वृक्षतोड करताना अटक केली आणि त्याच्यावर हिंसाचाराचा गुन्हा दाखल केला.

**खोट्या गुन्ह्यात गोवण्याचा प्रयत्न**

या घटनेनंतर शहरात कर्फ्यू लागू करण्यात आला आणि मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या हिंसाचाराचा तीव्र निषेध केला आणि दोषींवर कठोर कारवाई करण्याचे आश्वासन दिले होते.

या प्रकरणामुळे नागपूरमध्ये सामाजिक सलोखा आणि कायदा-सुव्यवस्थेच्या दृष्टीने गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. पोलिसांनीही तातडीने अनेकांना अटक करण्याचे काम सुरू केले. हसनबाग रहिवासी आणि टूर्स अँड ट्रॅव्हल्सचा व्यवसाय करणारे सद्दाम हुसेन अब्दुल लतीफ अन्सारी यांच्यावरही हिंसाचाराचा गुन्हा दाखल करण्यात आला. त्यांनी या प्रकरणात जामिनासाठी अर्ज दाखल केला होता.

सुनावणीदरम्यान, सद्दामच्या वकिलांनी सांगितले, त्याने सदर गुन्ह्यात भाग घेतला नव्हता आणि हे त्याच्या दुकानातील सीसीटीव्ही फुटेजवरून स्पष्ट होते. तो घटनास्थळी उपस्थित नव्हता किंवा तो कोणत्याही हिंसाचार, जाळपोळ आणि बेकायदेशीर कृत्यातही सहभागी नव्हता. जातीय तणाव आणि राजकीय हेतूंमुळे तथ्यांची योग्य पडताळणी न करता अर्जदाराला सदर गुन्ह्यात खोटे गोवण्यात आले आहे.

सुनावणीनंतर अतिरिक्त सत्र न्यायाधीश आर. जे. पवार यांनी त्यांना काही अटींसह जामिनावर सोडण्याचे आदेश दिले. न्यायालयाने आदेशात नमुद केले की, अर्जदाराने सदर गुन्ह्यात कोणत्याही थेट कृत्यात भाग घेतलेला नाही. ज्यामुळे हिंसाचारासाठी त्यांना जबाबदार धरता येणार नाही. ते फक्त त्यावेळी रस्त्यावरील दुभाजकावर लावलेली वृक्ष तोडत होते. या निकालानंतर पोलिसांचा बेजबाबदारपणा पुन्हा एकदा उघड झाला आहे.

नागपूर

# महासागर वृत्तसागर

■ बुधवार, दि. ४, जुन २०२५ ■


## अत्याचार पीडितेला जिवे मारण्याची धमकी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ :

तक्रार मागे घेण्यासाठी आरोपीने अत्याचार पीडितेला जिवे मारण्याची धमकी दिली. ही घटना बेलतरोडी पोलिस ठाण्यांतर्गत घडली. पोलिसांनी ठाण्यांतर्गत राहणाऱ्या 39 वर्षीय पीडितेच्या तक्रारीवरून आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. पंकज ऋषीसिंह खिंची रा. नाईक तलाव, बांग्लादेश असे आरोपीचे नाव असून तो फरार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दोन वर्षांपूर्वी पीडितेची आरोपी पंकजशी ओळख झाली होती. पीडितेची मुलगी गतीमंद आहे. तिचे प्रमाणपत्र बनविण्यासाठी पीडितेने पंकजशी संपर्क केला होता. पंकजने तिला गणेशपेठ परिसरातील घाटे हॉटेलमध्ये भेटायला बोलावले. तेथे त्याने पीडितेला मदतीचे आश्वासन देत जबरीने लैंगिक अत्याचार केला. तेव्हापासून तो पीडितेचे सतत शोषण करीत होता. काही महिन्यांपूर्वी पीडिता आपल्या पतीपासून विभक्त झाली आणि बेलतरोडी परिसरात राहायला आली. पंकज महिलेच्या घरीही पोहोचला. तेथेही त्याने तिचे लैंगिक शोषण केले. या दरम्यान दोघांमध्ये वाद झाला. पंकजने महिलेवर तीक्ष्ण शस्त्राने वार करून जखमी केले आणि फरार झाला. पीडितेने घटनेची तक्रार गणेशपेठ पोलिसात केली. पोलिसांनी लैंगिक अत्याचारासह विविध कलमान्वये गुन्हा नोंदवून पंकजला अटक केली. पोलिस कोठडीनंतर त्याची तुरुंगात रवानगी झाली. काही दिवसांपूर्वी पंकज जामीनावर तुरुंगातून बाहेर आला. तो पीडितेला खटला मागे घेण्यासाठी धमकावू लागला. दोन दिवसांपूर्वी तो पीडितेच्या घरी गेला. शिविगाळ करून चांगलाच गोंधळ घातला. तक्रार मागे न घेतल्यास जिवे मारण्याची धमकी दिली आणि फरार झाला.

### छत्रपती शिवरायांचा गौरवशाली इतिहासाला साक्षिदार होण्यासाठी आता विशेष ट्रेनची उपलब्धी

## महाराष्ट्र शासनाच्या पुढाकारातून भारत गौरव यात्रा टूरिस्ट ट्रेन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ :




महाराष्ट्राच्या सुरक्षिततेची अपूर्व तटबंदी सह्याद्रीच्या पर्वत रांगांनी निर्माण केली आहे. एका बाजुला सातपूडा तर दुसऱ्या बाजूला सह्याद्री. या तटबंदीला छत्रपती शिवाजी महाराजांनी गडकिल्यांच्या माध्यमातून मावळसह महाराष्ट्राला सुरक्षित केले. सुलतानांचे जोखड झुगारुन स्वराज्याची स्थापना केली. महाराष्ट्राला एक अस्मिता दिली. छत्रपती शिवरायांच्या इतिहासाला, गडकिल्यांना प्रत्यक्ष भेट देऊन अनुभूती घेण्याची संधी महाराष्ट्र शासनाच्या पुढाकारातून एकत्रितरित्या उपलब्ध झाली आहे.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल येथून येत्या 9 जून रोजी या विशेष रेल्वेची पहिली फेरी रायगड-पुणे-शिवनेरी-भिमाशंकर ज्योतिर्लिंग-प्रतापगड-कोल्हापूर-पन्हाळा व परत मुंबई असा या रेल्वेचा पाच दिवस प्रवास राहील.

9 जून रोजी सकाळी 6.30 वाजता ही रेल्वे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल येथून मानगावकडे रवाना होईल. दादर व ठाणे येथून पर्यटकांना बसता येईल. सकाळी 10.30 वाजता मानगाव रेल्वे स्टेशन येथे नाश्ता उपलब्ध करुन दिला जाईल. तेथून बसने रायगडकडे प्रयाण. दुपारच्या जेवणासह रायगड किल्याला भेट व पाहणीसह मानगाव रेल्वे स्टेशन येथे ही बस 5 वाजता पोहचेल.

6 वाजता येथून रेल्वे पुण्याकडे मार्गस्थ होईल. सोयीनुसार रात्रीचे जेवण व रात्री 10 वाजता पुणे येथे रेल्वे पोहचल्यानंतर सर्वांना सोय केलेल्या हॉटेलमध्ये मुक्कामासाठी सोडण्यात येईल.

10 जून रोजी सकाळी लाल महल व कसबा गणपती येथे भेट व पाहणी. दुपारच्या जेवणानंतर शिवसृष्टीला भेट. सोयीच्या ठिकाणी जेवण व पुणे येथे मुक्काम. 11 जून रोजी सकाळी 6 वाजता शिवनेरी किल्ल्याकडे प्रयाण. छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान शिवनेरी किल्ला येथे भेट व दर्शन.

तद्नंतर भिमाशंकर ज्योतिर्लिंग मंदिरास भेट व दर्शन. सोयीच्या ठिकाणी जेवण व पुणे येथे मुक्काम. 12 जून रोजी सकाळी 7 वाजता पुणे येथून रेल्वेने साताराकडे प्रयाण व नाश्ता. सातारा येथून बसने सकाळी 10 वाजता प्रतापगड किल्ल्याकडे प्रयाण व सोयीच्या ठिकाणी दुपारचे जेवण. प्रतापगड किल्ल्याची पाहणी करुन साताराकडे रेल्वे स्टेशन येथे सायंकाळी परत. सातारा येथून 10.30 वाजता सोयीच्या ठिकाणी जेवण व कोल्हापूरकडे प्रयाण.

13 जून रोजी पहाटे कोल्हापूर येथे आगमन व हॉटेलकडे रवाना. नाश्त्यानंतर महालक्ष्मी मंदिरास भेट व दर्शन. दुपारी सोयीच्य ठिकाणी जेवण. तेथून पन्हाळाकडे प्रयाण. पन्हाळा किल्ल्याची पाहणी व रात्री कोल्हापूर रेल्वे स्टेशनकडे प्रयाण. रात्री कोल्हापूर येथून मुंबईकडे प्रयाण व सोयीच्या ठिकाणी जेवण. 14 जून रोजी सकाळी 6 वाजता मुंबई येथे आगमन व प्रवासाची सांगता.

या प्रवासासाठी तीन प्रकारच्या सुविधा अंर्तभूत आहेत. इकॉनामी साधी स्लिपर कोच, थ्री टायर एसी, टू टायर एसी अशा सुविधा राहतील. यात अनुक्रमे संपूर्ण करासहीत 13 हजार 155, 19 हजार 840 व 27 हजार 365 रुपये असे दर निश्चित करण्यात आले आहेत. इच्छुकांनी गौरव ट्रेन यात्राचे समन्वयक अधिकारी गौरव झा यांच्याशी 8287931600 या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन शासनाने केले आहे.

## नियंत्रण रेषा ओलांडणाऱ्या सुनीताची एनआयए कडूनही चौकशी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ :



पाकिस्तानात जाण्यासाठी एलओसी ओलांडणाऱ्या नागपुरातील सुनीता जामगडेच्या चौकशीसाठी काश्मीर पोलीस नागपुरात दाखल झाली असल्याची माहिती आहे. कपिलनगर पोलीस ठाण्याअंतर्गत येणाऱ्या संत कबीर नगर येथील रहिवासी सुनीता जमगडे काही दिवसांपूर्वी नियंत्रण रेषा (एलओसी) ओलांडून बेकायदेशीरपणे पाकिस्तानात गेल्या होत्या.

सुनीता कारगिलजवळील हुंडरमन गावातून पाकिस्तानच्या एका धार्मिक नेत्याला भेटण्यासाठी एलओसी ओलांडून पाकिस्तानात गेल्या होत्या. भारताची सीमा पार करत पाकिस्तानात गेलेली सुनीता मागील आठवड्यात नागपुरात परत आली होती. दरम्यान, सुनीता जामगडे या महिलेला काश्मीर पोलीस तपासाकरता काश्मीरला ही घेऊन जाऊ शकतात, अशी देखील शक्यता वर्तवली जात आहे. त्यासाठी न्यायालयाच्या आदेशानंतर वॉरंट घेऊन ही कारवाई केली जाणार असल्याचे बोलले जात आहे.

सुनीता नागपुरातून ४ मे रोजी काश्मीरला फिरायला जात आहे, असे सांगून नागपुरातून घरून निघाली होती. त्यानंतर १४ मे रोजी कारगिल पोलिसांकडून माहिती मिळाली होती की मुलाला सोडून ती पाकिस्तानला गेली. त्यानंतर पाकिस्तान प्रशासनाने तिला बीएसएफकडे सुपूर्द केले. बीएसएफकडून महिलेला ताब्यात घेतल्यानंतर अमृतसर पोलिसांना प्राथमिक चौकशी करण्यात आली. त्यानंतर नागपूरात आणण्यात आले. सध्या या प्रकरणी राष्ट्रीय एजन्सी ही तपास करत आहे.दरम्यान, सुनीताने गुगल मॅपच्या मदतीने एलओसी क्रॉस केल्याचे तपासात उघडकीस आले आहे.

त्यामुळे सुनीता जामगडेचा मोबाईल सध्या तपासण्यात येत आहे. मात्र त्यात मालवेअर असल्याच्या शक्यतेने सायबर टीम काळजीपूर्वक मोबाईलचा तपास करत आहे. या दरम्यान सुनीता दोन लोकांच्या संपर्कात होती. त्यांपैकी एक जुल्फीकार नावाचा व्यक्ती होता.

एलओसी क्रॉस करून पाकव्याप्त काश्मीरमध्ये गेलेल्या सुनिताची चौकशी एनआयएचे अधिकारी ही करणार आहे. २८ मे पासून नागपूर पोलिसांच्या कोठडीत असलेल्या सुनीताने नागपूर पोलिसांना चौकशी दरम्यान फारसे सहकार्य केले नसल्याची माहिती असून आता तिची रवानगी न्यायालयीन कोठडीत झाली आहे.

तपास यंत्रणांना शंका आहे की स्थानिक मदतीशिवाय सुनीता अवघ्या काही तासात एलओसी क्रॉस करून पाक व्याप्त काश्मीरमध्ये एवढ्या आतपर्यंत जाऊ शकत नाही. तिला काश्मीरमध्ये स्थानिक पातळीवर कोणी मदत केली याचा शोध तपास यंत्रणा घेत आहे.

विशेष म्हणजे आपल्या अल्पवयीन मुलाला कारगिल जवळ सोडूनच सुनीताने सीमा पार केली होती. सुनीता यांचा पीसीआर २ जून रोजी संपला. त्यामुळे कपिल नगर पोलिसांनी सोमवारी जेएमएफसी न्यायालयाचे न्यायाधीश ए.यू. मोटे यांच्या न्यायालयात तिला हजर केले. त्यामुळे सुनीता यांना न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

## शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था परिवर्तनाबाबत ५ जून रोजी परिसंवाद




### कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांची प्रमुख उपस्थिती

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ :

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या अध्यक्षतेखाली ५ जून रोजी दुपारी १२ ते १ वाजता चिटविस सेंटर ( टॅमरिंड हॉल) सिव्हील लाईन्स येथे शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था परिवर्तनासाठी शासनाचे सार्वजनिक-खाजगी भागीदारी धोरण यावर परिसंवाद व चर्चा आयोजीत केलेली आहे.

राज्यातील कौशल्य शिक्षण अधिक परिणामकारक, आधुनिक आणि उद्योगांच्या गरजांशी (इंडस्ट्री ४.०) सुसंगत होण्यासाठी या धोरणाचा उद्देश निश्चित केला आहे. या परिसंवादात सार्वजनिक-खाजगी भागीदारी धोरणातून कुशल मनुष्यबळ कमतरता भरुन काढणे, उद्योगाचे बळकटीकरण करणे, भविष्यातील मानव संसाधन तयार करणे आदी बाबींवर या परिसंवादात चर्चा करण्यात येणार आहे.

या परिसंवादास उद्योग क्षेत्राशी निगडीत उद्योग संघटना व उद्योजक तसेच स्वयंसेवी संस्था यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्रभारी सहसंचालक के. एम. मोटघरे यांनी केले आहे.

## फसवणुकीच्या पीडितावरही गुन्हा दाखल

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ :

कार्डवर 3 टक्के कमिशनचे आमिष दाखवून कोट्यवधी रुपयांनी फसवणूक करणारे सचिन हरीश शंभूवानी रा. सिंधी कॉलनी, खामला आणि मयूर सुरेश निमजे रा. पार्वतीनगर, रामेश्वरी हे तुरुंगाची हवा खाल्यानंतर आता बाहेर फिरत आहेत, मात्र पीडितांना अद्याप एकही रुपया परत मिळालेला नाही. दरम्यान त्यांच्या फसवणुकीला बळी पडलेल्या एका तरुणाविरुद्ध आता शांतीनगर पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे. कारण त्याच्याच माध्यमातून एका पीडिताने त्याचे क्रेडिट कार्ड आरोपी सचिन आणि मयूरला दिले होते. सचिन रमेश गिरी (32) रा. रामसुमेर बाबानगर असे तक्रारकर्त्यार्चे तर विशाल धामेचा (29) रा. खामला असे आरोपीचे नाव आहे.

आरोपी विशाल हा सुद्धा सचिन शंभूवानी आणि मयूर निमजेच्या फसवणुकीला बळी पडला आहे, मात्र सचिन गिरीची ओळख त्यानेच शंभूवानी याच्याशी करून दिली होती. ऑक्टोबर 2023 मध्ये सचिनची ओळख विशालशी झाली. विशालने सांगितले की, शंभूवानी लोकांकडून त्यांचे क्रेडिट कार्ड भाड्याने घेतो. त्या माध्यमातून तो लॅपटॉप, मोबाईल फोन व इतर ईलेक्ट्रॉनिक वस्तू खरेदी करतो. त्याला खूपच कमी दरात ईलेक्ट्रॉनिक वस्तू मिळतात. त्या वस्तू तो बाजारात विकून नफा कमावतो. दर महिन्याला होणाऱ्या ट्रांजेक्शनवर तो 3 ते 5 टक्के कमिशन देतो. नफ्याच्या आमिषाला बळी पडून सचिनने सुद्धा त्याचे क्रेडिट कार्ड आरोपींना दिले. काही नातेवाईकांचेही कार्ड विशालच्या माध्यमातून शंभूवानी आणि मयूरपर्यंत पोहोचले. सुरूवातीला कमिशनही मिळाले. नंतर आरोपींनी त्यांच्या क्रेडिट कार्डमधून 10.37 लाख रुपयांचे ट्रांजेक्शन केले. मात्र यावेळी ना कमिशन मिळाले आणि ना क्रेडिट कार्डचे बिल भरण्यात आले.

सचिनने विशालच्या म्हणण्यावरून शंभूवानी आणि मयूरला कार्ड दिले होते. त्यामुळे त्याने विशालविरुद्ध शांतीनगर ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी विशालविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा नोंदविला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, स्वतः विशालही शंभूवानी आणि निमजेच्या फसवणुकीला बळी पडला आहे. त्याचे 33 लाख रुपये दोघांनी बुडवले आहेत. विशालने कमिशनच्या नादात इतरही लोकांकडून त्यांचे क्रेडिट कार्ड घेत आरोपींना दिले. आता ते लोक विशालला आपले पैसे परत मागत आहेत. शंभूवानी आणि निमजे यांनी खामला परिसरात राहणाऱ्या विशालसह अनेकांची फसवणूक केली आहे.

## दोन गांजा विक्रेत्यांना अटक

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ :

हुडकेश्वर पोलिसांनी गोपनिय माहितीच्या आधारावर दोन गांजा विक्रेत्यांना सापळा रचून अटक केली. झडतीमध्ये त्यांच्याजवळ 2 किलो 30 ग्रॅम गांजा मिळाला. शेख अनवर शेख जाफर (30) रा. मिलननगर, बहादुरा फाटा आणि मोहम्मद इमरान मोहम्मद माजिद (27) रा. मैदीपटनम, गोलकुंडा, हैदराबाद अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. सोमवारी सायंकाळी 6 वाजताच्या सुमारास दोन गांजा विक्रेते माल विकण्यासाठी मानेवाडा रिंगरोडवर फिरत असल्याची माहिती हुडकेश्वर पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी रिंगरोडवरील तपास्या चौकात आरोपींना पकडण्यासाठी सापळा रचला. या दरम्यान दोन संशयित तरुण एमएच-31/बीडी-5853 क्रमांकाच्या मोटारसायकलने जाताना दिसले. त्यांना थांबवून विचारपूस केली असता ते गोंधळले. संशयाच्या आधारावर दोघांचीही झडती घेतली असता त्यांच्याजवळ 2.30 किलो गांजा मिळाला.




**नागपूर :** नागपूर शहरातील काही मार्ग आणि उड्डाणपुलावरून अवजड वाहनांना प्रवेश बंदी आहे. संबंधित विभागाकडून तसे फलकही लावण्यात आले आहेत. तरीही, काही वाहनचालक या मार्गावरून वाहन दामटतातच. असाच एक टँकरप्रतिबंधीत मार्गावर शिरलाच. मात्र, त्यामुळे विभागाचे फलक तुटले आणि हे वाहन अडकून पडले. अखेर पोलिसांनी कारवाई करावी लागली.

## ग्राहकांशी सुसंवाद साधा, तक्रारी कमी करा : सचिन तालेवार

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ :



महावितरणचे संचालक (संचलन तथा प्रकल्प) सचिन तालेवार यांनी ग्राहकांशी थेट संवाद साधून त्यांच्या समस्या सोडवण्यावर आणि तक्रारींचे प्रमाण कमी करण्यावर भर दिला आहे. दुरुस्ती कामांना उशीर होत असल्यास ग्राहकांना तात्काळ माहिती द्या, त्यांच्याशी सौजन्याने बोला आणि त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी पुढाकार घ्या, असे आवाहन त्यांनी केले. नागपूर परिक्षेत्रातील नागपूर, गोंदिया, चंद्रपूर, अकोला आणि अमरावती या पाचही परिमंडळांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

तालेवार म्हणाले, "सुसंवादाने ग्राहकांच्या अनेक समस्या सुटतील आणि तक्रारींचे प्रमाण खूप कमी होईल." ते पुढे म्हणाले की, दुरुस्ती कामांना विलंब झाल्यास ग्राहकांना लगेच कळवा. शक्य असूनही वीजपुरवठा वेळेत सुरू न झाल्यास त्याची गंभीर दखल घेतली जाईल आणि हयगय अजिबात खपवून घेतली जाणार नाही.

मोठ्या आणि गंभीर बिघाडांच्या ठिकाणी वरिष्ठ अभियंत्यांनी स्वतः उपस्थित राहून दुरुस्तीच्या कामांना गती द्यावी. तसेच, देखभाल व दुरुस्तीसाठी वीजपुरवठा खंडित करण्याचे नियोजन असल्यास, त्याचीही पूर्वसूचना ग्राहकांना तात्काळ देण्याच्या सूचना त्यांनी यावेळी केल्या.

देखभाल व दुरुस्तीसाठी वीजपुरवठा बंद करण्याच्या परवानगीवर विशेष लक्ष ठेवण्याचे निर्देशही तालेवार यांनी दिले. 11 केव्ही वीज वाहिन्यांवरील वीजपुरवठा बंद करण्यासाठी संबंधित अधीक्षक अभियंते आणि 33 केव्ही वाहिनीसाठी मुख्य अभियंत्यांनीच परवानगी द्यावी, असे त्यांनी स्पष्ट केले. औद्योगिक आणि एमआयडीसी भागात केवळ नवीन वीजजोडणी द्यायची आहे म्हणून वीजपुरवठा कधीही बंद करुन इतर औद्योगिक ग्राहकांचे नुकसान करु नका.. अशा जोडण्या आणि देखभाल व दुरुस्तीची कामे निश्चित केलेल्या दिवशीच करा आणि त्याची पूर्वसूचना सर्व ग्राहकांना द्या, असेही त्यांनी सांगितले. तांत्रिक बिघाडामुळे वीजपुरवठा खंडित झाल्यास त्याची महावितरणच्या सॉफ्टवेअरमध्ये नोंद करून ग्राहकांना एसएमएसद्वारे त्वरित सूचना पाठवण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

महावितरणच्या सेवा अधिक ग्राहकोभिमुख करण्यावर तालेवार यांनी भर दिला. वीज ग्राहकांच्या नावात बदल करण्याची प्रक्रिया अतिशय सोपी असतानाही कर्मचाऱ्यांनी ती क्लिष्ट करून ठेवल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. ग्राहकांना त्रास न देता ही प्रक्रिया सहज करा, असे आवाहन त्यांनी केले.

स्मार्ट मीटर लागल्यानंतर वीजपुरवठा विश्वासार्हता अंकेक्षण थेट ग्राहक स्तरावर होणार असल्याने त्याचा ग्राहकांना मोठा फायदा होईल. थकबाकीदार ग्राहकांकडून वसुली करणे किंवा त्यांचा वीजपुरवठा खंडित करणे हे दोनच पर्याय उपलब्ध असल्याने, वीज बिलापोटी असलेली थकबाकी पूर्णपणे वसूल करा असे स्पष्ट निर्देश तालेवार यांनी दिले. यावेळी त्यांनी मागेल त्याला सौर कृषीपंप, सुअभ्रग्राम, मॉडेल सौर व्हिलेज, आरडीएसएस, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी आदी योजनांच्या कामांची माहिती घेत आवश्यक त्या सूचना केल्या.


महासागर




: प्रभाग मित्र :

धाडसी आहात? काही करून दाखवायची धमक आहे?

पत्रकारितेच्या क्षेत्रात येवू इच्छिता?

या... महासागर प्रभाग मित्र व्हा!

अनेकांना सामाजिक कार्यासोबतच लेखनाची आवड असते. आपण राहतो, त्या परिसरातील अनेक समस्या कुठे आणि कुणाकडे मांडाव्यात, असाही प्रश्न निर्माण होतोच. लोकप्रतिनिधी लक्ष पुरवत नाही आणि अधिकारी कुणाचे ऐकत नाहीत. अर्थात समस्या जैसे थे.. राहतात. हीच बाब लक्षात घेता, लेखनाची आवड असणाऱ्यांसाठी दैनिक महासागर मध्ये नवे दालन सुरू करण्यात आले आहे.

आपल्या भागातील पाण्याचे दुर्भिक्ष्य असेल, अवैध धंदे, सिवर लाईन, अस्वच्छता, तुटलेल्या नाल्या आणि तुंबलेली गटारे असतील किंवा सर्वसामान्यांना भेडसावणाऱ्या समस्या असतील... मग, वाट कसली बघताय? बिनधास्तपणे मांडा.

महासागर प्रभाग मित्र पदासाठी आजच अर्ज करा.

अर्जाच्या पाकिटावर 'महासागर प्रभाग मित्र' असा उल्लेख आवर्जून करा.

आपले अर्ज दैनिक महासागर, कॉटन मार्केट, जयश्री सिनेमा मागे, नागपूर. ४४००१८ या पत्यावर तातडीने पाठवा.

: अधिक माहितीसाठी :

9881717811, 9881717816

# "अभंग वारी"-अध्यात्मिक शिक्षणासाठी भक्तिपूर्ण चॅरिटी शो शनिवारी

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ३ :

विश्व वारकरी सेवा संस्था, नागपूरद्वारे वारकरी सांप्रदायाच्या सेवेसाठी "अभंग वारी" या भजन संध्याचे आयोजन करण्यात आले आहे. वारकरी विश्वविद्यालय निधी समर्पण अभियान अंतर्गत होणारा हा चॅरिटी शो शनिवार, ७ जून रोजी संध्याकाळी ६ ते ९ या वेळेत कविवर्य श्री सुरेश भट सभागृह, रेशीमबाग येथे होणार आहे.




या कार्यक्रमाच्या माध्यमातून विश्व वारकरी सेवा संस्था, बेसा येथील श्री स्वामी समर्थ मंदिर परिसरात स्थापन होत असलेल्या वारकरी विश्वविद्यालयासाठी निधी संकलन करणार आहे. या विश्वविद्यालयात गरजू, निराधार आणि अनाथ विद्यार्थ्यांना मोफत निवास, शालेय व महाविद्यालयीन शिक्षणाबरोबरच वारकरी शिक्षण दिले जाणार आहे.

"अभंग वारी" या कार्यक्रमात पारंपरिक टाळ-मृदंगासह आधुनिक वाद्यांचा संगम साधत वारकरी अभंग, चाली, नृत्य व नाट्य सादर होणार आहे.

स्थानिक युवा कलाकार या माध्यमातून पंढरपूरच्या आषाढी वारीचे सजीव दर्शन घडविणार आहेत. नुकत्याच पार पडलेल्या खासदार सांस्कृतिक महोत्सवात २००० वारकरी कलाकारांनी सादर केलेल्या कार्यक्रमाचा अनुभव यावेळी आगळ्यावेगळ्या स्वरूपात पुन्हा मिळणार आहे.चॅरिटी शोचे पासेस वारकरी विश्वविद्यालय, श्री स्वामी समर्थ मंदिर, बेसा येथे तसेच बुक माय शो वर उपलब्ध आहेत. एका पासवर एका व्यक्तीस प्रवेश मिळेल.

या सामाजिक उपक्रमात सहभागी होऊन भावी पिढीच्या अध्यात्मिक व शैक्षणिक घडामोडीत हातभार लावावा, असे आवाहन विश्व वारकरी सेवा संस्थेचे अध्यक्ष संदीप कोहळे यांनी केले आहे.

# कळमेश्वर तालुक्यातील पारधी विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्र वाटप

■ महासागर प्रतिनिधी
कळमेश्वर, दि. ३ :

तालुक्यातील पारधी समाजाच्या 284 विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. आदिवासी पारधी विकास परिषदेच्या सततच्या पाठपुराव्यामुळे आणि क्रांतिवीर समशेर सिंग पारधी शिक्षण जागर यात्रेच्या माध्यमातून केलेल्या मागणीला यश मिळाले. परिषदेचे विदर्भाध्यक्ष बबन गोरामन, प्रदेश युवा अध्यक्ष अतिश पवार आणि नागपूर जिल्हाध्यक्ष अनिल पवार, उपाध्यक्ष सतीश माळी यांच्या नेतृत्वाखालील प्रयत्नांनी हे यश शक्य झाले.



पारधी समाजातील विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्राअभावी शिक्षण अर्धवट सोडावे लागत होते. नागपूर जिल्ह्यातील 42 पारधी बेड्यांवर शिक्षण जागर यात्रेद्वारे ही समस्या उजेडात आली. याची दखल घेत राज्याचे महसूल मंत्री तथा नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी, जिल्हाधिकारी विपिन इटनकर, आदिवासी विकास विभागाचे अप्पर आयुक्त रवींद्र ठाकरे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी आणि एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी नितीन इसोकर यांच्यासमवेत आढावा बैठक घेऊन त्वरित पारधी समाजाच्या विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्र देण्याचे निर्देश दिले.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री बावनकुळे यांच्या आदेशानुसार जिल्हाधिकारी विपिन इटनकर यांच्या मार्गदर्शनाखाली सावनेर उपविभागीय अधिकारी संपत खलाटे आणि कळमेश्वर तहसीलदार रोशन माकवाने व आदिवासी पारधी विकास परिषदेच्या शिष्टमंडळानी पारधी बेड्यांच्या गावांना भेटी दिल्या.

कळमेश्वर तालुक्यातील पारधी बेड्यावर विशेष राजस्व शिबिर आयोजित करून 284 विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्रे निर्गमित करून महसूल अधिकाऱ्यांनी घरोघरी जाऊन वाटप करण्यात आली, असे तहसीलदार माकवाने यांनी सांगितले. या यशाबद्दल आदिवासी पारधी विकास परिषदेने मुख्यमंत्री फडणवीस, पालकमंत्री बावनकुळे, जिल्हाधिकारी इटनकर, उपविभागीय अधिकारी खलाटे आणि तहसीलदार माकवाने यांचे आभार मानले. या यशामुळे पारधी समाजातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य उज्ज्वल होण्यास मदत होणार आहे.

# एपीआय विजय मुसनवार यांचा निरोप समारंभ

■ महासागर प्रतिनिधी
सावनेर, दि. ३ :

राष्ट्रीय महामार्ग हेटी (पाटणसांवगी) पोलीस चौकी सहाय्यक पोलिस अधिकारी विजय मुसनवार यांच्या सावनेर येथुन बढती वर बदली झाली. त्या निमित्ताने पोलिस चौकी हेटी येथे नुकताच निरोप समारंभ आयोजित करण्यात आलेला होता. कार्यक्रमाचा अध्यक्षस्थानी हित ज्योती आधार फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष हितेश दादा बंसोड होते.

यावेळी त्याचे शाल, श्रीफळ, व छत्रपती शिवाजी महाराज यांचे तैलचित्र देऊन सत्कार करण्यात आला. त्यांनी आपल्याला सेवा काळात महामार्ग पोलीस अधिकारी म्हणून दिलेली साथ त्याबद्दल त्यांचा धन्यवाद व्यक्त केला. मंचावर



उपस्थित मान्यवरांनी आपल्या भाषणात मुसनवार हे एक अतिदक्षाता घेणारे, लक्षात आणून दिलेल्या प्रत्येक कामाला तत्परतेने हाताडणारे, कामात वेळ न पाहता उभे असणारे, आम्हाला नेहमी सहकार्य करणारे, 24७7 लोकांच्या सेवेत असणारे अधिकारी म्हणून आमच्या नेमही लक्षात राहाल.

सेवेच्या कालावधीत याभागात केलेले काम, राबविलेल्या उत्तमोत्तम अभिनव योजना, तुमची कार्यशैली आणि सर्वात महत्वाचे म्हणजे आपल्या सहकाऱ्यांना दिलेली वागणूक यांसारख्या बऱ्याच गोष्टी तुमची ओळख बदली झाल्यानंतर देखील कायम आमच्या आठवणींत राहतील. ते बढती वर गडचिरोलीला सेवा देण्यासाठी जात आहात, एक काम करणारे अधिकारी इथून जात आहे याच आम्हाला दुःख आहे परंतु सिस्टिमचा निर्णय असल्यावर आता ते मान्य कराव लागेलच. आपण नेहमी आनंदी राहा, खुश राहा, तुमच्या उज्वल कारकिदीर्साठी आणि सुंदर आयुष्यासाठी खूप खूप शुभेच्छा मान्यवरांनी देवुन त्यांना निरोगी आयुष्य लाभो चा शुभेच्छा दिल्या.

यावेळी गोतमारे, निखिल पोटभरे, भूषण कुबडे, भावेश वाखोरे, पवन पाटणे, प्रफुल बसवार, बिट्टू, राजा फुले, रिपब्लिकन सेनेचे शहराध्यक्ष विक्की शेंडे, महामार्ग ट्रॅफिक पोलीस अढक सुहासिनी सहस्त्रबुध्दे, गायकवाड, धानोरकर, पो हवा, दिपक पाचपोर, प्रदीप गुप्ता, सुशील राऊत, अमोल वाघ, संदीप गाडगे, अनिल जांभेकर,भारती डोंगरे प्रामुख्याने उपस्तिथ होते.

## वार्षिक आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३ :

कर्मचाऱ्यांच्या आरोग्य आणि कल्याणासाठी मध्य रेल्वे सदैव कटिबद्ध असून, नागपूर विभागाच्या वतीने यांत्रिकी विभागाच्या कर्मचाऱ्यांसाठी वार्षिक आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन दिनांक 3 जून 2025 रोजी नागपूर येथील सिकलाईन, प्लॅटफॉर्म क्रमांक 7 येथे करण्यात आले. या शिबिराचे आयोजन विभागीय रेल्वे व्यवस्थापक श्री विनायक गर्ग यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख वैद्यकीय अधीक्षक डॉ. निर्मला गुप्ता यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. या शिबिरात कर्मचाऱ्यांची शरीरवजन निर्देशांक, दृष्टी तपासणी, रक्तातील साखर तपासणी, रक्तदाब मोजणी तसेच सामान्य आरोग्य तपासणी करण्यात आली.

## एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाच्या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३ :

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय नागपूरच्या वतीने केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजना सन 2024-25 करीता विविध योजना राबविण्यात येत आहे. या चालु आर्थिक वर्षासाठी अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यासाठी योजनेतंर्गत विविध योजना मंजूर करण्यात आल्या आहेत. या योजनेचा लाभ घेण्यासाठी दिनांक 31 जुलै पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या योजनांअंतर्गत अनुसूचित जमातीच्या शेतक-यांना काटेरीतार व जाळीचे तार, ताडपत्री खरेदी करणे, बेरोजगार लाभार्थ्यांना विविध व्यवसाय सुरु करण्यासाठी, आदिवासी (महिला-पुरुष) समुह/गट यांना विट भट्टी लावणे, आदिवासी (महिला-पुरुष) समुह/गट यांना लघुउद्योग/ गृहउद्योग करणे, आटा चक्की/ दालमिल/ मिरची कांडप/राईसमिल यंत्र खरेदी करणे, कृषी शेततळे धारक शेतक-यांना मत्स्यसंवर्धन करण्यासाठी सामग्री व साहित्य खरेदी करणे, शेतक-यांना तुषार सिंचन खरेदी करणे. आदिवासी बचत गटांना ट्रॅक्टर खरेदी करणे, आदिवासी (महिला-पुरुष) समुह/गट यांना व्यसायाकरीता डिजीटल बॅनर/ग्राफीक्स सेटअप साहित्य खरेदी करणे, महिलांना दु-इन-वन शिलाई मशीन खरेदी, ब्यूटी पार्लरसाठी 85 टक्के अनुदानावर अर्थसहाय्य दिले जाणार आहे.

या योजनांचा लाभ घेण्यासाठी अनुसूचित जमातीच्या इच्छुक लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करावा. अजासोबत अनुसूचित जमातीचा वैध जातप्रमाणपत्र, रहिवासी दाखला, चालु वर्षातील तहसीलदार यांच्या स्वाक्षरीचा उत्पन्न प्रमाणपत्र, ग्रामसभा ठराव, आधारकार्ड, आधारलिंक असलेल्या बॅंक खात्याची स्पष्ट छायांकित प्रत आणि दिव्यांग, विधवा, परित्यत्क्या किंवा निराधार महिलांनी अधिकृत दाखला सादर करणे आवश्यक आहे.

## व्यावसायिकाचे घरफोडून लाखोंची चोरी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३ :

मुलीच्या लग्नासाठी अमरावतीला गेलेल्या व्यवसायी कुटुंबाचे घरफोडून चोरांनी सोने व हिरेजडित दागिने आणि रोकड असा एकूण 24 लाख 66 हजार रुपयांचा माल चोरून नेला. ही खळबळजनक घटना कोतवाली ठाण्यांतर्गत महाल परिसरात घडली. पोलिसांनी संकेत हरीश जसानी (31) जलाराम निवास, महालच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. जसानी कुटुंबाचा प्लॅस्टिकचे वस्तू बनविण्याचा आणि विकण्याचा व्यवसाय आहे.

रविवारी संकेतच्या बहिणीचे लग्न अमरावती येथे आयोजित करण्यात आले होते. शनिवारी रात्री संपूर्ण कुटुंब नातेवाईकांसह अमरावतीला रवाना झाले. कपाटात ठेवलेली 5 लाखांची रोकड, सोने आणि हिऱ्याचे दागिने, महागडी घड्याळ असा एकूण 24 लाख 66 हजार रुपयांचा माल चोरून नेला.

# कारखान्यात चोरीचा प्रयत्न

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३ :

वर्धमाननगर परिसरातील एका कारखान्यात चोरीचा प्रयत्न करणाऱ्या तिघांना पोलिसांनी रंगेहात पकडले. एका आरोपीला अटक करून दोघांना अल्पवयीन असल्याने ताब्यात घेतले. सोनू युवराज घिल्लार (23) रा. चिखली चौक असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

सोनू हा सराईत गुन्हेगार आहे. त्याने परिसरातच राहणाऱ्या दोन अल्पवयीन मुलांना घेऊन टोळी बनवली होती. तिघेही बंद घरांचे कुलूप तोडून चोरी करीत होते. त्यानंतर चोरीचा माल आपसात वाटून घेत होते. फिर्यादी दीपक धनजी पटेल (45) रा. वैष्णव देवी चौक यांचा वर्धमाननगरातील स्वामी नारायण शाळेजवळ सोनल ईलेक्ट्रॉनिक्स नावाने कारखाना आहे. रविवारी रात्री पटेल कारखाना बंद करून घरी गेले होते. मध्यरात्रीला कारखान्याचे कुलूप तोडून तिन्ही आरोपी आत घुसले. त्याच दरम्यान शेजारी राहणारे नरेश सिद्धपार यांनी आरोपींना कारखान्यात घुसताना पाहिले. त्यांनी तत्काळ पटेल यांना फोन करून याबाबत माहिती दिली. पटेल यांनी 112 वर कॉल करून नियंत्रण कक्षाला सूचना दिली. लकडगंज पोलिस घटनास्थळी पोहोचले आणि तिन्ही आरोपींना चोरीच्या प्रयत्नात रंगेहात पकडले. सोनूला अटक केली असून इतर दोघांची चौकशी केली जात आहे. आरोपींकडून इतरही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

# सांस्कृतिक कलाकारांचा भव्य सन्मान सोहळा संपन्न

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ३ :

येथील अजित बालक मंदिर, सर्व प्रिय आर्टिस्ट व सिंगर्स असोसिएशन, माहूरझरी येथील मागासवर्गीय गोपाल समाज कल्याणकारी संस्था, व सर्वांगीण ग्रामीण विकास संस्था कुही यांच्या सयुंक्त सहकार्याने नटराज हॉल, मोरभवन नागपूर येथे भव्य रंगारंग सांस्कृतिक कलाकार सन्मान समारोह उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चंद्रकांत भोयर होते. कार्यक्रमात शहरातील व परिसरातील प्रसिद्ध गायक आणि नृत्य कलाकारांनी सहभाग घेतला. जयश्री भजे, अनिता जोडपे, वैशाली तडवेकर, श्री. गुप्ता, तक्षशिला अन्सारी, संध्या फुके, विना चंनेकर, रेखा हजारे,



अरुण चौधरी, प्रकाश जाकीर, मुकेश कुरील, संजय बोरखेडे, राजेंद्र मेश्राम, अनुप ठवरे, आसिफ शेख, मोहम्मद अली यांनी विविध गीतांची प्रस्तुती सादर केली.श्री निंबार्ते यांनी लावणी सादर करून उपस्थितांची वाहवा मिळवली. तसेच लाकूडकर या महिलांनी अप्रतिम लावणी व नृत्य सादरीकरण केले. कार्यक्रमाचे संचालन आयोजक समीर पठाण यांनी केले. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी रामदास मानेराव, आनंदराव खडसे, अशोक लोणारे, लीलाधर लोणारे यांनी सहकार्य केले. हा कार्यक्रम नवोदित कलाकारांना मंच उपलब्ध करून देणारा तसेच स्थानिक कलावंतांचा सन्मान करणारा ठरला.

# पट्टे वाटपासाठी बेला ग्रा.पं. समोर घोषणाबाजी

## शेतमजूर युनियनचे सरपंचांना निवेदन

■ महासागर प्रतिनिधी
बेला, दि. ३ :

महाराष्ट्र राज्य शेतमजूर युनियन (लालबावटा)च्या वतीने काल सोमवार 2 जुलैला श्रमिक, शेतमजुरांच्या न्याय हक्काच्या मागणीसाठी राज्यव्यापी आंदोलन करण्यात आले. त्या अनुषंगाने बेला येथील युनिटने झोपडपट्टी धारकांना पट्टेवाटप व घरकुल मिळावे या मागणीसाठी ग्रामसचिवालयासमोर जोरदार नारे देत घोषणाबाजी करून सरपंच अरुण बालपांडे यांना निवेदन दिले.असंख्य झोपडपट्टी धारकांनी याप्रसंगी उपस्थिती दर्शवून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. युनियनचे जिल्हा सहसचिव तुळशीराम तेलघरे, बेला शाखेचे अध्यक्ष देविदास तराळे, सचिव उत्तम पराते, विनोद दाळवणकर, हेमंत रोडे आदींनी आंदोलनाचे नेतृत्व केले.




गोरगरीब, झोपडपट्टी धारकांकडून शासन मतदान घेते. त्यांना मतदार, आधार कार्ड देते. परंतु, त्यांना शासन राहण्यासाठी मालकी हक्काची जागा देण्यास टाळाटाळ करते. हा अन्याय आहे. तो खपवून घेतल्या जाणार नाही. त्यांना पट्टेवाटप,घरकुल मिळावे.यासाठी प्रसंगी आंदोलन तीव्र करण्यात येईल. वरिष्ठ महसूल अधिकाऱ्यांनी याची नोंद घ्यावी. अशी विनंती आहे.

**देविदास दशरथ तराळे**

बेला येथील सर्वे नंबर 437, 438, 439, 441,727,712 च्या निरूपयोगी रिक्त आबादी जागेवर गेल्या 30-35 वर्षापासून गोरगरीब नागरिक राहून आपले जीवन जगत आहे. परंतु,त्यांना अजूनपर्यंत पट्टेवाटप झाले नाही. त्यामुळे ते विविध शासकीय योजनांपासून वंचित झाले असून नागरी सोयी सुविधा सुद्धा त्यांना मिळालेल्या नाहीत. याशिवाय गावठाणातील काही रिक्त आबादी जागेवर सुद्धा काही नागरिक अनेक वर्षापासून वास्तव्य करीत आहेत. या सर्व कुटुंबांना राहण्यासाठी जमिनीचे मालकी हक्काचे पट्टेवाटप तातडीने करण्यात यावे. अशी या नागरिकांनी घोषणाबाजी करीत जोरदार मागणी केली. पट्टेवाटप, घरकुल, पिण्याचा शुद्ध पाणीपुरवठा, स्मार्ट प्रीपेड मीटर योजना रद्द करा व अन्य मागण्यांसाठी याच नागरिकांनी शेतमजूर युनियनच्या वतीने गेल्या 20 मे ला झोपडपट्टीतील लक्ष्मी माता मंदिरापासून गावात भव्य मोर्चा काढला होता.

## ११ वर्षीय मुलीचा विनयभंग करणाऱ्या आरोपीस अटक

■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. ३ :

पोलीस ठाणे जुनी कामठी हद्दीत राहणाऱ्या फिर्यादी यांनी त्यांच्या टीव्ही बिघडल्याने आरोपी तनवीर अली शाबिर हुसैन वय 37 वर्ष रा. हैदरी चौक यास टीव्ही दुरुस्ती करिता आपल्या घरी बोलविले होते आरोपीने टीव्ही उघडून चेक केला व सामान आणण्याकरिता फिर्यादीस चिठ्ठी लिहून दुकानात पाठविले व त्या दरम्यान फिर्यादीची 11 वर्षीय अल्पवयीन मुलीला एकटी पाहून तिच्यासोबत अश्लील कृत्य करून तिचे मनात लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून विनयभंग केला मुलीने याबद्दल फिर्यादी यांना सांगितले असता फिर्यादी मुलीचे वडील यांनी जुना पोलीस ठाणे येथे आरोपी विरुद्ध तक्रार नोंदवली. आरोपीविरुद्ध पोस्को ॲक्ट अंतर्गत गुन्हा नोंदवून आरोपीला अटक करण्यात आले असून तपास पोलीस करीत आहे.

# घाट रोड पुलाचे पुनर्विकास काम मान्सूनपूर्व पूर्ण

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ३ :

मध्य रेल्वे, नागपूर विभागामार्फत नाग नदीवरील सुमारे 100 वर्षे जुन्या घाट रोड पुलाचा (ब्रिज क्र. 835/1) पुनर्विकास कार्य यशस्वीपणे आणि नागपूर महानगरपालिका व डीसीपी ट्राफिक ऑफिस यांना दिलेल्या आश्वासनानुसार 30 मे 2025 या मुदतीच्या आत पूर्ण करण्यात आले आहे. हा ऐतिहासिक दगडी कमानीचा पूल प्रत्येकी 9.15 मीटर लांबीचे पाच स्पॅन असलेला आहे. यातील नागपूर स्टेशनकडील तीन स्पॅन जलवाहिनीसाठी असून, अजनी स्टेशनकडील दोन स्पॅन रस्त्यावाहतुकीसाठी वापरले जातात. 2023 मध्ये तपासणीनंतर पुलाच्या जुनाट अवस्थेमुळे त्याचे मजबुतीकरण करणे अत्यावश्यक



मानले गेले. मुख्यालयाच्या मंजुरीनंतर पुलाचे "इनटर्निंग" व "जॅकेटिंग" तंत्राने बांधकाम सुरू करण्यात आले.

नोव्हेंबर 2023 मध्ये स्पॅन क्र. 5 (जलवाहिनी) पासून कामास सुरुवात करण्यात आली. रस्त्यावरील स्पॅन क्र. 1 आणि 2 चे काम सुरू ठेवण्यासाठी वाहतूक स्पॅन क्र. 3 मधून वळविण्यात आली, यासाठी NMC कडून परवानगी घेण्यात आली. सुरुवातीला वाहतुकीस एकाच स्पॅनमधून दोन्ही दिशेने वळवणे कठीण झाल्यामुळे परवानगी मागे घेतली गेली. मात्र सततच्या समन्वय व पाठपुराव्यामुळे फेब्रुवारी 2025 मध्ये स्पॅन क्र. 3 मध्ये रस्ता तयार करण्यास अखेरची परवानगी प्राप्त झाली. यानंतर 1 मार्च ते 25 मे 2025 या कालावधीत स्पॅन क्र. 1 व 2 चे जॅकेटिंग काम पूर्ण करण्यात आले असून, आता वाहतूक पूर्ववत सुरू करण्यात आली आहे. 31 मे 2025 पूर्वी अस्थायी रस्त्याचे हटविण्याचे कामही पूर्ण झाले, जेणेकरून पावसाळ्यापूर्वी सर्व व्यवस्था सुरळीत राहील.

ही संपूर्ण योजना मध्य रेल्वेच्या बांधकाम विभागाने NMC व ट्राफिक अधिकाऱ्यांच्या सहकार्याने उत्कृष्ट नियोजन, समन्वय व कार्यक्षमतेने पूर्ण केली असून, यामुळे पूल अधिक सुरक्षित झाला आहे व नागरिकांना वाहतुकीस अडथळा न होता सुविधा मिळाल्या आहेत.

# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या ५० प्रकरणांची नोंद

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ :

नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाद्वारे सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, 79 मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई केली जात आहे. मंगळवार (ता.03) रोजी शोध पथकाने 50 प्रकरणांची नोंद करून 51,700/- रुपयाचा दंड वसूल केला. हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. 400/- दंड) या अंतर्गत 16 प्रकरणांची नोंद करून 6400/- रुपयांची वसुली करण्यात आली.




व्यक्तीने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे या अंतर्गत 01 प्रकरणांची नोंद करून 100/- रुपयांची वसुली करण्यात आली. दुकानदाराने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. 400/- दंड) या अंतर्गत 03 प्रकरणांची नोंद करून 1,200/- रुपयांची वसुली करण्यात आली. मॉल, उपहारगृहे, लॉजिंग, बोर्डीग हॉटेल, सिनेमा हॉल, मंगल कार्यालय, कॅटरर्स सर्व्हिस प्रोव्हायडर इत्यादींनी रस्ता या अंतर्गत 02 प्रकरणांची नोंद करून 4,000/-रुपयांची वसुली करण्यात आली.

वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत 12 प्रकरणांची नोंद करून 16,000/- रुपयांची वसुली करण्यात आली. चिकन सेंटर, मटन विक्रेता यांनी त्यांचा कचरा रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी टाकणे या अंतर्गत 1 प्रकरणांची नोंद करून 1,000/- रुपयांची वसुली करण्यात आली. सार्वजनिक रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा इत्यादी ठिकाणी बांधकामाचा मलबा/टाकावू कचरा टाकणे/साठवणे, प्रथम 48 तासात हटविण्याची नोटीस देऊन न हटविल्यास या अंतर्गत 4 प्रकरणांची नोंद करून 12,000/- रुपयांची वसुली करण्यात आली. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव व्यक्ती असल्यास 20 प्रकरणांची नोंद करून 4,000/- दंड वसूल करण्यात आलेला आहे. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव संस्था असल्यास 7 प्रकरणांची नोंद करून 7,000/- दंड वसूल करण्यात आलेला आहे. ही कारवाई उपद्रव शोध पथक प्रमुख वीरसेन तांबे यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

तसेच उपद्रव शोध लक्ष्मीनगर झोन अंतर्गत मे.न्युरोस्पाइन हॉस्पीटल यांनी बांधकामाचे साहित्य रस्त्यावर टाकल्याबद्दल रु. 10,000/- चे दंड वसूल करण्यात आले. धरमपेठ झोन अंतर्गत मे. श्रीराम बिल्डर्स यांनी बांधकामाचे साहित्य रस्त्यावर टाकल्याबद्दल रु. 10,000/- चे दंड वसूल करण्यात आले. हनुमान झोन अंतर्गत मे. द बी ॲन्ड टरटल प्ले स्कुल यांनी विनापरवानगी विद्युत खांबांवर जाहिरातीचे बॅनर लावल्याप्रकरणी असे एकुण रु. 5,000/- चे दंड वसुल करण्यात आले. गांधीबाग झोन अंतर्गत मे. श्याम सेल्स, मे. रघुराम स्वीटस व मे. निपाणे किराणा स्टोर्स यांनी प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल 15,000/- हजार रुपयांचा दंड वसुल केला. तसेच मनोज मोहनलाल बीयानी यांनी सी ॲंड डी कचरा टाकल्याबद्दल रु. 5,000/- रुपयाचा दंड वसुल करण्यात आला. सतरंजीपुरा झोन अंतर्गत मे. विजय किराणा शॉप यांनी 5,000/- हजार रुपयांचा दंड वसुल केला. तसेच नानक वासवानी यांनी सी ॲंड डी कचरा टाकल्याबद्दल रु. 5,000/- रुपयाचा दंड वसुल करण्यात आला.


**तहसिलदार, कामठी यांचे कार्यालय, कामठी**
**जिल्हा नागपूर**

दुरध्वनी क्रमांक :- ०७१०९-२९५००९ Email ID tahsildarkamptee@gmail.com

क्र प्रस्तु-३ ना.तह. कामठी/कावि. २८७/२०२४ दिनांक ३०/०५/२०२५

वाचा - १. जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ २. जन्म मृत्यु नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३
३. भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचेकडील दिनांक ११/०८/२०२३ रोजीचे राजपत्र
४. मा. जिल्हा दंडाधिकारी यांचे कडील आदेश क्रमांक अ.का./डी-१/ जन्म मुत्यु आदेश / कावी १५८/२०२३, दि.११.०५.२०२४
५. अर्जदार रमेश उपासराव राजुरकर रा. काराडी महादुला ता.कामठी जि. नागपूर यांचा अर्ज दिनांक १७/०४/२०२५

-: जाहीरनामा :-

ज्याअर्थी अर्जदार रमेश उपासराव राजुरकर रा. काराडी महादुला तह-कामठी जि. नागपूर यांनी या कार्यालयात तुकाराम गंभीरा राजुरक यांचा मृत्यु नोंदणीसाठी महाराष्ट्र जन्म/ मृत्यु अधिनियम १९६९ चे कलम ११ (२) व (३) अन्वये मृत्युची नोंद ग्रामपंचायत खापा याचे दप्तरी घेण्याकरीता आदेशीत करणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार रमेश उपासराव राजुरकर यांचे आजोबा तुकाराम गंभीरा राजुरकर हे दिनांक ३०/०८/१९४८ रोजी मृत्यु झालेला असल्याचे अर्जदार यानी त्यांच्या अर्जात नमुद केलेले आहे.

त्याअर्थी मी कार्यकारी दंडाधिकारी कामठी उपरोक्त वाचा क्रमांक ४ मध्ये नमुद केल्याप्रमाणे प्राप्त अधिकारान्वये सदर व्यक्तीच्या मृत्युची नोंद घेण्याकरीता आदेश देणेकरीता व गृह चौकशी करने कामी कार्यवाही प्रस्तावित आहे याबाबत कोणत्याही हितसंबंधाने काही आक्षेप / उजर / हरकती असल्यास त्यांनी योग्यते पुरावे किंवा साक्षीदारासह या कार्यालयात जातीने किवा त्यांचे मान्यता प्राप्त् विधी अधिकारी मार्फत अथवा अन्यमार्गाने लेखी आक्षेप अर्ज दिनांक ०९/०६/२०२५ चे आत या कार्यालयात सादर करण्यात यावे

उक्त मुदतीत कुठलाही आक्षेप/ उजर/विपरीत पुरावा प्राप्त् न झाल्यास मृत्यु बाबतची नोंद घेण्याकरीता आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित मृत्यु नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईन याची नोंद घेण्यात यावी

| अनु.क्र. | मृत्यु व्यक्तीचे नाव | अर्जदाराशी नाते |
|---|---|---|
| १. | श्री तुकाराम गंभीरा राजकर | आजोबा |

स्वा/-
(अमर हांडा)
नायब तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी, कामठी

# मारोती मंदिर विकास कामात प्रशासनाचा सावळागोंधळ

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ३ :

मारोती नगर येथील ऐतिहासिक मारोती मंदिरास महाराष्ट्र शासनाने क वर्ग नागरी तीर्थक्षेत्र म्हणून घोषित करत एक कोटी नऊ लाख तीन हजार रुपयांचे अनुदान मंजूर केले. मात्र, या विकास कामात मोठा सावळा गोंधळ आणि निकृष्ट दजार्चे बांधकाम झाल्याचे समोर आले आहे. नागरिक आणि काही विश्वस्तांनी याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

शासनाच्या नागरी तीर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत मंदिराच्या सौंदर्यीकरणासाठी आणि आवश्यक मूलभूत सुविधांसाठी हे अनुदान मंजूर



## एक कोटींच्या अनुदानाचा अपव्यय?

करण्यात आले होते. ठरलेल्या अटीप्रमाणे, मंदिर ट्रस्ट व वाडी नगरपरिषदेने प्रत्येकी १२.५ टक्के निधी उचलायचा होता. त्यानुसार मंदिर ट्रस्टने फक्त २ लाख रुपये भरले, तर वाडी नगरपरिषदेने जाला कन्स्ट्रक्शन या ठेकेदाराला एकूण ८७,८६,३५८ रुपये अदा केले.

मात्र प्रत्यक्षात नियोजित कामांपैकी बहुतेक कामे पूर्ण झालीच नाहीत. आराखड्यानुसार मंदिराच्या डाव्या बाजूला एक सुंदर सभागृह, शौचालय, पिण्याच्या पाण्याची सुविधा, बाग, खेळणी, हायमास्ट लाईट्स व इतर सुविधा उभारल्या जाणार होत्या. पण प्रत्यक्षात केवळ मंदिराच्या मागील बाजूस तळमजल्याचे अधुरे सभागृह बांधले गेले. मंदिराच्या खिडक्यांना पूर्वीच्याच ग्रीलवर साधे स्लायडिंग डोअरही बसवले नाहीत. मंदिराचा घुमटदेखील बांधण्यात आलेला नाही. या संदर्भात माहितीच्या अधिकारात मिळालेल्या माहितीनुसार, ठेकेदाराने अर्धवट काम सोडून दिल्याने नगरपरिषद प्रशासनाने संबंधित ठेकेदारास काळ्या यादीत टाकत केवळ १० टक्के रक्कम वसूल करून ती शासनाकडे परत केली आहे. याची पुष्टी नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी ऋचा धाबर्डे यांनी दिली.

मात्र, इतक्या मोठ्या प्रमाणावर निधी खर्च होऊनही दर्जाहीन व अपूर्ण काम झाल्यामुळे, फक्त ठेकेदारावर कारवाई करून हा प्रकार संपवणे योग्य नाही, असे नागरिकांचे म्हणणे आहे. प्रशासनानेही यामध्ये दुर्लक्ष केल्याचे दिसून येते. त्यामुळे नागपूर विभागीय नगरपरिषद प्रशासनाने याप्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी परिसरातील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# ईश्वर झाडे किट्समधून सेवानिवृत

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. ३ :

कविकुलगुरू इंन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलाजी अँड सायन्स (किट्स) च्या इलेक्ट्रीकल विभागातिल ज्यूनीअर लॅब असिस्टेंट ईश्वर झाडे 31 मे 2025 ला सेवानिवृत झाले.त्यांनी किट्स मधे 33 वर्षे सेवा केली.

त्यानिमित्य इलेक्ट्रिकल विभाग तर्फे त्यांचा सेवानिवृती वर गौरव करण्यात आला. या प्रसंगी प्राचार्य डॉ. अविनाश श्रीखंडे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व भेटवस्तु देऊन त्यांचा कार्याचा गौरव करण्यात आला. यावेळी विभाग प्रमुख प्रा. भानुदास ताले, प्रोजेक्ट ऑफीसर आर.श्रीनिवासराव, कुलसचिव पराग पोकळे, डॉ. शिल्पा



आष्टणकर, प्रा. श्रीपाद क्षीरसागर, धर्मराज सहारे, गौतम गजभिये, राजवामनराव, मंगेश डफ उपस्थित होते. त्यांच्या सेवानिवृति वर त्यांच्या कायार्ची उपस्थितानी प्रशंसा केली. प्राचार्य डॉ. अविनाश श्रीखंडे म्हणाले की ईश्वर झाडे यांनी अनेक वर्षे प्रॉजेक्ट ऑफिस येथे इलेक्ट्रिकल टेक्निकल म्हणुन उत्तम व तत्परतेने सेवा दिली.त्यांची सेवा कायम स्मरणात राहील.

सत्कारला उत्तर देताना ईश्वर झाडे म्हणाले की संस्थेमुळेच माझे आयुश्य घडले व इलेक्ट्रिकल कामाच्या अनुभव आला. संचालन व आभार प्रा. शुभम निंबेकर यांनी मानले.

## वृद्धाचा मृत्यू

**नागपूर** : ट्रेनच्या धडकेत गंभीर जखमी होऊन एका वृद्धाचा मृत्यू झाला. ही घटना पाचपावली पोलिस ठाण्यांतर्गत घडली. कृष्णराव बळीराम वाघमारे (74) रा. बारसेनगर असे मृताचे नाव आहे. रविवारी सकाळी 10.45 वाजताच्या सुमारास वाघमारे हे घराजवळील दिवटेच्या दारूभट्टी मागील इतवारी रेल्वे रूळावरून पायदळ घरी जात होते. या दरम्यान धडधडत आलेल्या रेल्वेची धडक बसल्याने ते गंभीर जखमी झाले. नागरिकांनी त्यांना जखमी अवस्थेत पाहून घटनेची माहिती पोलिसांना दिली. वाघमारे यांना उपचारार्थ मेयो नेले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. प्रकरणी पोलिसांनी वाघमारे यांचा मुलगा सुनीलच्या तक्रारीवरून मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे.

# फायर कॉलेजमध्ये दीक्षांत परेड उत्साहात संपन्न

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३ :

राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालयाने (एनएफएससी) च्या चौथ्या वर्षाच्या बी.टेक. (फायर इंजिनिअरिंग- २०२१-२५) बॅचची दीक्षांत परेड उत्साहात पार पडली. पदवीधर कॅडेट्सनी घेतलेल्या चार वर्षांच्या कठोर शैक्षणिक शिक्षण आणि सघन शारीरिक प्रशिक्षणाचे प्रात्यक्षिक या समारोपीय कार्यक्रमात सादर करण्यात आले.

अग्निशमन सेवा, नागरी संरक्षण आणि गृहरक्षक दलाचे (एफएस, सीडी आणि एचजी) महासंचालक विवेक श्रीवास्तव, आयपीएस कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी परेडचा आढावा घेत पदवीधर विद्यार्थ्यांना



मार्गदर्शन केले. श्रीवास्तव यांनी विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांचे आणि समर्पणाचे कौतुक केले आणि पदवी यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. ते म्हणाले"फायर इंजिनिअरिंग हे एक अत्यंत आव्हानात्मक क्षेत्र असून त्यासाठी अटळ वचनबद्धता, तांत्रिक अचूकता आणि शारीरिक तयारी आवश्यक असते. या उदात्त व्यवसायात पाऊल ठेवताना शिस्त आणि सेवेची भावना अंगी बाणावी लागते तसेच, सतत शिकण्याची वृत्ती ठेवावी लागले. त्यांनी राष्ट्रीय सुरक्षिततेबाबत सांगताना वाढत्या गुंतागुंतीच्या आपत्ती परिस्थितींना तोंड देण्यासाठी, व्यावसायिक अग्निशमन सेवांच्या अपरिहार्य भूमिकेवर त्यांनी भर दिला.

महासंचालकांनी शपथविधी समारंभात पदवीधर विद्यार्थ्यांना व्यावसायिकतेची शपथ दिली. याप्रसंगी एनएफएससीचे संचालक नागेश शिंगणे यांनी अभ्यासक्रम अहवाल सादर केला. श्रीवास्तव यांनी एनएफएससीमधील अत्याधुनिक संगणक प्रयोगशाळा व एनएफएससी ग्रंथालयात असलेली आधुनिक मल्टीमीडिया लॅब या दोन प्रमुख पायाभूत सुविधांच्या सुधारणांचे उद्घाटन केले. प्राध्यापक ए.आर. सोनटक्के यांनी आभार यांनी सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व मान्यवरांचे, कर्मचारी, विद्यार्थी आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांचे मोठे योगदान लाभले.

# बीट द हीट २०० किमी नाईट राइडचे आयोजन



■ महासागर प्रतिनिधी
नागपुर, दि. ३ :

शहरातील टाइगर सिटी साइक्लिंग असोसिएशन ने नागपूर - पांढुर्णा- नागपूर अशी २०० किमीची बीट द हीट नाईट राइडह्व आयोजित केली. त्यात २० राइडर्स नी सहभाग नोंदवून दि. ३१ मे रोजी, प्रतापनगर चौक येथून सायं. ५ वा. सुरुवात करुन दि.१ जून रोजी, सकाळी ६ वा. पूर्ण केली.

२०० किमीची राइड पूर्ण करणाऱ्या सायकल स्वारांमधे उदय पानवलकर, दिलीप वरकड, प्रदीप देशपांडे, दिलीप बिरे, किशोर कुमार चौहान, रोशन पाटिल, सिद्धिविनायक जोगळेकर, कैलास यादव, इंजी. अविनाश भांदक्कर, सचिन मेंढ़े, राजेश सोनवने, अभिजीत जोशी, वेदांत बांगड़कर, जयप्रकाश सिंग, रेणुका जरे आणि अश्मित ढाकूलकर यांचा सहभाग होता. या सर्व राइडच्या दरम्यान सुरुवात व शेवटच्या स्थानकाचे व्यवस्थापण शेखर बालेकर, विनोद चेटुले यांनी केले. संकल्पना पूर्णत्वास आणण्यास जयंत मेंढ़ीं, शुभम नारखेडे, शैलेश भिलावे, धर्मपाल फुलझेले यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## ट्रकची ई-रिक्षाला धडक, वृद्धा ठार

■ महासागर प्रतिनिधी
नागपुर, दि. ३ :

भरधाव ट्रकच्या चालकाने एका ई-रिक्षाला धडक दिली. धडकेमुळे ई-रिक्षा उलटला आणि त्यात बसलेल्या वृद्धेचा गंभीर जखमी होऊन जागीच मृत्यू झाला. ही घटना नवीन कामठी पोलिस ठाण्यांतर्गत तहसील कार्यालयासमोर घडली. विठाबाई श्रीराम बावणे (65) रा. पिंपरी रामनगर, कन्हान असे मृत वृद्धेचे नाव आहे. सोमवारी सकाळी विठाबाई काही कामाने कामठीला गेल्या होत्या. सकाळी 10.30 वाजताच्या सुमारास ई-रिक्षामध्ये बसून घरी जात होत्या. तहसील कार्यालयासमोर ट्रक क्र. एमएच-40/बीजी-3307 च्या चालकाने रिक्षाला मागून जबर धडक दिली. या धडकेमुळे रिक्षा उलटला. मात्र विठाबाईला गंभीर दुखापत झाली. स्थानिक नागरिकांनी त्यांना उपचारार्थ कामठीच्या उपजिल्हा रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. पोलिसांनी विठाबाई यांचा मुलगा रवींद्रच्या तक्रारीवरून आरोपी ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.

# श्रद्धानंद आश्रम येथे अहिल्याबाई होळकर जयंती साजरी

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. ३ :

पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या 300 व्या जयंती निमित्त श्रद्धानंद आश्रम येथे भेट आयोजित करण्यात आली होती या वेळी येथील छोट्या छोट्या चिमुकल्या बाळांन सोबत वेळ घालवण्यात आला.

हा वेळ आमच्या जीवनाच्या उत्कृष्ठ वेळ राहीला असे मत सोनाली अभिजीत दळवी (जिजाऊ ब्रिगेड सचिव) महेश लोखंडे( भाजप हिंगना मंडळ अध्यक्ष), वैशाली महेश लोखंडे (सामाजिक कार्यकर्ते), इंद्रायणी सुरेश काळबांडे (माजी सरपंच ), लीलाधर पटले (पंचायत समिती सदस्य), निखिल



कश्यप (भाजप, महामंत्री), पूजा कश्यप आदी उपस्थितांनी व्यक्त केले. या आश्रमातील मुलांना लीलाधर पटले यांनी 10 (बॅग्स), राजू वनवे 10(बॅग्स),वैभव शर्मा 10(बॅग्स), कुमार भिवगडे 10(बॅग्स), धीरज सिंह 5(बॅग्स) सोनाली दळवी 10 (वृक्ष) वैशाली लोखंडे (लेखन साहीत्य) अभिषेक मंदाकिनी मल्लिक(100 खाद्य बॉक्स ) भेट म्हणून देण्यात आल्या. भेटवस्तू घेऊन लहान मुलांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले होते. आश्रमाकडून सर्वांचे आभार मानले.

## वारकरी बाल सुसंस्कार शिबिर

■ महासागर प्रतिनिधी
नागपुर, दि. ३ :

सदगुरु जोग महाराज, संस्थापित वारकरी शिक्षण संस्था, आळंदी द्वारा रामटेक येथे घनशामराव किंमतकर सभागृहात ८ दिवसीय निवासी शिबिर आयोजित करण्यात आले होते. योगासने, स्तोत्र पठण, टाळ वादन, भजन गायन, मृदंग वादन, व्यसनमुक्ती विष्णुसहस्त्रनामाचा पाठ, हरिपाठ पाऊली, हनुमान चालीसा पठन, श्लोक,अभंग गायन, आध्यात्मिक चर्चासत्र याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. ज्ञानसिंधू संदिपानजी महाराज, महाराष्ट्र भूषण रामायणाचार्य रामरावज ढोक यांच्या मार्गदर्शन मध्ये प्रमोद ठाकरे, सदानंद हेलंडे यांनी प्रशिक्षण दिले.

# (वेकोली) ने २०२४-२५ या आर्थिक वर्षात नफा मिळवून ऐतिहासिक टप्पा गाठला

■ महासागर प्रतिनिधी
नागपुर, दि. ३ :

कोल इंडिया लिमिटेड (सीआयएल) ची उपकंपनी वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड (वेकोली) ने २०२४-२५ या आर्थिक वर्षात करपूर्व नफा मिळवून ऐतिहासिक टप्पा गाठला आहे.



वेकोलीने २०२४-२५ या आर्थिक वर्षात ४३७५.५५ कोटी रुपयांचा करपूर्व नफा कमावला, जो मागील आर्थिक वषार्तील ४१८१.६७ कोटी रुपयांच्या तुलनेत ४.६४% जास्त आहे. कोळसा उत्पादनात ऐतिहासिक वाढ, कार्यक्षमतेत लक्षणीय सुधारणा आणि वीज आणि वीज नसलेल्या क्षेत्रांकडून जोरदार मागणी यामुळे ही कामगिरी शक्य झाली आहे.

या कामगिरीबद्दल आनंद व्यक्त करताना,डब्लू सी एल संचालक (वित्त)बिक्रम घोष म्हणाले, ही आकडेवारी केवळ आर्थिक कामगिरी नाही तर राष्ट्राची ऊर्जा सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी सतत प्रयत्नशील असलेल्या डब्लू सी एल च्या वचनबद्धता, समर्पण आणि टीमवर्कचे प्रतीक आहे. ते पुढे म्हणाले की, कंपनीने स्वीकारलेल्या धोरणात्मक उपक्रमांमुळे हे यश शक्य झाले आहे, ज्यामध्ये नवीन खाणी उघडणे, तांत्रिक आधुनिकीकरण आणि पर्यावरणीय शाश्वततेवर लक्ष केंद्रित करणाऱ्या योजनांचा समावेश आहे.

डब्लूसीएलची ही कामगिरी अशा वेळी आली आहे जेव्हा देश ऊर्जा उत्पादन वाढवण्यासाठी आणि कोळशाच्या आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी गंभीर प्रयत्न करत आहे. डब्लू सी एल ची ही कामगिरी २०३० पर्यंत दरवर्षी एक अब्ज टन कोळसा उत्पादन करण्याचे कोल इंडिया लिमिटेडचे लक्ष्य पूर्ण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल.

महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशात डब्लू सी एल ४७ हून अधिक खाणी चालवत असल्याचे ज्ञात आहे. सध्या कंपनीत ३२,६८५ कर्मचारी काम करत आहेत.

जागतिक स्तरावर कोळसा उद्योग पर्यावरणीय जबाबदाऱ्यांच्या कसोटीवर उतरण्यासाठी प्रयत्न करत असताना, डब्लू सी एल ने पर्यावरणपूरक खाणकाम, जमीन पुनर्वसन आणि हरित पट्टा विकास यासारख्या उपक्रमांना प्राधान्य देऊन पर्यावरणाप्रती आपली वचनबद्धता पुन्हा व्यक्त केली आहे.

# देवदर्शनाला जाणाऱ्या भाविकांसाठी आजपासून बससेवा

■ महासागर प्रतिनिधी
नागपुर, दि. ३ :



उन्हाळ्यातील सुटीत देवदर्शनाला जाणाऱ्या विदर्भातील भाविकांच्या सोयीसाठीच नागपूर-शिर्डी व शिर्डी-नागपूर ही बससेवा सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार एसटी महामंडळाच्या नागपूर विभागातर्फे शेगाव आणि शिर्डी जाणाऱ्या भाविकांसाठी ४ जूनपासून नागपूर-शिर्डी आणि ५ जूनपासून शिर्डी ते नागपूर बससेवा सुरू होत आहे. या नव्या बससेवेमुळे भाविकांना देवदर्शनाचा लाभ घेता येणार असल्याची माहिती नागपूर विभागाचे नियंत्रक विनोद चवरे यांनी दिली आहे.

**शिर्डी बससेवा शेगावमार्गे**

एसटी महामंडळाच्या नागपूर विभागाने दिलेल्या माहितीनुसार, ४ जूनपासून नागपूर शेवागमार्गे शिर्डी बससेवा सुरू येत आहे. ही बससेवा नियमित राहणार असून नागपूर-शिर्डी बस सकाळी ६.१५ वाजता नागपूर येथून प्रस्थान करेल. शेगाव येथे दुपारी १.१५ वाजता पोहोचेल आणि शिर्डी येथे रात्री १०.३० वाजता दाखल होईल. शिर्डी बससेवा शेगावमार्गे नागपूर ही बससेवा ५ जूनपासून सुरू करण्यात येणार आहे. शिर्डी-नागपूर बस शिर्डी येथून सकाळी ७.३० वाजता करेल. ही बस शेगाव येथे ४.१५ वाजता पोहोचेल आणि नागपूर येथे रात्री ११.१५ वाजता दाखल होईल.

या बसचे नागपूर ते शेगाव तिकीट दर ५१४ रुपये तर नागपूर शिर्डी १ हजार ९६ रुपये आहे. या बसचे चालक व वाहक शेगाव स्थानकावरून बदलण्यात येणार आहेत. विशेष म्हणजे नागपूर-शिर्डी आणि शिर्डी-नागपूर या ज्येष्ठ नागरिक, अमृत ज्येष्ठ नागरिक, महिला सन्मान योजना यासह सर्व सवलती लागू राहणार आहेत.

# राहुल नगर पोलीस चौकीचे उद्घाटन

■ महासागर प्रतिनिधी, नागपुर, दि. ३ :

पोलीस आयुक्त नागपूर शहर यांच्या संकल्पनेतून पोलीस ठाणे धंतोली हद्दीतील राहुल नगर, प्रियंकावाडी, हिंदुस्तान कॉलनी, गजानन नगर, समर्थ नगर या परिसरात गुन्हेगारी कमी व्हावी, अवैध धंदे बंद व्हावे, गरजू नागरिकांपर्यंत तात्काळ पोहोचता यावे या उद्देशाने राहुल नगर पोलीस चौकीचे निर्माण करण्यात आले.



दि. 02. जुन 2025 रोजी पोलीस ठाणे धंतोली येथील गजानन नगर बीट मधील राहुल नगर या पोलीस चौकीचे राहुल मदने, पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र.02, नागपूर सहाय्यक पोलीस आयुक्त ,सुधीर नंदनवार, सिताबर्डी विभाग नागपूर शहर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. सदर वेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे धंतोली, पोलीस ठाणे धंतोली येथील अधिकारी व अंमलदार तसेच परिसरातील नागरिक हजर होते अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनामिका मिझार्पुरे पो. ठाणे धंतोली नागपूर शहर यांनी दिली.

# पर्यावरण संरक्षणासाठी जनजागृती

■ महासागर प्रतिनिधी
नागपुर, दि. ३ :

जागतिक पर्यावरण दिन मोहीम २०२५ (२२ मे ते ५ जून) अंतर्गत विविध ठिकाणी पर्यावरण संरक्षणासाठी जनजागृती कार्यक्रम आयोजित केले जात आहेत. याअंतर्गत, दररोज थीमनुसार जागरूकता कार्यक्रम आयोजित केले जात आहेत.

संवाद आणि वर्तन बदलावर लक्ष केंद्रित करणारे उपक्रम आयोजित केले जात आहेत. या क्रमाने, दक्षिण पूर्व मध्य रेल्वे नागपूर मंडळ "प्लास्टिक प्रदूषण कमी करा" या थीमवर जनजागृती करते. विभागातील प्रमुख रेल्वे स्थानकांवर ही मोहीम आयोजित करण्यात आली होती.

दिलीप सिंग - वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक यांनी सांगितले की, या अंतर्गत, स्थानकांवर बसवलेले प्लास्टिक बाटली क्रशिंग मशीनच्या कामकाजाच्या स्थितीचा आणि देखभालीचा आढावा घेण्यात



आला. यासोबतच स्टॉल चालक आणि विक्रेत्यांचाही आढावा घेण्यात आला. एकदा वापरता येईल अशा प्लास्टिक इम्प्लीमेंटर्सना आवश्यक मार्गदर्शक तत्त्वे देखील देण्यात आली जेणेकरून एकदा वापरता येईल. प्लास्टिकवरील बंदी पाळली जाईल याची खात्री करण्यासाठी, प्रवाशांना वापरण्यासाठी स्वतःच्या बाटल्या आणण्यास सांगितले जाते.

प्रवाशांना जागरूक करण्यासाठी स्टेशनवर सार्वजनिक घोषणा प्रणालीद्वारे स्वतःचे पाणी घेऊन जाण्यास प्रोत्साहित करण्यात आले.

प्रवाशांना एकदा वापरता येणाऱ्या प्लास्टिकच्या बाटल्या वापरण्याचे आवाहन केले जात आहे. जाणीव करून दिली होती. तसेच, प्रवाशांना कचऱ्याच्या डब्यांचा योग्य वापर आणि स्वच्छतेबद्दल जागरूक करण्यात आले. कार्यक्रमस्थळी पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करावा आणि खाद्यपदार्थ विक्रेत्यांनी प्लास्टिकऐवजी पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करावा. स्वच्छता मोहिमा नियमितपणे सुरू ठेवून पर्यावरण स्वच्छ करा. कायम ठेवण्याचा संकल्प पुन्हा एकदा व्यक्त करण्यात आला.

## मध्य रेल्वेची २०२५ मध्ये दमदार आर्थिक कामगिरी

■ महासागर प्रतिनिधी
नागपुर, दि. ३ :

मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने मे 2025 या महिन्यात विविध महसूल स्त्रोतांमधून उत्तम कामगिरी करत मजबूत आर्थिक प्रगती दर्शवली आहे. ही वाढ कार्यक्षम संचालन, प्रवासी सुविधा, वेळापत्रकाचे पालन आणि मालवाहतूक सेवा सुधारण्याच्या उपाय योजनांचे फलित आहे. मे 2025 मध्ये नागपूर विभागाने 57.57 कोटी रुपयांचा प्रवासी महसूल मिळवला.

वाढती प्रवासी संख्या आणि सुधारित सेवा यामुळे एप्रिल-मे 2025 या दोन महिन्यांचा एकत्रित प्रवासी महसूल 114.09 कोटी झाला आहे. मालवाहतूक व लॉजिस्टिक्स क्षेत्रात नागपूर विभाग सातत्याने प्रगती करत आहे. मे 2025 मध्ये विभागाने पार्सल सेवेमधून 1.05 कोटी रुपए मिळवले असून एप्रिल-मे 2025 पर्यंतचा एकत्रित पार्सल महसूल 2.26 कोटी इतका झाला आहे.

# असामाजिक तत्वांची माहिती पोलिसांना द्या

## शांतता समितीच्या बैठकीत पोलिस आयुक्तांचे आवाहन

■ महासागर प्रतिनिधी
नागपुर, दि. ३ :

कोणतीही पोस्ट शेअर करताना जबाबदारीने वागा. फॉरवर्ड केल्यावर त्यात आपला सहभाग असतो. त्यामुळे विचारपूर्वक कृती करा, असे आवाहन पोलिस आयुक्त रवींद्रकुमार सिंगल यांनी केले. आगामी विविध सण उत्सवाच्या पृष्ठभूमीवर शहरात शांतता, सौहार्द आणि कायदा-सुव्यवस्था अबाधित राहावी याकरिता शहर पोलिस आणि शांतता समितीच्या बैठकीत सिगल बोलत होते.

सायबर पोलिस ठाण्यात अत्याधुनिक टूल्ससह सायबर लॅब उघडण्यात आली असून यासारख्या प्लॅटफॉर्मवरील माहिती आम्हाला त्वरित मिळते. आपण स्वतःचे आवाजात चांगले, सकारात्मक व्हिडीओ तयार करा, छोट्या रिल बनवा आणि समाजासाठी शेअर करा जेणेकरून समाजात



सकारात्मक ऊर्जा निर्माण होईल. शहरातील प्रत्येक नागरिकापर्यंत चांगला संदेश पोहोचवून हे शहर अधिक सुंदर, सुरक्षित आणि सुसंस्कृत बनवावे, असे आवाहन पोलिस आयुक्तांनी केले. यावेळी गोवंश, कुबार्नी नंतर उरलेले वेस्टेज, सोशल मीडियाचा सकारात्मक वापर, अफवा व भडकाऊ पोस्ट्स रोखणे, आरोग्यविषयक समस्या, एकमेकांच्या धर्माविषयी आदर बाळगणे, सण एकत्रित साजरे करणे, अचानक उद्भवणाऱ्या अडचणीसाठी डायल 112 चा वापर, बेकायदेशीर गोष्टींची माहिती पोलिसांना देणे, महानगरपालिकेच्या वाहनांनी कुबार्नीच्या दिवशी वेस्टेज उचलण्याची जबाबदारी, तसेच सणाच्या दिवशी बंदोबस्त तैनाती यांसारख्या महत्त्वपूर्ण मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली.

पोलिस आयुक्त पुढे म्हणाली की, आम्ही गुन्हेगारांची घरे तपासत आहोत, त्यांना कार्यालयात बोलावून ताकीद देत आहोत. गंभीर गुन्हेगारांवर मकोका, तडीपार आणि एमपीडीए सारखे कठोर कायदे लावले जात आहेत. समाजकंटक भीती पसरवतात पण आपण घाबरू नका, आम्हाला माहिती द्या, आम्ही त्वरित कारवाई करू.

आपल्या शेजारी काही चुकीचे घडत असेल, क्रिमिनल ॲक्टिव्हिटी असेल, तर ती माहिती दिलीच पाहिजे. ही माहिती जर आपण देत नसाल, तर आपण आपले सामाजिक कर्तव्य पार पाडत नाही. असे पोलिस आयुक्त यांनी म्हटले.

बैठकीला सह पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, अपर पोलिस आयुक्त (गुन्हे) वसंत परदेशी, राजेंद्र दाभाडे, पोलिस उपायुक्त लोहित मतानी, निकेतन कदम, राहुल मदने, महक स्वामी, रश्मिता राव तसेच पोलिस मुख्यालयातील डॉ. अश्विनी पाटील, वाहतूक शाखेचे प्रभारी सहाय्यक पोलिस आयुक्त बाविस्कर, सर्व सहाय्यक पोलिस आयुक्त, सर्व वरिष्ठ पोलिस निरीक्षक, शांतता कमिटीचे सदस्य, प्रभारी पोलिस उपायुक्त शशिकांत सातव (विशेष शाखा), राखीव पोलिस निरीक्षक विनोद तिवारी आणि इतर अधिकारी यांनी विशेष सहकार्य केले. कार्यक्रमाचे संचालन व आभार एसीपी नरेंद्र हिवरे यांनी मानले.

# लता मंगेशकर उद्यानात साकारणार ॲडव्हेंचर पार्क





**असे असतील साहसी खेळ**

* झिप लाईन सिंगल रोप वन वे
* ॲडव्हेंचर प्ले स्टेशन
* लो रोप कोर्स
* क्लायमिंग वॉल ऑपरेशनल इक्विपमेंट
* रॅपलिंग वॉल अँड ऑपरेशनल इक्विपमेंट
* बायसिकल रोप वे (स्काय सायकल डबल)
* स्काय रोलर डबल अँड ऑपरेशनल इक्विपमेंट
* बंगी इजेक्शन अँड ऑपरेशनल इक्विपमेंट
* सस्पेंशन ब्रिज व कनोपी वॉक, बर्मा ब्रिज
* ट्राम्पोलाईन पार्क अँड सॉफ्ट प्ले एरिया
* क्लोज शेड विथ शूटर ट्रॅम्पोलिन पार्क अँड सॉफ्ट प्ले एरिया
* बिग स्विंग
* नेट क्लायमिंग
* रोप क्लायमिंग
* स्लिपरी वॉल

■ **महासागर प्रतिनिधी नागपुर, दि. ३ :**

नागपूर शहरात विद्यार्थ्यांना साहसी खेळांचा अनुभव यावा तसेच त्यांच्यामध्ये शौर्याची भावना निर्माण व्हावी, याकरिता नागपूर महानगरपालिकेने सूर्यनगरातील लता मंगेशकर उद्यानात ८ कोटी ७९ लाख रुपये खर्च करून ॲडव्हेंचर पार्क उभारण्याचा निर्णय घेतला आहे. या अभिनव प्रकल्पाला महानगरपालिकेने प्रशासकीय मान्यता दिली आहे. यामुळे शहरातील स्मार्ट तसेच एका लक्षवेधी प्रकल्पामध्ये भर पडणार आहे.

लता मंगेशकर उद्यान जुने ऑडीटोरीयम स्टेडीयम तोडण्यात आले असून, या ठिकाणची जागा मोकळी झाली आहे. तसेच मुलांच्या खेळण्याकरिता दोन एकर जागा आहे. या उद्यानात विविध प्रकारचे १५ साहसी खेळ व अडव्हेन्चर पार्क उभारणी करण्याचे महनगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजित चौधरी यांनी निर्देश दिले आहेत. या प्रकारचे ॲडव्हेंचर पार्क उभारणाऱ्या एजन्सी धारकांशी संपर्क करुन या बाबतची संपूर्ण माहिती दिली. या परिसरात त्या बाबतचे नियोजन करुन ॲडव्हेंचरपार्क आणि आवश्यक असलेली स्थापत्य कामे, हिरवळीचे कामे पूर्ण करण्यासाठी ८ कोटी ७९ लाख १६ हजार ६९४ रुपयांचे प्रस्ताव तयार करण्यात आला आहे.

यामध्ये स्थापत्य कामे व हिरवळीचे करिता ४ कोटी ५८ लाख ६३ हजार ३७४ रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तसेच ॲडव्हेंचर पार्कचे साहसी खेळाचे उभारणी करिता ४ कोटी २० लाख ५३ हजार ३२० रुपये एवढा खर्च अपेक्षित आहे.

हा प्रकल्प शहर सौंदर्यीकरणाच्या दृष्टीने तसेच युवा पिढीकरिता उत्साहवर्धक व आरोग्यदायक असल्याने या प्रस्तावास विशेष बाब म्हणून निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. लता मंगेशकर उद्यानात ॲडव्हेंचर पार्कच्या निर्मितीकरिता विविध स्थापत्य कामे वायरिंग, फेन्सिंग करणे, नवीन पाथ वे बनविणे व ऑफिस व टिकीट रूम, स्मार्ट टॉयलेट तयार करणे व इत्यादी किरकोळ कामे करणे प्रस्तावित असून, सौंदर्यीकरणाच्या दृष्टीने हिरवळीच्या कामाअंतर्गत लॉन, शोभिवंत झाडे लावण्याचे प्रस्तावित आहे.

या कामास आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी प्रशासकीय मान्यता दिली असून, लवकरच हे काम रीतसर निविदा बोलावून पूर्ण करण्यात येईल.

# व्यावसायिकाच्या घरी ४७.१० लाखांची चोरी

■ **महासागर प्रतिनिधी, नागपुर, दि. ३ :**

अज्ञात आरोपीने एका व्यावसायिकाचे घरफोडून 802 ग्रॅम सोने, हिरा-प्लॅटिनमचे दागिने व रोख 1 लाख रुपयांसह लाखोंच्या मुद्देमालावर डल्ला मारला, मात्र घरच्यांना याचा सुगावाही लागला नाही. दागिन्यांची आवश्यकता असल्याने कपाट उघडले असता त्यांच्या पायाखालची जमीनच सरकली. सर्व दागिने व रोकड गायब होती. ही धक्कादायक घटना गणेशपेठ पोलिस ठाण्यांतर्गत बजेरियाच्या मारवाडी चाळ परिसरात उघडकीस आली. पोलिसांनी या प्रकरणी सनी सतीशकुमार गुप्ता (39) रा. लक्ष्मी निवासच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.

सनी हे आर्किटेक्ट आहेत. बहुमजली इमारतीत तिसऱ्या माळ्यावर ते आई राधा, वडील सतीशकुमार आणि पत्नी निकितासोबत राहतात. खालच्या दोन्ही माळ्यांवर त्यांच्या काकाचे कुटुंब राहते. तळ माळ्यावर सनीचे गोदरेज फर्निचरचे दुकान आहे. 10 मे रोजी सनी पुणे येथे राहणाऱ्या बहिणीकडे गेले होते. दुसऱ्या दिवशी त्यांचे आई-वडीलही पुणेसाठी रवाना झाले. केवळ पत्नी निकिता घरी होती. 14 मेच्या सकाळी सनी घरी परतले. 23 मे रोजी त्यांची पत्नी घराला कुलूप लावून इंदौरसाठी रवाना झाली. जाण्यापूर्वी तिने घराची चावी दुकानात ठेवली होती. जाताना ती कपाटाच्या लॉकरमधून आपला ब्रास्लेटही घेऊन गेली होती. त्यावेळी सर्व दागिने कपाटातच होते. तेव्हापासून सनी घरी एकटेच होते.

आई-वडिलांना 2 जून रोजी दुर्गसाठी रवाना व्हायचे होते. त्यामुळे ते 30 मे रोजी नागपूरला परतले. रविवारी सायंकाळी आईने बेडरूममधील कपाट उघडले असता दागिन्यांचा डब्बा गायब होता. त्यांनी सर्व कपाट शोधले, मात्र डब्बा किंवा दागिने मिळाले नाही. ती रोकडही गायब होती. सनी यांनी त्यांच्या बेडरूममधील कपाट उघडले असता दोन्ही डबे तेथेच होते, मात्र त्यातील दागिने चोरी झाले होते. विशेष म्हणजे कपाटाच्या चाव्या त्यांची आई जेथे ठेवत होती तेथेच होत्या.

घर आणि दागिन्यांची पूर्ण माहिती असणाऱ्यापैकीच काणीतरी ही चोरी केल्याचा संशय पोलिसांना आहे. कपाटाच्या चाव्या घरीच होत्या. सर्व कपाटांचे लॉकही लागले होते. यावरून स्पष्ट आहे की, ज्याने जोरी केली त्याने चाव्यांच्या मदतीने कपाट उघडले आणि संशय येऊ नये म्हणून चोरी केल्यानंतर चाव्या परत त्याच ठिकाणी ठेवल्या. पोलिस कुटुंबीयांशी संबंधित सर्वांची चौकशी करीत आहेत.

**ठसे तज्ज्ञांनाही केले पाचारण**

त्यांनी घटनेची तक्रार पोलिसात केली. गणेशपेठ पोलिस घटनास्थळी पोहोचले. घटनास्थळाची पाहणी केल्यानंतर ठसे तज्ज्ञांना पाचारण करण्यात आले. ठसे तज्ज्ञांनी बोटांचे ठसे घेतले. प्राथमिक तपासानंतर गणेशपेठ पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदविला. चोरी गेलेल्या 802 ग्रॅम दागिन्यांमध्ये काही हिरे जडित होते आणि काही प्लॅटिनमचे होते. ज्यांची एकूण किंमत 47.10 लाख रुपये आहे.

## सीताबर्डी येथे होणार हिंदू साम्राज्य दिनानिमित्त
# छत्रपती शिवरायांची महाआरती

■ **महासागर प्रतिनिधी, नागपुर, दि. ३ :**

हिंदू साम्राज्य दिनानिमित्त नागपुरातील सीताबर्डी मित्रमंडळाने एक स्तुत्य उपक्रम हाती घेतला आहे. बर्डी मेन रोडवरील ऐतिहासिक बूटी महाद्वार (रिगल गेट) येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूतीर्चा महाअभिषेक व महाआरतीचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा शुक्रवार ६ जून रोजी सकाळी ७ वाजता होणार असून, आयोजकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

हिंदू साम्राज्य दिन हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचा आणि त्यांनी स्थापन केलेल्या स्वराज्याचा गौरवशाली दिवस आहे. या दिनाचे औचित्य साधून सीताबर्डी मित्रमंडळ दरवर्षी विविध कार्यक्रमांचे आयोजन करते. यावर्षी, सकाळी ७ वाजता महाराजांच्या मूतीर्चा दुग्धाभिषेक, जलाभिषेक तसेच विविध पवित्र वस्तूंनी महाअभिषेक करण्यात येणार आहे. त्यानंतर पारंपरिक पद्धतीने मंत्रोच्चारांसह महाआरती केली जाईल. "छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या पराक्रमाने आणि दूरदृष्टीने स्वराज्याची स्थापना केली. त्यांनी केवळ एक राज्यच नाही, तर एक आदर्श समाजव्यवस्था निर्माण केली.

# ॲडव्होकेट प्रोटेक्शन ॲक्ट लवकरच लागू करावा : ॲड. नागेंद्र कुमार

■ **महासागर प्रतिनिधी, नागपुर, दि. ३ :**

"ॲडव्होकेट प्रोटेक्शन ॲक्ट ही काळाची गरज आहे. आणि वकिलांसह हा मंच त्यासाठी प्रत्येक लढाई लढण्यास तयार आहे. या संदर्भात बार कौन्सिल आणि असोसिएशन इत्यादींशीही चर्चा झाली, देशात लवकरच ॲडव्होकेट प्रोटेक्शन ॲक्ट लागू झाला पाहिजे असे सर्वांना वाटते", असे नवी दिल्ली बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. नागेंद्र कुमार म्हणाले. तीन मूर्ती भवनच्या सभागृहात ऑल इंडिया जॉइंट ॲडव्होकेट फोरम इंडियाच्या चौथ्या राष्ट्रीय अधिवेशनात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.



कार्यक्रमाचे अध्यक्षपद फोरमचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. चंद्रकुमार वलेजा कुमार यांनी भूषवले तर फोरमचे राष्ट्रीय संरक्षक कैलाश गौतम, ज्येष्ठ सदस्य मनोज संघपाल, अंजली शर्मा, मनोहर चंचलानी, डॉ.मनोज आहुजा विशेष उपस्थित होते. याप्रसंगी देशातील सुमारे १९ राज्यांतील ॲडव्होकेट मोठ्या संख्येने उपस्थित होते. अधिवक्ता नागेंद्र कुमार पुढे म्हणाले की, या मंचाच्या सदस्यांचा उत्साह पाहून असे वाटते की लवकरच कोणत्या देशात अधिवक्ता उत्पादन कायदा लागू होईल. अधिवक्ता कैलाश गौतम, डॉ. मनोज आहुजा, गंगा प्रसाद यादव, अंजली शर्मा, मनोज संघपाल, छत्रपती शर्मा, विलास राऊत, शैलेश सक्सेना, प्रभात मिश्रा इत्यादींनी व्यासपीठावरून बोलताना वकिलांसाठी आरोग्य विमा, कनिष्ठ वकिलांसाठी वेतन, पेन्शन इत्यादींची मागणी केली.

या अधिवेशनात विविध राज्यांमध्ये उल्लेखनीय काम करणाऱ्या वकिलांना स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. अध्यक्षस्थानी बोलताना अधिवक्ता वलेजा म्हणाले की, व्यासपीठ स्थापनेचा उद्देश वकिलांचे भविष्य बळकट करणे तसेच त्यांच्या कुटुंबांची काळजी घेणे आहे. अधिवक्ता संरक्षण कायद्याचा विचार करता, मंच त्यासाठी प्रत्येक लढाई लढण्यास तयार आहे, कोणत्याही परिस्थितीत या देशात अधिवक्ता संरक्षण कायदा लागू होईपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाही. कार्यक्रमाचे संचालन करण शाक्य उर्फ कक्कजी यांनी केले.

# ६ जणांना शस्त्रासह अटक

■ **महासागर प्रतिनिधी, नागपुर, दि. ३ :**

गुन्हेगारांची लगाम कसण्यासाठी पोलिस सतत कारवाई करीत आहेत. वेगवेगळ्या ठाण्यांतर्गत सर्व अभिलेखावरील गुन्हेगारांची तपासणी करीत आहेत. या विशेष मोहिमेंतर्गत पोलिसांनी 6 गुन्हेगारांना शस्त्रासह अटक केली आहे. यावेळी जिल्ह्यातून एक वषार्साठी तडीपार करण्यात आलेला कामठीचा सराईत गुन्हेगार मोहम्मद हुसेन उर्फ बंटू मोहम्मद बशीर (32) रा. मदन चौक हा सुद्धा यशोधरानगर पोलिसांच्या हाती लागला.

मोहिमेदरम्यान अंबाझरी पोलिसांनी गोपनिय माहितीच्या आधारावर सुदामनगरी परिसरात राहणाऱ्या साहिल राजन भोवते (20) याला ताब्यात घेतले. झडतीमध्ये त्याच्याजवळ चाकू आणि एका डब्बीत 6 जीवंत काडतूस मिळाले. यावरून त्याच्याकडे पिस्तूल असल्याचाही अंदाज वर्तविण्यात येत आहे. पोलिस त्याची कसून चौकशी करीत आहेत. गिट्टीखदान पोलिसांनी रोहित दिलीप मरकाम (28) रा. अनंतनगर याला चाकूसह पकडले. इमामवाडा पोलिसांनी टोपाज बिल्डिंगजवळ नयन उर्फ बाबा नवनाथ चवरे (24) या तलवार घेऊन फिरताना अटक केली. तहसील पोलिसांनी भानखेडा परिसरात संशयास्पदरित्या फिरत असलेल्या आकाश विलास लांजेवार (26) रा. शास्त्रीनगर याला पकडले. झडतीमध्ये त्याच्याजवळ कट्यार मिळाली. नंदनवन पोलिसांनी मोहम्मद इमरान मोहम्मद उमर (38) रा. हसनबाग याला तलवार घेऊन फिरताना पकडले. पाचपावली पोलिसांनीही अभिलेखावरील गुन्हेगार किशोर बंडू सहारे (31) याला मिलिंदनगर मैदानाजवळ तलवार घेऊन फिरताना अटक केली. सर्व आरोपींवर आर्म्स ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# सागर यादववर लावला एमपीडीए

■ **महासागर प्रतिनिधी, नागपुर, दि. ३ :**

कळमना ठाण्यांतर्गत अनेक वर्षांपासून सक्रीय गुंड सागर उर्फ बाबा ओमप्रकाश यादव (19) रा. डिप्टी सिग्नलविरुद्ध पोलिस आयुक्तांनी एमपीडीए लावला आहे. सागर हा सराईत गुन्हेगार आहे. त्याच्याविरुद्ध खून, खुनाचा प्रयत्न, दंगा, मारहाण, आर्म्स ॲक्ट आणि लोकांना धमकावण्यासह गंभीर स्वरुपाचे गुन्ह्यांची नोंद आहे. याच वर्षी पोलिसांनी त्याच्याविरुद्ध प्रतिबंधक कार्यवाही केली होती. त्यानंतरही सागर गुन्हेगारीत सक्रीय होता. त्याने शस्त्राने एका व्यक्तीवर हल्ला करीत गंभीर जखमी केले. सागरची लगाम कसण्यासाठी कळमनाच्या ठाणेदारांनी गुन्हे शाखेमार्फत एमपीडीएचा प्रस्ताव पोलिस आयुक्तांकडे पाठवला.

# आरोग्य कर्मचारी किशोर वैद्य यांना शासनाचा राज्यस्तरीय गौरव पुरस्कार

■ **महासागर प्रतिनिधी, हिंगणा, दि. ३ :**

येथील तालुका आरोग्य विभागातील कर्मचारी किशोर वैद्य यांना शासनाचा राज्यस्तरीय गुणवंत कर्मचारी गौरव पुरस्कार प्राप्त झाला. श्री वैद्य तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयात आरोग्य सहायक पदावर कार्यरत आहेत. नुकताच यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मंत्रालय मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, ग्रामविकास व पंचायत राज विभाग मंत्री जयकुमार गोरे, गृह शहरे, महसूल, ग्रामविकास व पंचायत राज, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, अन्न व औषध प्रशासन राज्यमंत्री योगेश कदम यांच्या प्रमुख उपस्थितीत मान्यवरांच्या हस्ते किशोर वैद्य यांना सन 2022 - 23 करिता गुणवंता कर्मचारी राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.




आरोग्य सेवा, हीच ईश्वर सेवा या प्रमाणे कार्य करीत असतांना आरोग्य सेवा देतांना आवश्यक असलेली नागरीकांची आरोग्य विषयक माहिती ठेवतांना तसेच आरोग्य सेवा देतांना त्यांना ज्या अडचणी आल्या त्यावर यांनी सामाजिक आरोग्य विषयक संख्याशास्त्र या नावाने ऑनलाईन सॉफ्टवेअर द्वारे अडचणी सोडविण्याचा प्रयत्न केलेला आहे. हे सॉफ्टवेअर सर्व शासकिय दवाखाने, शासनास तसेच नागरीकांना उपयुक्त आहे. सन 2022-23 करीता महाराष्ट्र राज्य स्तरीय वंदनिय बाळासाहेब ठाकरे आरोग्य रत्न व गुणवंत कर्मचारी पुरस्कार असे दोन्ही राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झालेले आहेत.

महाराष्ट्र राज्यामध्ये ग्राम विकास विभागामार्फत अनेक पुरस्कृत योजना व प्रकल्प राबवितांना संबंधीत अधिकारी / कर्मचा-यांचे प्रशासकिय तसेच तांत्रीक कौशल्य पणाला लागते अशा कर्मचा-यांमध्ये विशेष वैयक्तीक कौशल्य व गुणवत्ता आढळुन येते अशा उत्कृष्ट अधिकारी / कर्मचारी यांना हा पुरस्कार देण्यात येतो. किशोर वैद्य यांनी वरिष्ठ अधिकारी व तालुका आरोग्य अधिकारी प्रवीण पडवे यांच्या मार्गदर्शनामुळे हा पुरस्कार मिळाल्याचे समाधान व्यक्त केले. पुरस्कार प्राप्त सहकाऱ्याचे तालुका आरोग्य विभागातील प्रशांत कोहाडे, प्रशांत चव्हाण, गणेश कंगाले, चंद्रकांत राउत, धम्मदिप गणविर, मोहन भोयर, संजु नैताम, संगिता सोमकुवर, आचल गुजरकर, प्रिती लांजेवार यांनी अभिनंदन केले.

# ५०९७ वाहन चालकांवर कारवाई

■ **महासागर प्रतिनिधी, नागपुर, दि. ३ :**

वाहतूक शाखा पोलिसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकुण 5,097 वाहन चालकांवर कारवाई करून 4,07,400 रुपयांचा दंड वसूल केला.

त्याचप्रमाणे शहर पोलिसांनी महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये 2 व एनडीपीएस अन्वये 2 अशा 4 प्रकरणात 5 आरोपींवर कारवाई करून 1,01,641 रुपयांचा माल जप्त केला. तसचे महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये 3 प्रकरणात 6 जुगाऱ्यांवर कारवाई करून 92,675 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलिसांतर्फे राबविण्यात आली. या पुढेही कारवाई प्रभावीपणे राबविण्यात येणार असून वाहनचालकांनी वाहन चालविताना वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित असे आवाहन वाहतूक शाखेतर्फे नागरिकांना करण्यात आले आहे.

# श्रीकृष्ण चांडक, प्रकाश पोहरे सहित अनेक मान्यवरांचा सन्मान

■ **महासागर प्रतिनिधी, कामठी, दि. ३ :**



श्रीकृष्ण चांडक, प्रकाश पोहरे, लोकगायिका रजनी रजक, प्रल्हाद रजक, विनोद बुंदेले यांच्या हस्ते वृत्तपत्रच्य संपादक, पत्रकार आणि तेजस संस्था परिवार २०२५ मधे परीक्षेत उत्तीर्ण झालेले विद्यार्थी, सामाजिक योद्धयांना ८ जून रोजी कामठी येथे सन्मानित केले जाईल.

चंद्रशेखर अरगुलेवार यांनी पत्रकारांना दिलेल्या मुलाखतीत सांगितले की, तेजस संस्थे तर्फे ८ जून २०२५ रोजी आयोजित केलेल्या सत्कार कार्यक्रमात श्रीकृष्णजी चांडक, प्रकाशजी पोहरे, प्रसिद्ध लोकगायक रजनीजी रजक, प्रल्हादजी रजक, विनोद बुंदेले हे पाच प्रसिद्ध व्यक्तिमत्त्व आहे, ते त्यांच्या नावाने नाही तर त्यांच्या कार्यशैलीने ओळखले जातात. तेजस संस्थेचे काम गेल्या ८ वर्षांपासून जनहितासाठी केले जात आहे. तेजस संस्थेचे नाव प्रत्येकाच्या ओठांवर आहे.

श्रीकृष्णजी चांडक हे दैनिक महासागर, युवा दर्शन, नागपूर पोस्ट या वृत्तपत्रांचे संचालक/संपादक आहेत आणि अनेक सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग घेतात. प्रकाश पोहरे हे राष्ट्रप्रकाश आणि दैनिक देशोन्नतीचे संचालक/संपादक आहेत. ते किसान ब्रिगेडचे संस्थापक आणि शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी लढणारे विदर्भातील एकमेव लढाऊ नेते आहेत.

तो सामाजिक कार्यातही मोठ्या उत्साहाने भाग घेतात. छत्तीसगडच्या लोकगायिका रजनी रजक हे स्वतःचे एक नाव आहे आणि त्यांना राष्ट्रपतींपासून ते भारत सरकारपर्यंत अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. प्रल्हाद रजक हे महाराष्ट्राचे नवे नाव आहे. रजकजी हे रायपूरचे रहिवासी आहेत आणि छत्तीसगड सरकारमधील एक शक्तिशाली नेते आहेत.

तेजस संस्था परिवाराच्या कामठी कॅन्टचे माजी उपाध्यक्ष महेंद्र भुटानी, विदर्भ नेते सीए सुनील चोखारे, भाजपा कामगार सेलच्या प्रदेशाध्यक्षा सविता पांडे, उपजिल्हा रुग्णालयच्य डॉ नयना दुफारे, चौधरी रुग्णालय कामठीचे संचालक डॉ. राजेंद्र चौधरी, तिवारी गॅस एजन्सीचे संचालक बबलू तिवारी, सामाजिक कार्यकर्ते मोंटू भुटानी, सामाजिक कार्यकर्ते राजू अग्रवाल, सामाजिक कार्यकर्ता मनोज बतरा, सामाजिक कार्यकर्ते कुक्कू चाना, पुरषोत्तम कावळे , रजनी पिल्ले मॅडम यांच्या उपस्थित ८ जून २०२५ रोजी दुपारी १२ ते ३ वाजेपर्यंत राम जानकी मंगल कार्यालय मोदी राम मंदिर परिसर कामठी येथे अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत, साप्ताहिक वृत्तपत्र पुलगाव टाइम्सचे मुख्य संपादक अनुपकुमार भार्गव, दैनिक आणि साप्ताहिक वृत्तपत्राचे मुख्य संपादक सुभाष राऊत (गुरुजी), साप्ताहिक उपराजधानी वृत्तपत्राचे मुख्य संपादक संजय देशमुख, दैनिक दोपहर आनंदचे मुख्य संपादक मिलिंद पवनीपगार , साप्ताहिक विदर्भ गोल्डन पेपरचे मुख्य संपादक एम ए जब्बार, साप्ताहिक आनंद भारतीचे मुख्य संपादक प्रशांत चहांदे , दैनिक देशोन्नती पेपरचे पत्रकार सुनील तिजारे, दैनिक राष्ट्रप्रकाश पेपरचे राजेंद्र अतकरे, दैनिक नागपूर मेट्रोचे सौमित्र नंदी, दैनिक सकाळचे सतीश दहाट गुरुजी, दैनिक महासागर सुरेश अढाऊ गुरुजी, पत्रकार शितल भगत, पाहुणे पत्रकार नर्मदापुरम मध्यप्रदेश येथील दैनिक भास्कर पेपरचे सब चीफ एडिटर दिपेश सोनिया यूट्यूब चॅनल डब्ल्यूएच न्यूजचे विजय खवासे, आयबीएम न्यूजचे भीमराव लोणारे, इंडिया फॅक्ट न्यूजचे नद आमी, टीएनएन न्यूजचे रियाज शेख, यूसीएन न्यूजचे रिपोर्टर नितीन रावेकर, रिपोर्टर अब्दुल शेख, रिपोर्टर सुरेंद्र सिंग नागी, रिपोर्टर रोशन वानखडे, उदगर न्यूजचे नितीन वाघमारे आणि तेजस संस्थेचे सामाजिक योद्धे मध्य प्रदेश भोपाळ माजी पोलीस निरीक्षक कपूरसिंग मालवीय, भोपाळ येथील सौरभ रजक, इटारसी येथील राजकुमार मालवीय, देवास येथील जगदीश जलोदिया, इंदोर येथील शिवनारायण कोदीया, जबलपूर येथील ओंकार रजक, सागर, संतोष रजक, बैतुल येथील प्रल्हाद रजक, रामप्रसाद बथरे, राममराव काळबांडे, मुलताई येथील श्याम सेवतकर, पारसिया येथील कमलेश माळवी, कळमेश्वर येथील सचिन सिरपूरकर, नागपुर येथील जगन्नाथ फाले, सुनील ढोले, रितेश पात्रीकर, विजय सौदागर, वीरेंद्रकुमार कडीखाये, तसेच तेजस संस्थेच्या कुटुंबातील ३० विद्यार्थी जे दहावी आणि बारावी उत्तीर्ण झाले आहेत. गाडगे बाबांची लहानपणापासूनची वेशभूषा परिधान करून धोबी समाजाला गाडगेबाबांच्य कार्य बद्दल प्रेरित करणाऱ्यांचाही गौरव करण्यात येईल.

# चरणजितसिंग ठरले सिंग इज किंग !



**भिवापूर तालुका वार्तापत्र**
**राजु जांभुळे**

तालुका शेतकी खरेदी विक्री संस्थेची निवडणूक नुकतीच पार पडली. या निवडणूकीत भाजपा व कॉंग्रेस पक्ष समर्थित उमेदवाराचे पॅनल रिंगणात होते. यात १७ पैकी १७ उमेदवार निवडून आणण्यात भाजपा चे पॅनल यशस्वी झाले. या खविस संस्थेच्या निवडणूकीत झेंडा फडकविण्याचे श्रेय काहींनी कार्यकर्ते व पदाधिकारी व टर्म वर्क यांना दिले. तर जिल्हा भाजपाध्यक्ष आनंदराव राऊत यांनी या विजयाचे श्रेय चरणजित सिंग अरोरा यांना दिले. त्यांनी या खविसच्या निवडणूकीत उभे न राहता एकहाती मोर्चा सांभाळत सलग पाच टर्म भाजपाची सत्ता राखण्यात चरणजितसिंग अरोरा कमालीचे यशस्वी झाल्याने ते या राजकीय क्षेत्रातले किंग म्हटल्यास कुणास वावगे वाटणार नाही. आता त्याच वय ६५ वर्ष असून प्रकृती बरोबर साथ देत नसतांना त्यांची काम करण्याची धडपड पाहण्याजोगी असून तरुण वगार्ला लाजवेल अशी आहे. या खवीस ची निवडणूक जाहीर होताच चरणजित सिंग अरोरा कामाला लागले. त्यांनी खविस उपाध्यक्ष अरविंद चौधरी, भिवापूर माजी शहराध्यक्ष आनंद रामस्वरूप गुप्ता यांना सोबत घेत तालुक्यातील सर्व सदस्याच्या घरी भेट देत तालुका पिंजून काढला.

संभाव्य यादी करून उमेदवार फायनल करण्यासाठी जिल्हाध्यक्ष आनंदराव राऊत व प्रदेश उपाध्यक्ष व माजी आमदार राजु पारवे यांना पाठविली. याबाबत योग्य बैठक व सभा घेण्यात आल्या यात प्रदेश उपाध्यक्ष राजु पारवे याची मोलाचे मार्गदर्शन घेण्यात आले. या निवडणूकीच योग्य नियोजन करून मतदारांना बुथ पर्यंत आणण्याची जबाबदारी कार्यकर्त्यांना देण्यात आली. मतदानाच्या दिवसी सकाळी आठ वाजता पासून बुथवर ते मतदार यादी घेवून ठाण मांडून बसले असल्याचे चित्र पहावयास मिळाले. चरणजितसिंग अरोरा यांच्या योग्य नियोजन व मेहनतीचा परिणाम निकालात दिसून आला. सर्व सतरा ही उमेदवार ला पॅनल टू पॅनल मतदान होवून बरेच उमेदवार मोठ्या फरकाने विजयी झाले दिसत आहे.

**शासकीय अधिकारी यांची कार्यालयीन लेटलतिफी !**

शासकीय अधिकारी व कर्मचारी लेट लतिफी राज्यात महाविकास आघाडीची सत्ता आल्यानंतर शासकीय अधिकारी व कर्मचारी यांना खुष करण्यासाठी पाच दिवसाचा आठवडा करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. यावेळी शासनाने पाच दिवसाचा आठवडा जाहीर करतांना दररोज ये -जा करण्याच्या वेळे मध्ये वाढ करण्यात आली होती. त्यानुसार शासकीय कार्यालयात सकाळी ९.४५ ते ६.१५ अशी करण्यात आली. मात्र या शासकीय वेळेच्या नियमाचे पालन अधिकारी - कर्मचारी करीत नसून त्याची लेट लतीफी मोठ्या प्रमाणात शासकीय कार्यालयात पहावयास मिळते. भिवापूर तालुका शेवटच्या टोकावर असून मागासलेला तालुका म्हणून या तालुक्याची ओखळ आहे. येथे तहसिल कार्यालय, पंचायत समिती कार्यालय, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, भुमी उपअधिक्षक कार्यालय, सार्वजनिक बांधकाम विभाग, नगरपंचायत कार्यालय, महावितरण कार्यालय अशी कार्यालय येतात. पाच दिवसाचा आठवडा जाहीर झाल्याने शासकीय अधिकाऱ्याला रविवार सोबत आता शनिवार ची सलग सुट्टी मिळाळी आहे. मात्र अधिकारी व कर्मचारी बरेच अधिकारी व कर्मचारी तालुक्याच्या मुख्यालयी राहत नसल्यामुळे हे अधिकारी नागपूर, उमरेड, पवनी, ब्रम्हपूरी येथून ये -जा करीत असतात. बऱ्याच अधिकारी व कर्मचारी दररोज उशिर साडेदहा पर्यंत येतात. तर काही मंडळी अकरा ते साडेअकरा पर्यंत येत असल्याची चित्र शासकीय कार्यालयात पहावयास मिळत आहे. यांना उशिरा येण्याची कारण विचारली असता बस मध्येच खराब झाली. घरी पाहुणे आले होते.नागपूर कार्यालयात फाईल नेली होती. ही ठरलेली कारणे देत असतात

**लेट येणाऱ्यांचा सत्कार !**

शासकीय कार्यालय लेट येणाऱ्यांचा सत्कार दोन वर्षापुर्वी उबाठा शिवसेना उपजिल्हा प्रमुख संदीप निबार्ते यांनी तहसिल कार्यालय, पंचायत समिती परिसरातील मुख्य मार्गावर आपल्या पदाधिकारी व कार्यकत्या च्या उपस्थित लेट येणारे अधिकारी व कर्मचारी यांची शिवसेना स्टाईल ने अगरबत्ती ओवाळून गळ्यात हार टाकून आदोला करण्यात आले होते. या आदोलनांची चांगलीच चर्चा परिसरात झाली होती.